कृषीवल
रायगड, रविवार, दि. २६ एप्रिल २०२६
किंमत ४ ₹

## वाहनाच्या धडकेत स्कुटी चालक ठार

**माणगाव :** रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत स्कुटी



चालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. माणगाव तालुक्यातील गारळ गावच्या हद्दीत विहान हॉटेलसमोर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर शनिवार, २५ एप्रिल रोजी पहाटे सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात स्कुटी पान २ वर

## अखेर संपाला स्थगिती

**रायगड :** महाराष्ट्र शासनाने मागील तीन वर्षांपासून प्रलंबित ठेवलेल्या सुधारित पेन्शन योजनेची अंमलबजावणी सुरु करावी तसेच इतर १८ मागण्यांसाठी संप पुकारण्यात आला होता. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर लेखी स्वरूपात इतिवृत्त संघटनेला दिल्यामुळे तसेच येत्या १५ दिवसांत सुधारीत पेन्शन योजनेबाबत शासन निर्णय जारी करणार असल्याबाबत अश्वस्त करण्यात आले आहे. सरकारी कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिलपासून सुरु केलेला बेमुदत संप शनिवारी (दि.२५) पासून स्थागित करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली. सर्व घटक संघटना आणि सुकाणू समितीच्या शुक्रवारी (दि.२४) सायंकाळ पान २ वर

# 10 हजार नागरिकांवर उधाणाचं संकट

### ■ रायगडातील १४५ गावांना धोका ■ २४ दिवस साडेचार मीटरपेक्षा उंच लाटा उसळणार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील समुद्र व खाडी किनाऱ्यांवरील तब्बल १४५ गावांवर यंदाच्या पावसाळ्यात उधाणाचे मोठे संकट ओढवण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. १४ जून ते ३० सप्टेंबरदरम्यान साडेचार मीटरपेक्षा उंच लाटा उसळणार असल्याचा अंदाज असून, सुमारे दहा हजार नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

रायगड जिल्ह्याला लाभलेल्या सुमारे २४० किलोमीटर लांबीच्या समुद्र किनाऱ्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात उधाणाचा धोका कायम असतो. यंदाही परिस्थिती चिंताजनक असून, समुद्र व खाडी किनाऱ्यावरील गावांमध्ये पाणी शिरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, रोहा, पनवेल आणि पेण या तालुक्यांतील अनेक गावे थेट समुद्र व खाडी किनाऱ्यावर वसलेली आहेत. या भागांना उधाणाचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, यंदाच्या पावसाळ्यात तब्बल २४ दिवस समुद्राला मोठे उधाण येणार आहे. या कालावधीत साडेचार मीटरपेक्षा अधिक उंच लाटा किनाऱ्यावर आदळणार आहेत. विशेषतः १६ जुलै रोजी तब्बल ४.८९ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

समुद्रकिनारी ४६ आणि खाडीकिनारी पान २ वर

### आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व्यस्त

जून ते सप्टेंबरदरम्यान उधाणाचा मोठा धोका निर्माण होणार असल्याची माहिती समोर आल्यानंतरही जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेची तयारी काय आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. सुमारे १४५ गावांतील १० हजार नागरिक या संकटाच्या छायेत असताना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते व्यस्त असल्याचे सांगण्यात आले. मात्र, त्यांनी या गंभीर विषयाकडे पुन्हा लक्ष दिले नसल्याचे दिसून आले. यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली जात आहे.

### उधाणाचे दिवस
(४.५ मीटरपेक्षा उंच लाटा)

- ■ १४ ते १९ जून
- ■ १३ ते १८ जुलै
- ■ १२ ते १६ ऑगस्ट
- ■ १० ते १३ आणि २८ ते ३० सप्टेंबर



## वेधक

### ठाकरे-फडणवीस यांची भेट?

**मुंबई :** विधान परिषद निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे, तशा राजकीय घडामोडींना वेग आला आहे. त्यातच उद्धव ठाकरे हे मध्यरात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वर्षा बंगल्यावर भेटल्याचा दावा करण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या प्रबुद्ध भारत या मीडिया हाऊसने याविषयीचे ट्विट केले आहे. त्यामुळे राज्यात खळबळ उडाली आहे. ही भेट नेमकी कोणत्या अनुषंगाने झाली. एकेकाळच्या या दोन मित्रांमध्ये कोणत्या मुद्द्यावर चर्चा झाली, हा सध्या राज्यात औत्सुक्याचा विषय ठरला आहे. गेल्या काही वर्षांपासून या दोन्ही नेत्यांमधील बेबनाव आणि युती तोडल्याचे शल्यही वारंवार दिसले. या दोघांमधील जुगलबंदी ही चर्चेचा विषय ठरली. भेटीच्या चर्चेमुळे खळबळ उडाली आहे.

### भारताने वाढवली चीनची चिंता

**नवी दिल्ली :** होर्मुज सामुद्रधुनी परिसरातील तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने महत्त्वाच्या सागरी मार्गांवर लक्ष केंद्रित करत नवी रणनीती जाहीर केली आहे. या हालचालीमुळे चीनची चिंता वाढल्याचे मानले जात आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावामुळे होर्मुज सामुद्रधुनी हे जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे महत्त्वाचे केंद्र पुन्हा चर्चेत आले आहे. या पार्श्वभूमीवर भारताने सागरी सुरक्षेची नवी रणनीती आखली आहे. भारतीय नौदल प्रमुख डी. के. त्रिपाठी यांनी होर्मुजसह मलाक्का सामुद्रधुनी, सुएझ कालवा आणि सुंडा सामुद्रधुनी यांसारख्या महत्त्वाच्या सागरी मार्गांचा उल्लेख केला आहे. विशेषतः सुंडा सामुद्रधुनीवर भारताने लक्ष केंद्रित केल्याने चीन चिंतेत आहे.

## डंपरखाली चिरडून महिला जागीच ठार

### अंत्यविधीला जात असताना दुचाकी घसरून अपघात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**




अलिबाग तालुक्यातील परहूर येथील एमआयडीसी रस्त्यावर भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये डंपरच्या चाकाखाली चिरडून दुचाकीवरील महिलेचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी सकाळी घडली. मुशेतमध्ये एका नातेवाईकांच्या घरी अंत्यविधीच्या कार्यक्रमाला जात असताना हा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मल्लिका अब्दुल नुरजी (५३) रा. रोहा असे या मृत महिलेचे नाव आहे. ही महिला त्यांच्या मुलाच्या दुचाकीवरून शनिवारी सकाळी अलिबाग तालुक्यातील मुशेत येथील भावाच्या अंत्यविधीला जात होती. दुचाकीवरून कार्लेखिंडमार्गे एमआयडीसी रस्त्यावरून जात असताना ओव्हान बंगला येथे आल्यावर सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास दुचाकी चालकाचा ताबा सुटला. त्यामुळे दुचाकी घसरून महिला दुचाकीवरून खाली पडली. दरम्यान, जलपाडाकडे जाणाऱ्या एका डंपरच्या चाकाखाली महिला चिरडली. या भीषण अपघातामध्ये महिलेचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक किशोर साळे, जिल्हा वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या अपघाताबाबतचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## एलसीबीच्या पोलिसांना दणका

### सहा जणांचे निलंबन; एसपी दलाल यांची कारवाई

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (एलसीबी) पोलीस उपनिरीक्षकासह सहा पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, एका गुन्ह्यात संशयास्पद कामगिरी केल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी ही कडक कारवाई करत पोलीस दलात खळबळ उडवली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच ०३ सीपी १६२३ क्रमांकाच्या महिंद्रा बोलेरो पिकअपमध्ये सुमारे २०० किलो वजनाचे, अंदाजे एक लाख रुपये किंमतीचे तांबे व स्टील धातूचे तुकडे भरलेले होते. ही गाडी रोहा तालुक्यातील वरसगाव कमानीजवळ उभी असल्याची माहिती एलसीबीला मिळाली होती. त्यानुसार १ एप्रिल रोजी सकाळी पथकाने छापा टाकून कारवाई केली आणि कोलाड पोलीस



ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पालघर जिल्ह्यातील गांगडेपाडा येथील प्रमोदकुमार यादव याच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. पान २ वर

### खोपोली, पेण पोलिसांवरही शिस्तभंग

**रायगड जिल्ह्यातील खोपोली आणि पेण पोलीस ठाण्यातील पोलिसांवरही शिस्तभंगाच्या कारणावरून कारवाई करण्यात आली आहे. खोपोली पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते आणि पेण पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार प्रकाश कोकरे यांना निलंबित करण्यात आले आहे. महिला दक्षता समितीच्या सदस्याशी व्हॉट्सअ‍ॅपद्वारे विनाकारण संपर्क साधत गैरवर्तन केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर शिस्तभंग झाल्याचे स्पष्ट झाल्याने आंचल दलाल यांनी त्यांच्यावरही निलंबनाची कारवाई केली.**

## आमदार संजय गायकवाडांना अटक करा

### शेतकरी कामगार पक्षाची मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

प्रकाशक प्रशांत आंबी यांना कथित शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमकीप्रकरणी आमदार संजय गायकवाड यांच्यावर फौजदारी कारवाई करून तात्काळ अटक करावी, या मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षासह महाविकास आघाडी, वंचित बहुजन आघाडी, डावे व पुरोगामी संघटनांकडून २८ एप्रिल रोजी मुंबईत तीव्र निषेध आंदोलन छेडण्यात येणार आहे.

मुंबईतील शिवाजी पार्क येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर मंगळवार, २८ एप्रिल रोजी सायंकाळी ४.३० वाजता या निषेध आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनात महाविकास आघाडी, वंचित बहुजन आघाडी, डावे पक्ष आणि पुरोगामी समविचारी संघटनांचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

"शिवाजी कोण होता?" या पुस्तकाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूरस्थित प्रकाशक प्रशांत आंबी यांना आमदार संजय गायकवाड यांनी अर्वाच्च शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा निषेध करत संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. हे पुस्तक गोविंद पानसरे यांनी सुमारे चार दशकांपूर्वी लिहिले असून, छत्रपती पान २ वर



### लोकप्रतिनिधीत्व तात्काळ रद्द करा

#### बीडमध्ये शेकापकडून निवेदन सादर

**। बीड । प्रतिनिधी ।**

बीड येथे शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनातून कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर गायकवाड यांना सहआरोपी करण्याची तसेच त्यांचे लोकप्रतिनिधित्व रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. पान २ वर

> विचारांशी असहमती असू शकते, पण त्यासाठी धमक्या देणे आणि हिंसेचे वातावरण निर्माण करणे अजिबात खपवून घेतले जाणार नाही. पानसरे यांच्या हत्येचा इतिहास डोळ्यासमोर असताना प्रशासनाने गप्प बसणे म्हणजे गुन्ह्याला मूक पाठिंबा देण्यासारखे आहे. तात्काळ कारवाई झाली नाही, तर रस्त्यावर उतरून संघर्ष अधिक तीव्र केला जाईल. – भाई मोहन गुंड

### पाण्यात बुडून कामगाराचा मृत्यू

**रायगड :** बोटीमधील पंख्याला अडकून पाण्यात बुडून कामगाराचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी (दि.२४) नवगाव समुद्रकिनाऱ्यापासून एक किलो मीटर अंतरावर समुद्रात घडली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुरेंद्र निशाद असे या मृत कामगाराचे नाव आहे. तो नवगाव येथील रहिवासी आहे. तो बोटीमध्ये मासेमारीचे काम करीत होता. शुक्रवारी (दि. २४) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हा इसम नवगाव बंदराजवळील समुद्रात असलेल्या बोटीवर शौचास बसला होता. त्याचा तोल जाऊन पान २ वर

## ना.ना. पाटील यांच्या नावाने ‘शेतकरी सन्मान पुरस्कार’ सुरू करा

### रमेश भोईर यांची सरकारकडे मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कुळ कायद्याचे जनक म्हणून ओळखले जाणारे नारायण नागो पाटील यांच्या कार्याला योग्य न्याय मिळावा यासाठी समाजसेवक रमेश भोईर यांनी पुढाकार घेत राज्य सरकारकडे महत्त्वपूर्ण मागण्या लावून धरल्या आहेत. मंत्रालयात तैलचित्र, शालेय अभ्यासक्रमात धडा आणि त्यांच्या नावाने शेतकरी सन्मान पुरस्कार सुरू करण्याची आग्रही मागणी भोईर यांनी राज्य सरकारकडे केली आहे.



थोर लोकनेते नारायण नागो पाटील यांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी गणेश नगर येथील आगरी समाज नेते व समाजसेवक रमेश भोईर यांनी ठोस पाऊल उचलले आहे. शेतकरी आणि कष्टकरी वर्गासाठी आयुष्य वेचलेल्या या नेत्याला मरणोत्तर योग्य सन्मान मिळावा, यासाठी त्यांनी राज्य सरकारकडे विविध स्तरांवर पाठपुरावा सुरू केला आहे.

भोईर यांनी मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये नारायण नागो पाटील यांच्या नावाने राज्यस्तरीय ‘शेतकरी सन्मान पुरस्कार’ पान २ वर

## पास करण्यासाठी प्रतिविषय सहा हजारांची मागणी

### सेंट बिल्फ्रेड कॉलेजच्या उपप्राचार्यांच्या विरोधात संताप

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी परिसरातील सेंट बिल्फ्रेड महाविद्यालय येथे उपप्राचार्यांवर विद्यार्थिनीकडून लाच मागणे आणि अयोग्य वर्तन केल्याचे गंभीर आरोप समोर आल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात निष्पक्ष चौकशी करून कडक कारवाई करावी, अशी मागणी बजरंग दलासह विविध संघटनांकडून करण्यात येत आहे.

रसायनीतील सेंट बिल्फ्रेड या नामांकित महाविद्यालयात घडलेल्या कथित प्रकारामुळे शैक्षणिक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विधी शाखेच्या (एलएलबी) प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीने उपप्राचार्यांवर गंभीर आरोप करत पोलिसांत धाव घेतली आहे.

तक्रारीनुसार, अनुत्तीर्ण विषय (एआयकेटी) पास करून देण्यासाठी संबंधित उपप्राचार्यांनी प्रतिविषय सुमारे सहा हजार रुपयांची मागणी केली. यासोबतच विद्यार्थिनीशी वैयक्तिक पातळीवर अनुचित संवाद साधत गैरवर्तन केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

१० एप्रिल रोजी या प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. उपप्राचार्यांनी विद्यार्थिनीला महाविद्यालयाबाहेर बोलावून खोपोली परिसरात नेण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, विद्यार्थिनीने प्रसंगावधान राखत या घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण केल्याची माहिती पुढे आली असून, हेच या प्रकरणातील महत्त्वाचे पुरावे मानले जात आहेत.

विद्यार्थिनीने सुरुवातीला महाविद्यालय प्रशासनाकडे तक्रार केली होती. मात्र, समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने तिने अखेर पोलिसांत तक्रार दाखल केली. सध्या प्रकरणाचा तपास सुरू असून, दोषींवर कडक कारवाईची मागणी जोर धरत आहे.

या पार्श्वभूमीवर बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण प्रांत अध्यक्ष राकेश खराडे, जिल्हा मंत्री जनार्दन मालुसरे आणि तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी यांनी निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## फीअभावी विद्यार्थिनी दोन वर्षे शिक्षणापासून दूर?

### ■ पनवेलमधील सेंट जोसेफ हायस्कूलवर गंभीर आरोप

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील सेंट जोसेफ हायस्कूल येथे फी न भरल्याच्या कारणावरून एका विद्यार्थिनीला तब्बल दोन वर्षे दहावीच्या वर्गात बसू न देणे आणि एसएससी परीक्षेला मज्जाव केल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. या प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून, प्रशासनाने तातडीने चौकशी सुरू केली आहे.

नवीन पनवेलमधील सेंट जोसेफ हायस्कूल या शाळेविरोधात गंभीर तक्रार समोर आली आहे. अनुष्का मोरे या विद्यार्थिनीला फी थकबाकीच्या कारणावरून दहावीच्या वर्गात बसू दिले नाही, तसेच एसएससी परीक्षेसाठीही अपात्र ठरवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हा प्रकार सलग दोन वर्षे सुरू असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणाला अधिक गंभीर वळण देणारी बाब म्हणजे विद्यार्थिनीला तिसरी ते नववीपर्यंतच्या वर्गांची प्रगती पुस्तकेही देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे तिच्या शैक्षणिक प्रगतीची कोणतीही अधिकृत नोंद उपलब्ध नसल्याचे उघड झाले आहे.

यासंदर्भात परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष पान २ वर

### यंदाही मेअखेर मान्सून येणार?

**नवी दिल्ली :** उन्हाच्या तीव्र झळांनी हैराण झालेल्या नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली असून, यंदा मान्सूनचे भारतात लवकर आगमन होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. युरोपियन सेंटर फॉर मीडियम रेंज वेदर फोरकास्ट (ईसीएमडब्ल्यूएफ) च्या अंदाजानुसार यंदा मान्सून मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात भारतात दाखल होऊ शकतो. अंदमान-निकोबार बेटांवर १८ ते २५ मेदरम्यान मान्सून पोहोचण्याची शक्यता असून, त्यानंतर केरळमार्गे तो देशभर पुढे सरकण्याचा अंदाज आहे. दरम्यान, देशातील तापमानात सतत वाढ होत असून महाराष्ट्रासह अनेक भागांमध्ये पारा ४३ ते ४४ अंशांपर्यंत पोहोचला आहे.

## सततच्या बदलत्या तापमानाचा फटका | उष्णतेच्या लाटेत जनजीवन विस्कळीत

# रायगडचा पारा ४२ अंश पार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात सध्या उष्णतेचा प्रचंड तडाखा जाणवत असून, तापमानात सातत्याने चढता आलेख दिसून येत आहे. हवामानातील बदलामुळे कधी दमट, तर कधी कोरडे उष्ण वातावरण निर्माण होत असले तरी गेल्या दोन दिवसांपासून उकाड्याने अक्षरशः कहर केला आहे. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये तापमान ३२ ते ४२ अंश सेल्सिअसदरम्यान नोंदवले जात आहे.

अलिबाग, मुरूड, उरण, पनवेल आणि कर्जत या तालुक्यांमध्ये तापमान ३२ ते ३७ अंशांच्या दरम्यान आहे, तर म्हसळा, तळा, पोलादपूर आणि पाली या भागांमध्ये तापमान ३६ ते ४२ अंशांपर्यंत पोहोचले आहे. शनिवारी (२५ एप्रिल) काही ठिकाणी पारा ४२ अंशांवर गेल्याने नागरिकांची अक्षरशः लाही लाही झाली.

सकाळी दहा वाजल्यापासून सायंकाळी चार




वाजेपर्यंत उन्हाचा चटका तीव्र जाणवत असून दुपारच्या वेळेत बाहेर पडणे कठीण झाले आहे. बाजारपेठा, मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी वर्दळ कमी झाल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. विशेषतः दुचाकीस्वार, बांधकाम कामगार, शेतकरी आणि मैदानी काम करणाऱ्या नागरिकांना उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत आहे. रसायनी परिसरातील मोहोपाडा येथे तापमानाने ४२ अंशांचा टप्पा ओलांडल्याने दुपारच्या वेळेत बाजारपेठेत शुकशुकाट जाणवत होता. कोरोनाच्या काळातील ओस पडलेल्या रस्त्यांची आठवण करून देणारे हे दृश्य पुन्हा अनुभवायला मिळत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम दिसू लागला आहे. लूज मोशन, ताप, चक्कर येणे, अंगात उकळणे, खोकला अशा तक्रारी वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. उष्माघात आणि निर्जलीकरणाचा धोका वाढल्याने आरोग्य विभागही सतर्क झाला आहे.

हवामान विभागाने २६ एप्रिलपर्यंत यलो पान २ वर

### आरोग्याची काळजी घ्या

- ■ उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. तहान लागण्याची वाट न पाहता नियमित पाणी पिणे आवश्यक आहे. भरदुपारचे कडक ऊन टाळावे, विशेषतः दुपारी १२ ते ४ दरम्यान बाहेर पडणे शक्यतो टाळावे.
- ■ हलके व सैल (सूती व फिकट रंगाचे) कपडे वापरावेत. डोक्याचे संरक्षण करण्यासाठी टोपी, कॅप, स्कार्फ किंवा छत्रीचा वापर करावा. लिंबूपाणी, ताक, नारळपाणी, ओआरएस यांसारखे द्रवपदार्थ नियमित घ्यावेत.
- ■ चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी, जास्त घाम येणे किंवा अशक्तपणा जाणवल्यास त्वरित सावलीत जावे आणि वैद्यकीय मदत घ्यावी.



# आधी सेझसाठी झालेले भूसंपादन रद्द करा

## • शेकाप खजिनदार अतुल म्हात्रेंची मागणी

| हमरापूर | प्रतिनिधी |

शासनाने पहिले सेझसाठी करण्यात आलेल्या भूसंपादन रद्द करावे, नंतरच एमएमआरडीएबाबत विचार करावा, अशी मागणी शेकापचे राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांनी पेण तालुक्यातील कळवे येथे बैठकीत बोलताना केली.

कळवे विठ्ठल रखुमाई मंदिरात एमएमआरडीएसंदर्भातील महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस आ. रवींद्र पाटील, प्रांत प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, पंचायत समिती सभापती स्मिता पाटील, सदस्य अस्मिता पाटील, एमएमआरडीएचे प्रमुख अधिकारी पडवळ, चौधरी यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



येऊ घातलेल्या १२४ गावांच्या भूसंपादन प्रक्रियेवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान शेतकरी कामगार पक्षाचे राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांनी अत्यंत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले. एमएमआरडीएचा प्रस्तावित प्रकल्प राबविण्यापूर्वी एसीझेड (विशेष आर्थिक क्षेत्र) संदर्भातील भूमिका स्पष्ट करणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. सन २००५ साली झालेल्या भूसंपादनानंतर प्रकल्प रद्द होऊनही संबंधित शेतकऱ्यांचे सातबारे अद्याप कोरे न झाल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

सेझ अंतर्गत झालेले भूसंपादन प्रथम रद्द करून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, त्यानंतरच नव्या एमएमआरडीए प्रकल्पाचा विचार करावा, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. तसेच, येणारे भूसंपादन हे 'भूमी अधिग्रहण कायदा २०१४' अंतर्गत करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली. या कायद्यांतर्गत शेतकऱ्यांना चारपट मोबदला आणि २० टक्के भूखंड देण्याची तरतूद असून त्याच पद्धतीने भूसंपादन व्हावे, अन्यथा शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होईल, असा इशारा देण्यात आला. रेडीरेकनर दर वाढविण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

याशिवाय, तब्बल १९ हजार हरकती नोंदवूनही कोणतीही जनसुनावणी न घेता १६ मार्च २०२६ रोजी शासनाने जीआर काढून भूसंपादन प्रक्रिया सुरू केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही, तर भविष्यात एक इंचही जमीन घेऊ देणार नाही, असा इशाराही यावेळी उपस्थितांकडून देण्यात आला. या बैठकीमुळे एमएमआरडीएच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांमध्ये वाढत असलेली चिंता आणि असंतोष पुन्हा एकदा समोर आला आहे.

# रायगड विक्रीला काढलाय का?

## • उरणमधील जमीन व्यवहारांवर राजाराम पाटील यांचा आरोप

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चाणजे येथील संशयास्पद जमीन व्यवहारामुळे महसूल यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. भोंदूगिरी प्रकरणाशी संबंधित व्यक्तीच्या कुटुंबियांच्या नावावर लाखोंची जमीन खरेदी व तातडीने फेरफार मंजूर झाल्याने संताप व्यक्त होत असून, शेतकरी नेते राजाराम पाटील यांनी "रायगड विक्रीला काढलाय का?" असा थेट सवाल करत प्रशासनावर जोरदार हल्लाबोल चढवला आहे.

चाणजे येथील जमीन व्यवहाराने सध्या संपूर्ण उरण तालुक्यात खळबळ उडवली आहे. भोंदूगिरी प्रकरणात अटकेत असलेल्या अशोक खरात याच्या पत्नी कल्पना खरात हिच्या नावावर सुमारे ५८ लाख ५० हजार रुपयांची जमीन खरेदी झाल्यानंतर अवघ्या महिनाभरात फेरफार नोंद मंजूर करण्यात आली. १२ मार्च २०२६ रोजी सर्वे क्रमांक ३७१/३ (क्षेत्र ०.२०.०० आर) ही जमीन खरेदी करण्यात आली, तर १३ एप्रिल रोजी फेरफार क्रमांक ८३५१ मंजूर झाला. संबंधित महिला फरार असल्याची माहिती असतानाही एवढ्या वेगाने प्रक्रिया पूर्ण झाल्याने तहसील कार्यालयाच्या कारभारावर संशय व्यक्त होत आहे.

या प्रकरणात तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत असून, सामान्य नागरिकांच्या कामांना विलंब लावणारी यंत्रणा या व्यवहारात इतकी तत्पर कशी झाली, असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, नायब तहसीलदारांनी "फेरफार नोंद पुढील कार्यवाहीअभावी रद्द करण्यात आली" असे सांगितले असले, तरी ती सुरुवातीला मंजूर कशी झाली, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. यामुळे या व्यवहारामागे मोठ्या आर्थिक घोटाळ्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

> गुपचूप भोंदू बाबा येतात, जमीन खरेदी करतात आणि महसूल विभाग त्यांना सहकार्य करतो. हीच परिस्थिती राहिली, तर रायगड कधी विकला जाईल, हे जनतेलाही कळणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी कडक नियम केले होते, पण आज त्यांच्या नावाचा वापर करणारे सत्ताधारीच शेतकऱ्यांच्या जमिनी लाटण्यास मूकसंमती देत आहेत. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, संबंधित अधिकाऱ्यांची मालमत्ता तपासावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच एकाच ठिकाणी वर्षानुवर्षे काम करणाऱ्या तलाठ्यांची तात्काळ बदली केली पाहिजे.
> – राजाराम पाटील, शेतकरी नेते

# अनैतिक प्रकार टळण्यासाठी व्यावसायिकांचा पुढाकार



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील ओमकार रेसिडेन्सीत एका तरूणीचा संशयास्पद स्थितीत मृतदेह आढळ्यानंतर आता श्रीवर्धन येथील पर्यटन व्यावसायिक अनैतिक घटना टळण्यासाठी पुढाकार घेताना दिसून येत आहेत. येथील व्यावसायिक व्यवसायाबाबत अधिक सतर्क झाले आहेत.

अद्यापपर्यंत श्रीवर्धन येथे कुटुंब वत्सल त्याचबरोबर शालेय सहलींचे प्रमाण जास्त होते.काही महिन्यांपासून तरूण-तरुणींचे टोळक्याने एकत्रित येण्याचे प्रमाण वाढले असून, अनेक वेळा शांततेचा भंग करण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. मात्र आता श्रीवर्धन येथील पर्यटन व्यावसायिकांना आता नव्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे ते म्हणजे दुचाकीवरून खोलीची विचारणा करण्यासाठी आलेले अल्पवयीन मुलगा व मुलगी तसेच नवविवाहित दांपत्य असल्याचे सांगत खोलीची मागणी करणारे ग्राहक.

अनैतिक घटनांपासून श्रीवर्धन येथील पर्यटन व्यवसाय सुरक्षित असला तरी सध्याच्या परिस्थितीत तथाकथित नवविवाहित दांपत्य येण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेकवेळा यामध्ये मुलगी अल्पवयीन असल्याचे निदर्शनास येते. विवाह संदर्भात दाखले अथवा एखादा पुरावा रेस्टॉरंट चालकाने मागितल्यास खोलीचे दुप्पट भाडे देतो असे सांगणारे नवविवाहित दांपत्य व्यावसायिकांना आढळून आले आहेत. श्रीवर्धन येथील पर्यटनाला कुठलीही बाधा येऊ नये याकरिता आपण पुढाकार घेतल्याचे व्यावसायिकांनी सांगितले.

> रेस्टॉरंट, होम स्टेमध्ये काही वेळा अल्पवयीन मुलं-मुली खोलीसाठी विचारणा करतात. तसेच तरूण-तरुणी आपण नवविवाहित असल्याचे सांगून खोलीकरिता आग्रही असतात. अशा वेळी अल्पवयीन मुलं-मुलींना खोली देण्यास नकार देतो तसेच नवविवाहित जोडप्याबाबत खात्रीशीर कागदपत्रे दाखवल्यावर त्याची खात्री झाल्यावर खोली देतो.
> – गणेश पोलेकर, पर्यटन व्यावसायिक

# रस्त्यांवर पाणी मारण्यात यावे

**अलिबाग :** तालुक्यातील अलिबाग-रोहा आणि अलिबाग-मुरुड या मुख्य रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. दरम्यान, खडी-सिमेंट मिक्स आणि मातीची धूळ मोठ्या प्रमाणात उडत आहे. त्याचा त्रास प्रवास करणाऱ्या जनतेला सोसावा लागत आहे. त्यामुळे या मार्गांवर दररोज पाण्याचा मारा करावा, जेणेकरुन उडणारी धूळ आणि मातीचा त्रास होणार नाही, अशी मागणी करण्यात येत आहे. परंतु, याकडू संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. तरी, सामान्य जनतेचा विचार करुन संबंधित विभागाने या मार्गांवर मोठ्या प्रमाणात पाणी मारावे, असे आवाहन स्थानिक नागरिकांसह प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# उद्घाटन झाले, पण डायलेसिस सेंटर बंदच

## कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील धक्कादायक प्रकार

| नेरळ | प्रतिनिधी |

मोठ्या गाजावाजात आमदार महेंद्र थोरवेंच्या वाढदिवसाचे औचित्य साधत उद्घाटन झालेले कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील डायलेसिस सेंटर अजूनही रुग्णांसाठी बंदच असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. टेक्निशियन नियुक्ती व औषधसाठ्याअभावी हे केंद्र सुरूच झाले नसल्याने रुग्णांना खासगी व बाहेरील रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत आहे.



कर्जत तालुक्यातील डायलेसिस रुग्णांसाठी मोठा दिलासा ठरणार असे मानले गेलेले कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील डायलेसिस सेंटर प्रत्यक्षात मात्र अद्याप कार्यान्वित झालेले नाही. ७ एप्रिल रोजी आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते उद्घाटन होऊनही पंधरवडा उलटला, तरी एकाही रुग्णाला येथे डायलेसिस सेवा मिळालेली नाही. कर्जत तालुक्यातील अनेक रुग्णांना सध्या रायगड हॉस्पिटल, पनवेल-नवी मुंबई येथील केंद्रे किंवा खासगी ट्रस्टमार्फत चालविलेल्या डायलेसिस सेंटरचा आधार घ्यावा लागत आहे. सरकारी रुग्णालयात मोफत सेवा उपलब्ध होणार या अपेक्षेने रुग्णांना दिलासा मिळाला होता, मात्र प्रत्यक्षात केंद्र बंद असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. वडवली येथील एक रुग्ण सध्या रायगड हॉस्पिटलमध्ये डायलेसिस करून घेत असून, खासगी रुग्णालयापेक्षा सरकारी रुग्णालयात ही सेवा मिळणार असल्याने आर्थिक समस्या सुटेल, असे त्यांना वाटले होते. परंतु, एक पंधरवडा गेला असून, अद्याप हे डायलेसिस सेंटर सुरू झालेले नाही.

दरम्यान, नेरळ येथील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) शहराध्यक्ष गणेश खराटे हे आपल्या नातेवाईकाला डायलेसिससाठी घेऊन गेले असता सेंटरला कुलूप असल्याचे आढळले. चौकशीत हे केंद्र अद्याप सुरू झाले नसल्याचे स्पष्ट झाले.

> डायलेसिस सेंटरसाठी आवश्यक टेक्निशियन नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. जिल्हा रुग्णालयाकडून आदेश मिळाल्यानंतर लवकरच केंद्र सुरू होईल. सध्या औषधसाठाही उपलब्ध नाही. रुग्णांना तातडीची सेवा देण्याऐवजी उद्घाटनापुरतेच मर्यादित राहिलेल्या या प्रकल्पाबाबत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी त्वरित भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.
> – डॉ. मस्कर, वैद्यकीय अधीक्षक, कर्जत उपजिल्हा रुग्णालय

पान १ वरून

## अखेर संपाला स्थगिती

९९ अशा एकूण १४५ गावांचा या धोक्यात समावेश आहे. उधाणाच्या वेळी मुसळधार पाऊस झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊन पूरस्थिती झालेल्या आभासी सभेमध्ये संप स्थगीत करण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे समन्वय समितीचे महाराष्ट्र निमंत्रक विश्वास काटकर तसेच राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना राज्य अध्यक्ष अशोक दगडे यांनी विविध संघटना व सुकाणू समितीच्या पदाधिकारी यांचे मत विचारात घेऊन २५ एप्रिलपासून संप स्थागित असल्याचे घोषित केले. त्यामुळे शासकीय कार्यालयात सोमवारपासून नियमित कामकाज सुरु होईल. गेले चार दिवस नागरिकांना झालेला त्रास व गैरसोयीबद्दल रायगड जिल्हा राज्य सरकारी कर्मचारी संघटना व समन्वय समितीच्या वतीने दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे. याबाबत सुरेश पालकर-अध्यक्ष, समन्वय समिती रायगड, संदीप नागे-अध्यक्ष कर्मचारी मध्यवर्ती संघटना, प्रभाकर नाईक-निमंत्रक समन्वय समिती यांनी माहिती दिली.

## ...उधाणाचं संकट

निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे शेती, घरे आणि स्थानिक नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. रायगडमध्ये यापूर्वीही अतिवृष्टीमुळे दरडी कोसळून जीवितहानी झाली आहे. त्यामुळे यंदाच्या उधाणाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे.

## एलसीबीच्या पोलिसांना दणका

दरम्यान, याच कालावधीत बंद पडलेल्या एका कंपनीतील माल चोरीला गेल्याची तक्रार माणगाव पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. या गुन्ह्यातील काही मुद्देमाल माणगाव पोलिसांनी जप्त केला होता. मात्र, या मुद्देमालाची नोंद माणगावऐवजी कोलाड पोलीस ठाण्यात करण्यात आल्याची गंभीर विसंगती समोर आली. ही बाब आंचल दलाल यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी प्राथमिक चौकशीचे आदेश दिले.

या चौकशीत एलसीबीचे पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील, पोलीस हवालदार संदीप पहेलकर, पोलीस शिपाई बाबासो पिंगळे, मोरेश्वर ओमले, ओंकार सोंडकर आणि लालासो वाघमोडे यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. त्यानुसार सर्व सहा जणांना तात्काळ निलंबित करण्यात आले.

निलंबित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबन काळात अलिबाग नियंत्रण कक्षात हजेरी लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दररोज दोन वेळा हजेरी, मुख्यालयाबाहेर जाण्यासाठी आगाऊ लेखी परवानगी, तसेच सरकारी किट व ओळखपत्र जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निलंबन काळात कोणत्याही प्रकारचा खासगी व्यवसाय अथवा नोकरी केल्यास त्यांच्यावर पुढील कारवाई करण्यात येणार आहे. विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत ही निलंबनाची कारवाई कायम राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## 'आमदार संजय गायकवाडांना अटक करा'

शिवाजी महाराजांच्या इतिहासाची वेगळी मांडणी करणारे महत्त्वाचे साहित्य म्हणून ते ओळखले जाते. देशातील विविध भाषांमध्ये त्याचे भाषांतर होऊन लाखो प्रतींची विक्री झाल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. अनेक विद्वान आणि अभ्यासकांनीही या पुस्तकाला अभ्यासपूर्ण मान्यता दिल्याचे नमूद करण्यात आले आहे.

आयोजकांच्या मते, पुस्तक न वाचता केवळ शीर्षकावरून प्रतिक्रिया देणे आणि थेट धमक्या देणे ही लोकशाहीविरोधी व धोकादायक प्रवृत्ती आहे. त्यामुळे या प्रकरणात कठोर कायदेशीर कारवाई होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या आंदोलनाचे आवाहन भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे कार्यालयीन चिटणीस भाई ॲड. राजेंद्र कोरडे यांनी केले असून, "लोकशाही मूल्यांवर हल्ला करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी हा लढा आवश्यक आहे," असे त्यांनी म्हटले आहे. या आंदोलनामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता असून, प्रशासन आणि सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लोकप्रतिनिधीत्व तात्काळ रद्द करा

निवेदनात "शिवाजी कोण होता?" या वादग्रस्त पुस्तकाच्या संदर्भात प्रकाशक व डाव्या विचारसरणीचे युवा नेते कॉ. प्रशांत अंबी यांना देण्यात आलेल्या जीवे मारण्याच्या धमकीचा उल्लेख करण्यात आला आहे. याच प्रकारच्या वैचारिक द्वेषातून यापूर्वी पानसरे यांची हत्या झाली होती, असा मुद्दा उपस्थित करत अशा धमक्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे नमूद करण्यात आले.

शेकाप पदाधिकाऱ्यांनी आरोप केला की, पुस्तक न वाचता केवळ विचारधारात्मक विरोधातून धमक्या देणे ही लोकशाहीसाठी धोकादायक बाब आहे. अशा प्रवृत्तींवर लगाम घालण्यासाठी संबंधितांवर कठोर कारवाई अपरिहार्य असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

या पार्श्वभूमीवर आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात सखोल चौकशी करून त्यांना सहआरोपी करण्यात यावे आणि त्यांचे लोकप्रतिनिधित्व तात्काळ रद्द करावे, अशी ठोस मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

कारवाई लांबवल्यास शेकापकडून राज्यव्यापी आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देत या आंदोलनाची जबाबदारी शासनावरच राहील, असेही स्पष्ट करण्यात आले. यावेळी शेकापचे मराठवाडा चिटणीस भाई मोहन गुंड, जिल्हा चिटणीस बापूसाहेब सोळुंके, शिवशक्ती-भीमशक्ती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फीअभावी विद्यार्थिनी दोन वर्षे शिक्षणापासून दूर?

महादेव वाघमारे यांनी तक्रार दाखल केल्यानंतर प्रशासनाने तातडीने हालचाल केली. पनवेल तालुका गटशिक्षणाधिकारी शाहू सतपाल यांनी चौकशीचे आदेश देत केंद्रप्रमुख निंबाजी गीते यांची नियुक्ती केली आहे. संबंधित शाळेला भेट देऊन सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, दोन वर्षे शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे विद्यार्थिनीचे मोठे शैक्षणिक नुकसान झाल्याचा दावा करण्यात येत असून, तिला दहा लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याची मागणी पुढे आली आहे. तसेच तिसरी ते नववीपर्यंतची सर्व प्रगती पुस्तके तात्काळ देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात त्वरित न्याय न मिळाल्यास शाळेसमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पनवेल परिसरात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू असून, चौकशी अहवालानंतर प्रशासन कोणती कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वाहनाच्या धडकेत स्कुटी चालक ठार

चालक ज्ञानेश्वर नथुराम लहाने (५०, रा. गारळ) यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी योगेश चंद्रकांत लहाने (वय २९) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत लहाने हे त्यांच्या ताब्यातील स्कुटी (क्र. एमएच ०६ बीएल ५४८९) घेऊन मुंबईकडून गोवा दिशेने गारळ गावाकडे जात होते. त्याचवेळी समोरून येणाऱ्या अज्ञात वाहनाने भरधाव वेगात येत त्यांच्या स्कुटीला जोरदार धडक दिली.

या धडकेत लहाने यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून पळून गेला. या अपघातात स्कुटीचेही मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अज्ञात वाहनचालकाचा शोध सुरू असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक चिकणे करत आहेत.

## पाण्यात बुडून कामगाराचा मृत्यू

समुद्रात पडला. मात्र, बोटीतील पंख्याला तो अडकल्याने त्याच्या अंगावर जखमा झाल्या. त्याला पाण्यातून बाहेर पडणे कठीण झाले. त्यामुळे पाण्यात बुडून तो बेशुध्द झाला. ही बाब बोटीतील मंडळीच्या लक्षात आल्यावर त्याला तात्काळ अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. अपघात विभागात उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात रात्री उशिरा अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याबाबत अरविंद निशाद यांनी फिर्याद नोंदविली आहे.

## ना.ना. पाटील यांच्या नावाने शेतकरी सन्मान पुरस्कार सुरू करा

सुरू करणे, शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या जीवनकार्याचा समावेश करणे आणि मंत्रालयात त्यांचे तैलचित्र सन्मानपूर्वक बसवणे या मुद्द्यांचा समावेश आहे. या मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी भोईर लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असून, या उपक्रमाला राज्यातील अनेक आमदार व खासदारांनीही पाठिंबा दर्शविल्याची माहिती समोर आली आहे.

## रायगडचा पारा ४२ अंश पार

अलर्ट जारी केला असून, पुढील काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना दुपारी १२ ते ४ या वेळेत अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दरम्यान, वाढत्या उकाड्यामुळे बाजारात कलिंगड, काकडी, खरबूज, ऊसाचा रस आणि थंड पेयांना मोठी मागणी वाढली आहे. उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिकांचा थंड पदार्थांकडे कल वाढल्याने विक्रेत्यांच्या व्यवसायालाही चांगली चालना मिळत आहे.

# सिलिंडर हल्ल्यातील आरोपीला बिहारमधून अटक

## • महाड एमआयडीसी पोलिसांची कामगिरी

| महाड | प्रतिनिधी |

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गॅस सिलिंडरने हल्ला करून फरार झालेल्या आरोपीला पोलिसांनी बिहार राज्यातून अटक करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. मो. मोकरर अली असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याला बिहारमधील जमुई जिल्ह्यातून जेरबंद करण्यात आले. दि. १० एप्रिल २०२६ रोजी महाड एमआयडीसी परिसरात मोबाईलवर लावलेली गाणी बंद करण्याच्या कारणावरून किरकोळ वाद झाला. या वादाचे रूपांतर हिंसक हल्ल्यात होत आरोपी मो. मोकरर अली याने मो. हैदर रजा याच्यावर भारत गॅसचा सिलिंडर फेकून गंभीर जखमी केले. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता.



याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस हवालदार आर.एस. मोहिते यांनी सहायक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला. पोकॉ बल्लाळ यांनी केलेल्या सायबर व तांत्रिक विश्लेषणातून आरोपी बिहार राज्यात असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी परराज्यात असल्याने रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकात दीपक मोरे, पोलीस नाईक इक्बाल शेख व पोकॉ बल्लाळ यांचा समावेश होता. पथकाने तात्काळ बिहार गाठत स्थानिक परिस्थितीत सापळा रचून आरोपीला जमुई जिल्ह्यातून अटक केली.

अटकेनंतर आरोपीला जमुई येथील न्यायालयात हजर करण्यात आले. तेथून ट्रान्झिट वॉरंट मिळवून त्याला महाडमध्ये आणण्यात आले असून, पुढील तपासासाठी न्यायालयात हजर करण्यात येत आहे. या धाडसी कारवाईबद्दल महाड एमआयडीसी पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# फलकांवर नियम, प्रत्यक्षात धुडगूस!

## रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात नियमबाह्य बांधकामे

| रेवदंडा | प्रतिनिधी |

राष्ट्रीय संरक्षित स्मारक असलेल्या रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. पुरातत्व विभागाने ठिकठिकाणी नियमावलीचे फलक लावले असले तरी प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामे सुरू असून, प्रशासनाच्या भूमिकेवर ग्रामस्थ आणि इतिहासप्रेमी संतप्त झाले आहेत.

केंद्र सरकारच्या पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडून (एएसआय) रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात प्राचीन स्मारक संरक्षणाबाबत नियमावलीचे फलक उभारण्यात आले आहेत. मात्र, हे नियम केवळ फलकांपुरतेच मर्यादित राहिले असून प्रत्यक्षात किल्ला परिसरात मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य बांधकामांचा धडाका सुरू आहे.

१९५८ च्या प्राचीन स्मारके व पुरातन स्थळे आणि अवशेष अधिनियमानुसार हा किल्ला राष्ट्रीय महत्त्वाचे संरक्षित स्मारक आहे. नियमानुसार स्मारकाच्या १०० मीटर परिसरात कोणतेही बांधकाम पूर्णतः प्रतिबंधित असून, पुढील २०० मीटर क्षेत्र निर्बंधित आहे. तरीही या नियमांना धाब्यावर बसवत अवशेषांची मोडतोड करून नव्या बांधकामांना सुरुवात करण्यात आली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी अनेकदा याबाबत पुरातत्व विभागाकडे निवेदने दिली. मात्र, कारवाईच्या नावाखाली केवळ नोटिसा बजावल्या जात असून, प्रत्यक्षात कामे थांबवली जात नसल्याचा आरोप होत आहे. परिणामी, "ही बांधकामे कोणाच्या वरदहस्ताने सुरू आहेत?" असा संतप्त सवाल ग्रामस्थ व इतिहासप्रेमी उपस्थित करत आहेत.

दरम्यान, नुकतेच विभागाने जुने फलक बदलून नवीन नियमावली लावली असली, तरी त्यांचा उपयोग केवळ दर्शनी भागापुरता असल्याची टीका होत आहे. "नियम फक्त वाचण्यासाठी आहेत का?" असा उपरोधिक सवालही उपस्थित होत आहे.

याबाबत संबंधित पुरातत्व विभाग काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. नियमबाह्य कामे वेळीच रोखण्यात यावीत, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे.

> आगरकोट किल्ला परिसरात नियमबाह्य बांधकामे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. अशा प्रकारच्या कृत्यांसाठी दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे, आणि ती निश्चितपणे लागू केली जाईल.या प्रकारामुळे ऐतिहासिक वारसा धोक्यात येत असल्याची चिंता व्यक्त होत असून, तातडीने कठोर कारवाई करून किल्ला परिसराचे संरक्षण करण्याची मागणी जोर धरत आहे.
> – ए.एस.आय. बजरंग ऐलिकर, पुरातत्व अधिकारी

## निवडक




### पेण शहराच्या विकासात नवा टप्पा

**पेण :** 'ग्रोथ सेंटर'च्या माध्यमातून तिसऱ्या मुंबईचे केंद्र म्हणून झपाट्याने विकसित होत असलेल्या पेण शहराचा चेहरामोहरा आता बदलू लागला आहे. शहराच्या सौंदर्यात आणि वैभवात भर घालणारी दोन भव्य स्मारके, तसेच एक सुसज्ज चारमजली भवन उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, लवकरच हे प्रकल्प नागरिकांसाठी खुले होणार आहेत. पेण नगरपरिषदेच्यावतीने साकारण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी सुमारे १० कोटी ५० लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात येत आहे. या माध्यमातून शहराला सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या नवी ओळख मिळणार आहे. या प्रकल्पांतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांचा २० फुट उंच अश्वारूढ पुतळा मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत शहराच्या प्रवेशद्वारावर उभारण्यात येत आहे. या भव्य स्मारकामुळे शहराच्या प्रवेशाला ऐतिहासिक आणि अभिमानास्पद स्वरूप प्राप्त होणार आहे. तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासह एक चारमजली सुसज्ज भवन उभारण्यात येत आहे. या भवनामध्ये विविध उपयुक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पहिल्या मजल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १६ फूट उंच पुतळा आणि त्यांच्या जीवनकार्याचे दर्शन घडविणारी माहिती मांडली जाणार आहे. दुसऱ्या मजल्यावर वैचारिक देवाणघेवाणीसाठी प्रशस्त सभागृह असेल. तिसऱ्या मजल्यावर समृद्ध ग्रंथालय उभारण्यात येणार असून, चौथ्या मजल्यावर 'विपश्यना' ध्यानधारणा केंद्राची सुविधा उपलब्ध असेल. संपूर्ण इमारत वातानुकूलित असणार आहे.


● (छायाचित्र : राकेश खराडे)

### धुळीच्या भोवऱ्यांमुळे मोठा धोका

**रसायनी :** उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून दुपारच्या वेळेस प्रचंड उकाडा जाणवत आहे. त्यातच रसायनीत शनिवारी (दि.२५) दुपारचे तापमान ४२ अंश झाल्याने रसायनीकरांच्या अंगाची लाही लाही झाली. या रणरणत्या उन्हामुळे परिसरात वारंवार वावटळी (धुळीचे भोवरे) निर्माण होत असून अपघातांचे केंद्रबिंदू ठरत आहेत. त्यामुळे शेतकरी, मजूर, प्रवासी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुपारच्या सुमारास अचानक उठणाऱ्या या वावटळींमुळे शेतातील मोकळी माती उडून मोठ्या प्रमाणात धुळीचे भोवरे तयार होतात. परिणामी, काम करणाऱ्या शेतकऱ्यांना, तसेच रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना मोठा धोका निर्माण होत आहे. काही ठिकाणी शेतीसाठी वापरण्यात येणारी हलकी साधने, प्लास्टिक साहित्य किंवा डबे हवेत उडून अपघात घडवत आहेत. तसेच, धुळीच्या तीव्र झोतामुळे दृष्टी कमी होत असल्याने दुचाकीस्वार आणि वाहनचालकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### श्रीवर्धनमध्ये डंपर चालकांचा उद्दामपणा

**श्रीवर्धन :** भरावासाठी माती वाहून नेणाऱ्या दोन डंपर चालकांचा शनिवारी (दि.२५) सकाळी श्रीवर्धन समुद्रकिनारी उद्दामपणा पाहायला मिळाला. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याजवळील मठाच्या स्मशानभूमी जवळ दोन डंपर रस्त्याच्या मधोमध उभे करून डंपर चालक समुद्रकिनाऱ्यावरती निघून गेले होते. त्यामुळे या मार्गावरून येणाऱ्या पर्यटकांना व नागरिकांना आपली वाहने डंपरच्या मागे उभी करून डंपरच्या चालकांचा शोध घेण्याची वेळ आली. शनिवार असल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी नेहमीच गर्दी असते. अनेक वॉटर स्पोर्ट्स वाले आपली विविध वॉटर स्पोर्ट्सची साधने घेऊन समुद्रकिनाऱ्यावरती असतात. अशातच समुद्रकिनाऱ्याच्या बाजूला एका विकासकाचे काम सुरू असून त्या ठिकाणी मातीचा भराव करणारे डंपर समुद्रकिनाऱ्यावरील मार्गावरून उभे करण्यात येतात. या डंपर चालकांना समुद्रकिनाऱ्यावरून वाहतूक करण्याची परवानगी दिली कुणी? असा प्रश्न देखील या निमित्ताने उपस्थित केला जात आहे. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी त्या ठिकाणी ओरडाआरड केल्यानंतर डंपर चालक आले व आपल्या गाड्या घेऊन समुद्रकिनाऱ्याने खाली करण्यासाठी निघून गेले. हे दोन्ही डंपर उभे केले होते ती स्मशानभूमीच्या प्रवेशद्वाराची जागा आहे. तरी, पोलिसांनी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरून वाहतूक करणाऱ्या डंपर चालकांवर कारवाई करावी व समुद्रकिनाऱ्यावरून वाहने नेऊ नयेत अशी डंपर चालकांना समज द्यावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# पोशीर, शिलार धरणाला विरोध

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात होत असलेल्या शिलार आणि पोशीर धरणाला दोन्ही बाजूच्या संघर्ष समितींनी विरोध केला आहे. दि.१७ मार्चच्या मोर्चानंतर शासनाच्यावतीने प्रांत अधिकाऱ्यांनी विरोध करणाऱ्या संस्थांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बैठक बोलावली होती. दरम्यान, या बैठकीत कर्जत तालुक्यात ही दोन्ही धरणे नको, असा एकमुखी ठराव घेण्यात आला. तर, जोवर शेतकऱ्यांची संमती मिळत नाही तोवर प्रस्तावित धरण परिसरात कोणतीही कामे करू नये असा निर्णय घ्यावा, अशी मागणी देखील करण्यात आली.

कर्जत तालुक्यात पोशिर आणि शिलार या दोन ठिकाणी धरणे बांधण्यात येणार आहेत. या धरणांना शासनाने मंजुरी दिली असून शासनाच्या भूमिकेला दोन्ही प्रस्तावित धरणांच्या परिसरात राहणाऱ्या शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. या धरणांना तीव्र विरोध करण्यासाठी दि.१७ मार्च रोजी



■ बैठकीत शेतकऱ्यांकडून एकमुखी ठराव

■ संमतीशिवाय कामे न करण्याची मागणी

हजारो शेतकऱ्यांनी एकत्र येत मोर्चा काढला होता. त्यावेळी कर्जत उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी पाटबंधारे खात्याच्या प्रतिनिधींसोबत सर्वांची बैठक घेऊ, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार नुकतीच प्रांत अधिकारी कार्यालयात बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ, तहसिलदार डॉ. धनंजय जाधव, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता संजीव जाधव, उप अभियंता संजीव शिंदे, विनोद कंक यांच्यासह कर्जतचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने, नायब तहसीलदार अजित पवार हे अधिकारी उपस्थित होते. तर, शासनाच्यावतीने धरणाला विरोध करणाऱ्या शिलार धरण प्रकल्पग्रस्त समिती, स्थानिक शेतकरी मंडळ बोरगाव पोशीर धरण विरोधी समिती आणि कर्जत तालुका आगरी समाज संघटनांना निमंत्रित केले होते. या बैठकीत दिनेश रसाळ, ॲड. अहिर, भरत डोंगरे, लक्ष्मण पोसाटे, नंदकुमार खडेकर, समीर खेडकर, संतोष पेरणे आणि भरत भगत यांनी मतं मांडली.

धरणाच्या परिसर सुरु असलेली कामे बंद करण्याची मागणी केली. त्याचवेळी शेतकऱ्यांची संमती नाही तोवर धरणाचे कोणतेही काम सुरू करू नये. आमच्या भागात पूर्ण विकास झाला असून येथील फार्म हाऊसमध्ये काम करून बहुसंख्य लोकांचे उदरनिर्वाह होतात. आमच्या जमिनीला चांगला भाव असून

> आम्ही शासन म्हणून पाटबंधारे खाते आणि शेतकरी यांचा समन्वय घालून देण्याचा प्रयत्न केला आहे.शेतकऱ्यांचे जमिनीत जाऊन माती परिक्षण करताना संबंधित ग्रामपंचायत यांना कळवावे. कोणतीही वेगळी कामे करू नये, अशा सूचना पाटबंधारे खात्याला आहेत.
> – प्रकाश संकपाळ, प्रांत अधिकारी

आम्हाला जमीन विकायची नाही. आमच्या भागात चांगली वनसंपदा असून पर्यावरणाचा ऱ्हास करून आम्हाला धरण नको. पोशीर धरण आम्हाला नको आणि शेतकऱ्यांची परवानगी नसताना तुम्ही आमच्या जमिनीत कसे काय पाऊल ठेवू शकता? आम्हाला कुठे जमीन देणार? घरे बांधायला जागा देणार याबाबत लेखी खुलासा करावा आणि सध्या

> शासनाने आम्हाला आमच्या जमिनींच्या बदल्यात जमीन द्यावी. वन विभागाला जमिनीच्या बदल्यात जमीन देता, मग आम्हाला पण हाच नियम असावा. कारण येथील वन जमीन ही पूर्वी आमच्याच बापजाद्यांची होती.
> – नंदकुमार खेडेकर

केले जात असलेले माती परिक्षणाचे अहवाल आम्हाला मिळावे. तसेच, पोश्री नदीवर धरण होणार असल्याने धरणाचे नाव बदलावे. पाणी वितरण १०० टक्के होणार असेल तर आमच्या तालुक्याला धरणात अडवलेल्या पाण्याचा काय फायदा होणार? पुनर्सवन अन्य ठिकाणी केल्याने नातेसंबंध संपुष्टत येणार. तसेच, धरणाच्या खाली असलेली गावे वाड्या यांच्या पाण्याचा प्रश्न कसा सोडवणार? असे प्रश्न उपस्थित केले.

# नागावमध्ये शेकापच्या प्रचाराचा धमाका

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील नागाव, वैजाली व खंडाळे ग्रामपंचायतीच्या ३ सदस्यपदांच्या जागांसाठी निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने प्रचाराला सुरूवात करण्यात आली आहे. नागाव ग्रामपंचायत सदस्यपदाच्या उमेदवार मंजुषा राणे यांच्या प्रचाराला वेग आला असून घरभेटीतून त्यांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. नागावचे सरपंच हर्षदा मयेकर यांच्यासह निखील मयेकर असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते, सदस्य या प्रचारात सहभागी झाले. त्यामुळे पहिल्या दिवसांपासूनच प्रचाराला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. दरम्यान,



शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनीदेखील नागावमध्ये भेट देऊन मतदारांना भेटून मतदान करण्याचे आवाहन केले.

यावेळी अलिबाग तालुक्यातील वैजाली ग्रामपंचायतीच्या एक सदस्यपदासाठी दोन, नागावच्या एक सदस्यपदासाठी दोन आणि खंडाळेच्या एक सदस्यपदासाठी तीन उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. वैजाली, खंडाळे व नागाव या ग्रामपंचायतीच्या तीन सदस्यपदाच्या जागांसाठी पोट निवडणूक होणार आहे. दि.२८ एप्रिलमध्ये सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार आहे. मतमोजणी दुसऱ्या दिवशी दि.२९ एप्रिलला होणार आहे. नागाव

■ मंजुषा राणे यांना उत्स्फूर्त प्रतिसाद

ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाच्या उमेदवार मंजुषा राणे, वैजाली ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाचे उमेदवार नंदकुमार पाटील, खंडाळे ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाचे उमेदवार समिक्षा गुरव हे शेकापचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे. नागाव ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाच्या उमेदवार मंजुषा राणे यांचा प्रचार गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. घरोघरी जाऊन मतदारसंघातील मतदारांना भेटून मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. मंजुषा राणे यांना प्रचारातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले आहे.

## आमिष दाखवून लाखोंची फसवणूक

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

फॉरेक्स ट्रेंडिंगमध्ये अधिकच्या परताव्याचे आमिष दाखवून चौघांची २८ लाख ४० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिवशंकर यादव हे करंजाडे सेक्टर १ येथे राहत असून त्यांची ओळख सचिन गुंजाळ यांच्याशी झाली. यावेळी फॉरेस्ट ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवून दर महिन्याला परतावा म्हणून चार ते सहा टक्के रक्कम देत असल्याचे समजले. त्यावेळी त्याने त्याचे फॉरेस्ट ट्रेंडिंगचे खाते दाखवले. पैसे बुडाले तर लोकांचे पैसे कसे देणार, असे विचारले असता त्याच्याकडे भरपूर प्रॉपर्टी आहे. ती विकून लगेच तो लोकांचे पैसे देईल, असे त्यांनी सांगितले होते. त्यामुळे शिवशंकर यांनी १ लाख रुपये गुंतवले. त्यावेळी दर महिन्याला तो सहा टक्के परतावा देत होता. त्यामुळे शिवशंकर यांनी ६ लाख ८२ हजार रुपये गुंतवले. मार्च २०२४पर्यंत नियमित परतावा मिळाला. परंतु, त्यानंतर परतावा मिळालाच नाही. सचिन गुंजाळ याला संपर्क केला असता तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्याच्या नवीन कार्यालयाला भेट दिली असता त्याने वेगवेगळी कारणे सांगितली. खारघर येथील कार्यालयाला भेट दिली असता ते ऑफिसही बंद केले होते. अशा प्रकारे शमा परवीन यांची १५ लाख रुपये, सुमित जा यांची ५ लाख ५४ हजार रुपये व विलास कांबळे यांची १ लाख १ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे त्यांना समजले. याबाबत सचिन बापू गुंजाळ याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गळ्यातील सोन्याचे पदक लंपास

**नवीन पनवेल :** ८० वर्षीय महिलेच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे पदक चोरल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगलाबाई भोईर असे या महिलेचे नाव असून त्या नितळस येथे वास्तव्यास आहेत. त्या दि.१८ एप्रिल रोजी रात्री ९.०० वाजताच्या सुमारास घरामध्ये बसल्या होत्या. त्यावेळी चोरट्याने त्यांच्याजवळ जात त्यांच्या गळ्यातील सोन्याचे पदक खेचून अंधारात पळून गेला.

# भारताचा कम्युनिस्ट पक्षाच्या आंदोलनाची वर्षपूर्ती

| उरण | प्रतिनिधी |

नवी मुंबईतील बेलापूर येथील सिडको भवनच्या गेटसमोर प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांसाठी भारताचा कम्युनिस्ट पक्षातर्फे बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. त्याला आता १ वर्ष पूर्ण होणार आहे. त्यानिमित्त सिडको भवनासमोर आंदोलनाचा वर्षपूर्ती कार्यक्रम मंगळवारी (दि.२८) दूपारी २.०० वाजता आयोजित केला आहे. या वर्षपूर्ती कार्यक्रमाला सर्व प्रकल्पग्रस्त, शेतकरी व भूमीपुत्रांनी

■ विविध मागण्यांसाठी अखंडितपणे पाठपुरावा सुरु

मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सिडकोने रायगड व नवी मुंबई मधील जमिनी घेऊन 'तुमचा विकास करतो', अशी आशा दाखवून स्वतःचाच विकास केला. मात्र, येथील शेतकरी प्रकल्पग्रस्त गावाभोवती होणाऱ्या विकासाला स्वतःचा विकास



समजू लागला. प्रस्थापित राजकीय पक्षांचे पुढारी सिडकोचे ठेकेदार व दलाल बनून शेतकऱ्यांच्या बाजूने उभे न राहता सिडकोच्या बाजूने उभे राहिले आहेत. त्यामुळे सिडकोची ताकद वाढली. शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन स्वतःचाच विकास केला. शेतकऱ्यांच्या लढ्यातून मिळालेले १२.५ टक्क्याचे प्लॉट देण्यास सिडको गेली कित्येक वर्षे टाळाटाळ करीत आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर सुद्धा वाढीव परतावा देण्यास सिडको टाळाटाळ करीत आहे. वाढीव गावठाणे अतिक्रमित, अनधिकृत ठरवून पाडण्याच्या नोटीसा कोर्टाकडून आणत आहे. या सर्व प्रश्नांच्या विरोधात भारताचा कम्युनिस्ट पक्षातर्फे दि.२८ एप्रिल २०२५ पासून नवी मुंबई मधील बेलापूर येथील सिडको भवनच्या गेटसमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु आहे. तेव्हा हे आंदोलन पुढे नेण्यासाठी व यशस्वी करण्यासाठी हया लढयात आपण सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेलच्या पाणीटंचाईवर दुहेरी उपाययोजना

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढती पाणीटंचाई लक्षात घेता दीर्घकालीन आणि तातडीच्या उपाययोजना राबवण्याची मागणी पुढे आली आहे. त्यासाठी कर्जत तालुक्यातील शिलार धरण प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याबरोबरच नवी मुंबई महानगरपालिकेकडून ३० अतिरिक्त पाणी मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी


● (छायाचित्र : राजेश डांगळे)

नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून या दोन्ही मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. शिलार धरण प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी मिळाली असून, या प्रकल्पासाठी सुमारे ४८०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी सुमारे ३६७२ कोटी रुपयांचा आर्थिक भार पनवेल महानगरपालिकेवर पडणार असल्याने, एवढा मोठा निधी उभारणे पालिकेसाठी शक्य नसल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी शासनाने तातडीने अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, पनवेल शहरात सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेकडे त्यांच्या गरजेपेक्षा अधिक पाणी उपलब्ध असल्याने, त्यातील किमान ३० एमएलडी पाणी पनवेलला देण्यासाठी शासनाने आदेश द्यावेत, अशीही विनंती करण्यात आली आहे. पनवेलची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि वाढती पाण्याची गरज लक्षात घेता तातडीचे तसेच दीर्घकालीन उपाय आवश्यक आहेत. त्यामुळे शासनाने या दोन्ही मागण्यांवर लवकर निर्णय घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पनवेलमध्ये महिलेवर जीवघेणा हल्ला

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून चाकू आणि लोखंडी स्टिकने मारून जखमी केल्याप्रकरणी कारचालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पायल चौधरी असे या महिलेचे नाव असून त्या रिसवाडी येथे वास्तव्यास आहेत. त्या दि.२३ एप्रिल रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास दुचाकीवरून कळंबोली येथून रसायनी येथे जात होत्या. पावणेएकच्या सुमारास पळस्पे फाटा जवळून जात असताना दुसऱ्या गाडीला जाण्यासाठी रस्ता कमी पडत होता. त्यावेळी त्यांच्या पाठीमागून चारचाकी गाडी चालक त्यांना ओव्हरटेक करायला लागला. त्यावेळी त्याने महिलेला शिवीगाळ करत्याने कारच्या डिकीमधून लोखंडी स्टिक आणि चाकू काढून पायलच्या हातावर मारून तिला जखमी केले.

निवृत्ती म्हणजे नव्या पर्वाची सुरुवात | चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन

# दत्तात्रेय ठाकूर यांचा सेवापूर्ती सोहळा

| अलिबाग | प्रतिनिधी |

सेवापूर्ती सोहळ्याचा हा क्षण म्हणजे आनंद आणि भावनांचा संगम. अनेक वर्षे आपण शिक्षण क्षेत्रात निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि समर्पणाने कार्य केले. आपल्या मार्गदर्शनामुळे या विभागातील असंख्य विद्यार्थ्यांचे जीवन उजळले, त्यांना योग्य दिशा मिळाली. आपण या शाळेत फक्त मुख्याध्यापक नव्हता, तर एक मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि आदर्श व्यक्तिमत्त्व होता. आपल्या कार्याचा ठसा प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशात दिसून आला. निवृत्त होणे म्हणजे शेवट नाही, तर आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे, असे



● (छायाचित्र : अमोल नाईक)

प्रतिपादन पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी केले.

पीएनपी काचळी-कुसुंबळे या शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रेय ठाकूर यांचा सेवापूर्ती सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्याला पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यावेळी त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, दत्तात्रेय ठाकूर हे ३३ वर्ष प्रदीर्घ सेवा करून पीएनपी काचळी-कुसुंबळे या शाळेच्या मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद आणि समाधान लाभो ही सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. पुढे मार्गदर्शन कराना म्हणाल्या की, गरजू व ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण देणे हीच खरी समाजसेवा आहे. शिक्षणामुळेच त्यांच्या आयुष्यात बदल घडू शकतो. प्रत्येक विद्यार्थ्याने शिकले पाहिजे, हा ध्यास घेतल्यास आपण एक सशक्त आणि प्रगत समाज घडवू शकतो. हे मनाशी बाळगून रायगडचे भाग्यविधाते भाऊ प्रभाकर पाटील यांचे शिक्षण संस्था सुरू करण्याचे स्वप्न भाई जयंत पाटील यांनी पाहिले आणि पीएनपीच्या खेडोपाड्यात मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळा, कॉलेज सुरू करून शैक्षणिक जाळे उभे केले. या संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी शिकून स्वतःच्या पायावर उभी राहिलीत याचा अभिमान वाटतो. पीएनपी संस्थेचे माजी कार्यवाह दि. रा. फुलगावकर यांचे स्मरण संस्थेला कायम राहील. संथेच्या जडणघडणीत त्यांचे सुद्धा मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांनी नेमणूक केलेले मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी संस्थेसोबत कायम जोडून राहिले आहेत आणि शैक्षणिक दृष्ट्या संस्थेचा नावलौकिक वाढवत आहेत याचा अभिमान वाटतो, असे त्यांनी सांगितले. तसेच, शाळा समिती आणि पीएनपी संस्थेच्यावतीने चांगला कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल संस्थेतील पदाधिकाऱ्यांचे देखील चित्रलेखा पाटील यांनी कौतुक केले.

यावेळी संस्थेच्या वतीने दत्तात्रेय ठाकूर यांना संस्थेचे मानपत्र, पुष्पगुच्छ, मायेची शाल तसेच त्यांच्या पत्नी वैशाली ठाकूर यांना मायेची शाल आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी शाळा समिती सदस्य मच्छिंद्र पाटील, सामाजिक कार्यकर्ते हेमनाथ खरसंबळे, काचली केंद्र प्रमुख सुविधा पाटील, ना.ना. पाटील हायस्कूल पोयनाडचे मुख्याध्यापक शशिकांत पाटील, संस्थेच्यावतीने हिरेन राठोड, विक्रांत वार्डे, अमोल नाईक, मनिषा रेलकर, दिनेश पाटील, पीएनपीच्या विविध शाळांचे मुख्याध्यापक, शाळेचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि ठाकूर यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

# पानांच्या पत्रावळ्या, द्रोण नामशेष

## • पाश्चात्य संस्कृतीच्या परिणाम; थर्माकोल, कागदी पत्रावळीचा सर्रास वापर

**। धाटाव । शशिकांत मोरे ।**

सध्या लग्न सराई जोरात असून यासारख्या वेगवेगळ्या सामुहिक कार्यक्रमात जेवणावळीसाठी वापरण्यात येणाऱ्या पळस, कुडा, मोहा सारख्या झाडांच्या पानांच्या पत्रावळ्या आणि द्रोण नामशेष झाल्याचे निदर्शनास येत आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या परिणामामुळे पानांच्या पत्रावळींची जागा आता थर्माकोल आणि कागदी पत्रावळीने घेतला आहे. त्यामुळे लग्न सोहळ्यात जेवणावळीत वापरण्यात येणाऱ्या पानांच्या पत्रावळ्या आणि द्रोण ही परंपरा कालबाह्य होत असल्याचे पहावयास मिळत आहे. तसेच, अधुनिक पत्रावळ्यांच्या अतिवारामुळे त्याचा विपरित परिणाम पर्यावरणासह मानवी आरोग्यावरही होत असल्याचे तज्ज्ञांकडून बोलले जात आहे.

भारतीय संस्कृतीत पर्यावरण आणि निसर्गाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. एकीकडे आपण आधुनिकीकरण आणि पाश्चात्य संस्कृती आत्मसात करीत असून आपल्या जीवनमानातून आणि संस्कृतीमधून हळूहळू दूर होत चाललो आहोत. त्यापैकी लग्न सराई किंवा इतर मोठ्या सोहळ्यात जेवणावळीत वापरल्या जाणाऱ्या पानाच्या पत्रावळी. सामुहीक किंवा वैयक्तिक धार्मिक कार्यक्रमात जेवणावळीसाठी ग्रामीण भागात शेजारची मंडळी कोणताही मोबदला न घेता नजीकच्या जंगलात जाऊन पळस, कुडा, मोह या झाडांची पाने तोडून आणून तिची चौकात बसून पत्रावळी तयार करून घेत असत. त्यामुळे ज्याच्यांकडे कार्यक्रम आहे, अशांना आर्थिक खर्चातून मोठा दिलासा मिळत असे. ही परंपरा हजारो वर्षांपासून चालत आलेली असून आयुर्वेदीक साक्ष देखील देते. या पानाच्या पत्रावळी तयार करण्यासाठी लिंबाच्या किंवा बांबूच्या काड्याचा शिलक म्हणून वापर केला जात असे. अजूनही ग्रामीण



भागात घरगुती कार्यक्रमात पानांच्या पत्रावळीत देवाला नैवेद्य मांडले जात आहे. पानांच्या पत्रावळीमुळे भोजनावळीची रांग देखील शोभून दिसत होती. मात्र, अलीकडे पानाच्या पत्रावळी ऐवजी सर्रास थर्माकोल व कागदी पत्रावळीचा वापर अधिक होत असल्यामुळे दिवसेंदिवस हा सेवाभाव देखील समाजातून कमी होताना दिसत आहे.

सन २०१८ पासून शासनाने थर्माकोलच्या पत्रावळ्यांवर बंदी घातल्यावर पुन्हा पारंपरिक व आरोग्यवर्धक अशा पानांच्या पत्रावळींना चांगले दिवस येतील, अशी आशा होती. परंतू, शासनाच्या कागदोपत्री बंदीवर हवातसा कोणताही परिणाम झालेला दिसत नाही. सामुहीक कार्यक्रमातून हजारो लोकांनापत्रावळीवर वाढण्यासाठी वाढप्यांना पंगत बसवावी लागते. त्यासाठी जास्त वेळ आणि मनुष्यबळ देखील लागते. त्यामुळे आधुनिक धावपळीच्या काळात पाश्चात्य बफे पद्धत सोयीस्कर मानली जातो. लग्नात हजारो लोकांची गर्दी असते. बफेमध्ये उभे राहून जेवण केले जाते. त्यामुळे पानाची पत्रावळीवर जेवण घेणं जिकरीचे ठरते. त्यामुळे त्याऐवजी प्लास्टिक, कागद किंवा थर्माकोलची ताट-वाट्या वापरल्या जातात. पूर्वी सहज उपलब्ध असणाऱ्या केळी व पळसाच्या पत्रावळींची जागा आता थर्माकोल आणि प्लास्टिकने घेतली आहे. यामुळे पर्यावरणासह मानवी आरोग्याला देखील धोका निर्माण होत आहे.

### कुटुंबावर उपासमारीची वेळ

जंगलालगतच्या गावांतील महिलांना पत्रावळीतुन रोजगार मिळायचा. त्यांचा घरगुती लघु उद्योग असायचा. घरातील सर्व मंडळी पानाच्या पत्रावळी तयार करण्यास मदत करीत होते. लग्न समारंभ काळात चार पैसे कमावून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवीत होते. मात्र, या कुटुंबावर आता उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. शहरी भागात मोठमोठी मंगल कार्यालये, सभागृह तसेच ओपन स्पेसमध्ये कार्यक्रम आटोपल्यानंतर भोजनावळीत बफे पद्धतीत प्लास्टिकचे ताट, वाटी, ग्लास हमखास दिसून येतात. त्यामुळे आता हाच प्रकार ग्रामीण भागातही पाहायला मिळत आहे. पानाच्या पत्रावळीची जागा आता प्लास्टिक, कागद व थर्माकोल ताटांनी घेतली आहे. त्यामुळे हा कमी भांडवल असलेला लघु उद्योगही हरवला आहे.

# आरोग्य केंद्रालाच उपचाराची गरज

**। आपटा । प्रतिनिधी ।**

आपटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र १९९५ साली बांधण्यात आले होते. परंतु, सध्या या केंद्राची दुरवस्था झाली असून केंद्राची इमारत अनेक ठिकाणी मोडकळीस आली आहे. या ठिकाणी परिसराती ३५ गावे व ४१ वाड्यांतील रूग्ण उपचारासाठी येत असतात. मात्र, या प्राथमिक आरोग्य केंद्रलाच उपचाराची गरज असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

आपटा या प्राथमिक आरोग्य केंद्रात परिसरातील ३५ गावे व ४१ वाड्यांतील रूग्ण येत असतात. हे आरोग्य केंद्र या परिसरामध्ये एकमेव असे ठिकाण असल्यामुळे सर्व औषध उपचार या भागातील लोकांना मिळत असतो. या केंद्राच्या अंतर्गत शिरढोण, गुळसुंदे व वावेघर हे तीन लहान आरोग्य केंद्र आहेत. परंतु, या भागातील हे जुने प्राथमिक आरोग्य केंद्र असून येथे अनेक सोयी सुविधा उपलब्ध नाहीत. याठीकाणी नर्स, शिपाई आणि सफाई कामगारांची वानवा आहे. तसेच, येथील हॉलमध्ये बसण्यासाठी खुर्च्या देखील नाहीत. या केंद्रात प्रसुतीगृह देखील आहे. परंतु, या ठिकाणी मुबलक सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने फार कमी प्रमाणात या ठिकाणी महिला प्रसुतीसाठी येतात. त्याचबरोबर आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरवस्था झाली असून अनेक ठिकाणी मोडकळीस आली आहे. त्यामुळे ही इमारत आता पूर्ण नवीन केली पाहिजे, यासाठी बांधकाम विभागाकडे विनंती अर्ज केलेले आहेत. तसेच, येथे पूर्ण सुविधा मिळायला पाहिजेत. केंद्रात कायम डॉक्टर राहिले पाहिजेत, त्याचबरोबर येथे राहण्यासाठी त्यांना रूम उपलब्ध करून दिला पाहिजे. याबाबत जिल्हा परिषद अध्यक्षांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे परिसरातील नागरिकांमधून बोलले जात आहे.

# गोरेगावातील जनआक्रोश मोर्चा स्थगित

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

लोणेरे येथील लॉजवर झालेल्या तरुणीच्या निर्घृण हत्या प्रकरणी अद्यापही आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी (दि.२५) लोणेरे व गोरेगाव बंद ठेवत सर्व पक्षीयांकडून जन आक्रोश मोर्चा काढण्याचे नियोजन करण्यात आले होते. या हत्या प्रकरणी आरोपीला दोन दिवसांत अटक करू, अशी ग्वाही रायगड पोलीस प्रशासनाने गोरेगाव येथे येऊन सर्वपक्षीय आंदोलनकर्त्यांना



दिली आहे. त्यानंतर सर्वपक्षीय आंदोलनकर्त्यांनी पोलिसांना सहकार्य करण्याच्या भूमिकेतून हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची माहिती अरुण चाळके व नरेश अहिरे यांनी प्रसारमाध्यमांना दिली. या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिक्षा चालकांवर कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर रेल्वे स्थानक परिसरात बेशिस्त रिक्षा चालकांविरोधात विशेष कारवाई करण्याकरिता खारघर वाहतूक शाखा व पनवेल प्रादेशिक परिवहन विभागांची संयुक्त कारवाई मोहीम आयोजित करण्यात आली. या विशेष कारवाईमध्ये एकूण ६५ बेशिस्त रिक्षा चालक, तसेच इतर वाहन चालकांविरुद्ध मोटर वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. या कारवाई दरम्यान फिटनेस संपलेल्या २ रिक्षा पुढील करवाईसाठी ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

# जागतिक पशुवैद्यकीय दिन साजरा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड-जंजिरा नगरपरिषदेतर्फे नुकताच जागतिक पशुवैद्यकीय दिन साजरा करण्यात आला. यावेळी नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, पशुवैद्यकीय व्यवसाय हा केवळ प्राण्यांच्या आरोग्याशी संबंधित नाही, तर तो समाजाच्या आरोग्याशी आणि पर्यावरणाच्या संतुलनाशीही निगडित आहे. आजच्या काळात पशुवैद्यकीय क्षेत्रात या तिन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण आपल्याला प्राण्यांचे आरोग्य जपतानाच मानव आणि पर्यावरण



(छायाचित्र: गणेश चोडणेकर)

यांच्यातील समतोल राखावा लागतो. या 'जागतिक पशुवैद्यकीय दिना'च्या निमित्ताने आपण सर्वजण असा संकल्प करूया की, पशुवैद्यकीय क्षेत्रात आणि आपल्या जीवनातही विविधता, समता आणि समावेशकता यांना प्रोत्साहन देऊ, असे प्रतिपाद उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी केले आहे.

# अ‍ॅड.सूरज पंडित काँग्रेस सचिवपदी

**कर्जत** : लाखरण येथील सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले अ‍ॅड. सुरज पंडित यांची काँग्रेस पक्षाच्यावतीने महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अ‍ॅड. सुरज पंडित हे गोरगरिबांच्या हक्क आणि अधिकारांसाठी सातत्याने झटत असतात. सामाजिक न्याय, सर्वसामान्यांच्या समस्या आणि युवकांच्या प्रश्नांवर ते नेहमीच सक्रियपणे काम करत आले आहेत. पक्ष संघटनेत सर्व जाती-धर्मांना एकत्रित जोडण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे केले आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना, समाजातील वाढता जातीयवाद, आर्थिक विषमता आणि सर्वसामान्यांच्या



वाढत्या अडचणी यांची जाणीव त्यांना प्रकर्षाने झाली. काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून त्यांनी पक्षवाढीसाठी स्वतःला वाहून घेतले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस मिलिंद पाडगावकर आणि जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी अ‍ॅड. सुरज पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ही जबाबदारी सोपवली आहे.



# हिवताप दिनानिमित्त प्रभात फेरी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

जागतिक हिवताप दिनानिमित्त रसायनी-मोहोपाडा येथे प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. उपकेंद्र मोहोपाडा व वासांबे यांच्यावतीने आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. सकाळी ९.०० वाजता सुरू झालेल्या या प्रभात फेरीत सुमारे ४० विद्यार्थी व ४ शिक्षक सहभागी झाले होते. तसेच, आरोग्य सेवक गणेश भगत, रोशन निंबाळकर, दादासाहेब जगताप व आशा सेविका यांनीही सक्रिय सहभाग घेतला. या प्रभात फेरी दरम्यान 'हिवतापाला आळा घाला', 'स्वच्छता ठेवा, डास दूर ठेवा' अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी परिसरात जनजागृती केली. तसेच, नागरिकांना हिवताप प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# अतिक्रमण हटाव मोहीम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेमार्फत गेल्या काही दिवसांपासून अतिक्रमण हटाव संदर्भात मोठ्या प्रमाणात मोहिम सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत कोणत्याही अतिक्रमणाबाबत दुर्लक्ष केले जाणार नाही. तसेच, या कामाबाबत कसूर करणाऱ्यांच्याबाबत गय केली जाणार नाही. अतिक्रमणाबाबत कारवाई करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत दक्षतेने, जागरूकतेने कारवाई करावी. कोणत्याही अमिषास बळी पडू नये, अन्यथा त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देशआयुक्त मंगेश चितळे यांनी दिले आहेत.

# रोह्यातील शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

रोह्यात एमओसी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर पनवेल आणि जाधव नर्सिंग होम रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रोहा मेडिकल फाऊंडेशन यांच्या सौजन्याने मोफत मेमोग्राफी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. गेल्या काही वर्षांपासून सातत्याने डॉ. अशोक जाधव या शिबिराचे आयोजन करीत आहेत. गुरुवारी (दि.२३) मोफत मेमोग्राफी शिबीर पहिल्या ३० महिलांसाठी आयोजित करण्यात आले होते. याठिकाणी महिलांची मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. जाधव नर्सिंग होमचे डॉ. अशोक जाधव, डॉ. संदेश शिंदे, डॉ. अनामिका लोहार,




डॉ. सर्जिल करजीकर, डॉ. रुकय्या अन्सारी, एम.ओ.सी.कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर स्टाफ, नितीन पटेल, सतीश पारेकर, ऋतूषा बामणे, सुगुप्ता खान यांसह त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.

## माथेराननने गाठला गर्मीचा उच्चांक | नव्या वृक्षलागवडीच्या नियोजनाची गरज

# वाढती वृक्षतोड पर्यवरणाला बाधा

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

घाटमाथ्यावर होणारी भरमसाठ वृक्षतोड आता माथेरानच्या मुळावर उठली असून, यावर्षी माथेरानमध्ये गर्मीचा उच्चांकी नकोसा विक्रम नोंदला गेला आहे. त्यामुळे माथेरानमध्ये पुन्हा एकदा वृक्ष लागवड व त्याचे संगोपन व्हावे, तो फक्त दिखावा न करता झाडे जगवण्याकरिता प्रयत्न झाला पाहिजे, अशी चर्चा समोर येत आहे.

माथेरान या ठिकाणी थंड हवेचा आस्वाद घेण्याकरिता देश विदेशातून अनेक पर्यटक घेत असतात. परंतु, मागील काही वर्षांपासून माथेरान मधील हवामानामध्ये कमालीचा बदल घडत आहे. कधीही न जाणवणारी



(संग्रहित छायाचित्र)

गर्मी माथेरानमध्ये आता शिरकाव करू लागली आहे. यंदा तर माथेरानने प्रथमच गर्मीचा उच्चांक गाठला असून, येथील तापमान ४० अंश सेल्सिअसवर पोहोचले होते. त्यामुळे माथेरान या पर्यटनस्थळा करिता ही धोक्याची घंटा आहे. त्यामुळे स्थानिकांनी वेळेतच सावध होणे गरजेचे आहे.

दरम्यान, माथेरानच्या चारी बाजूस असणाऱ्या अनेक वाड्यांमधून येथील झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल होत आहे. ही कत्तल रोखण्यासाठी वन विभाग सपशेल अपयशी ठरलेला आहे. माथेरान येथून नेरळकडे जाणाऱ्या डोंगर रांगांत तर जंगलच शिल्लक राहणार नाही, अशी परिस्थिती काही वर्षांमध्ये होणार आहे. रोजच मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करून लाकडे जमा करणारी मंडळी घाटामध्ये दिसत असतात. परंतु, त्यावर कारवाई होत नाही. त्यातच माथेरानमध्ये नैसर्गिक आपत्तीतून अनेक झाडे उन्मळून पडली आहेत. परंतु, या झाडांना पर्यायी वृक्षारोपण करून जंगल वाढवण्याचे प्रयत्न अपयशी ठरलेला आहे. वनविभाग दरवर्षी वृक्षारोपण करते, परंतु त्यातील किती झाडे जगतात? हा संशोधनाचा विषय आहे. वृक्षारोपण करणे व त्याचे संवर्धन करणे यामध्ये मोठी तफावत माथेरानमध्ये पहावयास मिळत आह. या वेळेला नवीन वनसंवर्धन समिती होणार आहे. त्यामुळे ते 'वृक्षारोपण' हा फक्त प्रयोग न करता त्यांच्या संवर्धनावर भर देतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# निवडक

## रातवड विद्यालयाचे घवघवीत यश



**माणगाव** : माणगाव तालुक्यातील माध्यमिक रातवड विद्यालयाने एन.एम.एम.एस.शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपला शैक्षणिक दर्जा पुन्हा अधोरेखित केला आहे. या परीक्षेचा निकाल शुक्रवारी (दि.२४) जाहीर झाला. या परीक्षेत विद्यालयातील श्रवण शिर्के, आर्या पालकर व आयुष म्हस्के हे तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीत पात्र ठरले असून, शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष त्यांनी दिली आहे. रातवड विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत असल्याचे या यशातून स्पष्ट झाले आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक संतोष कदम, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच शिक्षणप्रेमी यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मनापासून अभिनंदन केले. तसेच, संस्था अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शाळा समिती अध्यक्ष सुनील पाटील, सामाजिक कार्यकर्ते कृष्णाजी महाडिक व इतर मान्यवरांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मंगेश पवार यांचा 'भारत' सन्मान

**माणगाव** : इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन मुंबई यांच्यातर्फे माणगाव तालुक्यातील मांगवली गावचे सामाजिक कार्यकर्ते मंगेश पवार यांना राज्यस्तरीय 'भारत सन्मान पुरस्कार'ने सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम रविवारी (दि.१९) कल्याण (प) येथाल के.एम. अग्रवाल कॉलेज येथे पार पडला. यावेळी मुख्य तपासिक मुंबई रामजीत गुप्ता, इंडियन एअर



फोर्सच्या इतिशा चव्हाण, मानवाधिकार जागतिक मानव पुणे संस्थापिका अध्यक्ष प्रीती सावंत, डॉ.दिगंबर तायडे, संस्थापिका ए स्टार टूर्स आणि ट्रायव्हल्स अश्विनी चुरी, विमल बिडवे, जितेंद्र जोशी व नझहत अन्सारी आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. मंगेश पवार यांना इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन (अँन्टी पायरसी सेल) मुंबई यांच्यातर्फे मानाच्या राज्यस्तरीय भारत सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## ज्योती पाटील आदर्श मुख्याध्यापिका



**उरण** : जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट दादर यांच्यातर्फे २४ एप्रिल रोजी संस्थेचा वर्धापन दिन छबीलदास हायस्कुल येथे साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम विविध मान्यवर व संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी उरणमधील ज.ए.इ.ची इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पाटील यांना आदर्श मुख्याध्यापिका, तर एन.आय. हायस्कूलमधील वरीष्ठ लिपिक प्रदिप म्हात्रे यांना शाळेकरीता व विद्यार्थ्यांकरीता उत्तम कामगिरी केल्याबद्दल आदर्श पुरस्कार देण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उपमहापौर संजय घाडी, मुकुंद चितळे, देवचंद राका आदी मान्यवर उपस्थित होते. यादरम्यान, ज्योती पाटील व प्रदीप म्हात्रे यांना आदर्श पुरस्कार मिळाल्याने या दोघांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## उत्सव समिती कार्यकारिणीची निवड

**उरण** : रायगड जिल्ह्यात श्री छत्रपती संभाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. जिल्ह्यात सर्वात मोठी जयंती उरण मध्ये छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्ध नौका ग्रुप व ग्रामस्थ मंडळ चिरनेर यांच्या माध्यमातून साजरी केली जाते. यंदा १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराजांची ३६९वी जयंती उरण तालुक्यातील चिरनेर येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या उत्सवानिमित्त नुकतेच चिरनेर येथे संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत श्री छत्रपती संभाजी महाराज उत्सव समितीची कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी सचिन केणी, कार्याध्यक्षपदी योगेश गावंड, उपाध्यक्ष शैलेश चिर्लेकर, सचिव ऋषिकेश कडू, सहसचिव मयुरेश सिंग, समन्वयक महेश केणी, सदस्य पृथ्वीराज कडू, सदस्य जित तांडेल, सदस्य आदित्य केणी यांची निवड झाली आहे. हे सर्व पदाधिकारी, सदस्य श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव सोहळा साजरी करण्यासाठी सज्ज झाले आहेत.



## कचरा, ड्रेनेज समस्येवर कारवाई

**पनवेल** : महानगरपालिका प्रभाग क्रमांक ८ मधील के.एल.२ सेक्टर ५ परिसरात कचरा साचणे, तसेच ड्रेनेज लाईन बंद होण्याच्या समस्येमुळे रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी नगरसेवक रामदास शेवाळे यांच्याकडे निवेदन देऊन तक्रार नोंदवली होती. नागरिकांच्या अडचणीची गंभीर दखल घेत नगरसेवक शेवाळे यांनी तात्काळ पनवेल महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. त्यांच्या पुढाकारामुळे प्रशासनाने कोणताही विलंब न करता के.एल. २ परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. तसेच, ड्रेनेज लाईन दुरुस्तीचे कामही तत्काळ सुरू करण्यात आले. सध्या या भागात साफसफाई आणि ड्रेनेज दुरुस्तीची कामे वेगाने सुरू असल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ एप्रिल

१) श्री. दिनकर हरी जाधव आवास, अलिबाग, २६-४-१९४३

२) श्रीम. अनिता कृष्णा म्हात्रे विद्यानगर, अलिबाग २६-४-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



**कै. दामोदर भिकू तेलंगे, वर्ष श्राद्ध, आंग्रे नगर, रेवदंडा अलिबाग**

# पनवेलमध्ये रिक्षांवर झळकले मराठी बॅनर

## • परप्रांतीय चालकांच्या विरोधात मोहीम; महाराष्ट्रात राहणाऱ्या मराठी भाषा आलीच पाहिजे

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) रिक्षांवर ममराठीफ भाषेचे स्टिकर लावण्याची विशेष मोहीम राबवली आहे. पनवेल रेल्वे स्थानक परिसर आणि शहराच्या विविध भागांत मनसे कार्यकर्त्यांनी रिक्षांना हे स्टिकर्स लावले आहेत.




परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ मे २०२६ पासून रिक्षाचालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतल्याच्या पार्श्वभूमीवर मनसे या मोहिमेद्वारे मराठी रिक्षाचालकांच्या पाठीशी उभी राहिली आहे. रिक्षांवर मी मराठी बोलतो, मला मराठी समजते, माझ्या रिक्षात बसा अशा आशयाचे स्टिकर्स लावण्यात येत आहेत.

मराठी रिक्षाचालकांनी या मोहिमेचे स्वागत केले असून त्यांच्यात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण आहे. मराठी भाषेच्या मुद्द्यावरून परप्रांतीय चालकांच्या वाढत्या प्रभावाविरोधात ही मोहीम मराठी चालकांना पाठबळ देणारी ठरत आहे.

महाराष्ट्रात राहणाऱ्या आणि व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक रिक्षाचालकाला मराठी भाषा आलीच पाहिजे, अशी ठाम भूमिका मनसेने घेतली आहे. मराठी सक्तीला विरोध करणाऱ्या आणि संप पुकारणाऱ्या संघटनांना मनसेने कडक इशारा दिला आहे.

या आंदोलनात पराग बालड, सचिन जाधव, जिल्हा सचिव अतुल चव्हाण, तसेच वाहतूक सेनेच्या उपाध्यक्ष पूनम जैस्वाल आणि विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष अमर पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या आंदोलनामुळे पनवेलमधील मराठी रिक्षाचालकांना एक वेगळी ओळख आणि सन्मान मिळत असून प्रवाशांनीही मराठी भाषिक चालकांच्या रिक्षांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन मनसेतर्फे करण्यात आले आहे.

# मान्सूनपूर्व कामे पूर्ण करण्याचे महावितरणापुढे आवाहन

**| तळा | प्रतिनिधी |**

गेल्यावर्षी प्रमाणे यावर्षी देखील पावसाचे आगमन लवकरच होणार असल्याचे संकेत हवामान खात्याकडून देण्यात आल्याने पावसाळी पूर्व कामे पूर्ण करण्याचे महावितरण विभागापुढे आवाहन असणार आहे. तळा तालुक्यात भारनियमनामुळे वीज गायब होण्याचे प्रमाण जास्त आहे. ग्राहकांकडून वीज बिल वसुली करण्यात नेहमी अग्रेसर असलेल्या महावितरण विभागाला सुरळीत वीज पुरवठा ठेवणे मात्र नेहमी अवघड जाते. पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असून पावसाळ्यापूर्वी महावितरण विभागाकडून करण्यात येणारी कामे अद्यापही करण्यात आलेली नाहीत. जीर्ण झालेले विद्युत खांब, विद्युत तारांजवळ वाढलेली झाडे, उघड्या डीपी यांसारखी आदी कामे अद्यापही महावितरण विभागाकडून करण्यात आलेली नाहीत. महावितरण विभागाचे कर्मचारी वीजबिल वसुलीच्या कामात एवढे मग्न झाले आहेत. झाडे तोडणे, बॉक्स मेंटनन्स, ब्रेकर मेंटेनन्स, जिओडी मेंटेनन्स, जीर्ण खांब बदलणे यांसारखी पावसाळी पूर्व कामे महावितरण विभागाकडून पूर्ण केली जातात. मात्र, सध्या सुरू असलेला विजेचा लपंडाव पावसाळ्यातही कायम राहिला नाही म्हणजे झालं अशी अपेक्षा तळावासीयांकडून व्यक्त केली जात आहे.

# लॅपटॉपची चोरी

**नवीन पनवेल :** सेक्टर १२, कळंबोली येथील घरात प्रवेश करून चोराने मोबाईल व लॅपटॉप चोरून नेले. या प्रकरणी २२ एप्रिल रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सौरभ सिंग हे सेक्टर १२, कळंबोली येथे राहत असून २२ एप्रिल रोजी त्यांच्या घरात आरोपीने प्रवेश करुन घरातील २६ हजार रुपये किमतीचे ४ मोबाईल, १५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरून नेले.

# महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

खांदेश्वर रेल्वे स्थानक ते मानसरोवर रेल्वे स्थानक दरम्यान उभारण्यात येत असलेल्या पंतप्रधान आवास योजनेच्या परिसरात महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, नागरिकांकडून तातडीने पोलीस गस्त वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात कामोठे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. सदर परिसरात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अंधार आणि निर्जनता असते. त्यामुळे महिलांना रात्री तसेच दुपारच्या शांत वेळेत रेल्वे स्थानकाकडे जाताना भीतीच्या वातावरणात प्रवास करावा लागत आहे. विशेषतः पहाटे ४:३५ ची लोकल पकडण्यासाठी जाणाऱ्या नोकरदार महिला व नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. स्थानिकांच्या मते, या परिसरात सोनसाखळी चोरी,

# वसंत सुतार यांना देवज्ञा

**| अलिबाग| प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील परहूर पाडा गावचे वसंत रामचंद्र सुतार यांचे शुक्रवारी ( दि.२४) एप्रिल २०२६ रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्षाचे होते.



ते अतिशय प्रेमळ व मायाळू स्वभावाने तसेच दादा नावाने सर्वांना परिचित होते. तसेच ते सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय होते. त्यांनी गावातील प्रत्येक सुख-दु:खाच्या प्रसंगी नेहमीच त्यांनी सहकार्याची भावना जोपासून सामाजिक बांधिलकी जोपासली होती.

त्यांच्या निधनाने सुतार परिवारासह सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यविधीसाठी त्यांचे नातेवाईक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रातील असंख्य मान्यवर, तसेच समस्त परहूर पाडा ग्रामस्थ उपस्थित होते.

त्यावर परहूर पाडा येथील स्मशान भूमीत अत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, एक मुलगा, सुन, नातवंडे व सुतार परिवार आहे.

त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि.३ मे २०२६ रोजी तर उत्तरकार्य विधी मंगळवार दि. ५ मे २०२६ रोजी त्यांच्या परहूर पाडा येथील निवास्थानी होणार आहेत, असे सांगण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये कर्करोग प्रतिबंध मोहिमेला वेग

**| पनवेल | प्रतिनिधी |**

महिलांच्या आरोग्य सुरक्षेला प्राधान्य देत पनवेल महानगरपालिकेने कर्करोग प्रतिबंध, लवकर निदान व जनजागृती मोहिमेला वेग दिला आहे. यासाठी टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई आणि पनवेल महानगरपालिका यांच्यात विशेष करार करण्यात आला असून आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. या कराराच्या अनुषंगाने टाटा मेमोरियल सेंटरच्या प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी सर्व्हिसेस व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने सामान्य कर्करोगांचे प्रतिबंध, नियंत्रण व लवकर निदान या विषयावर एएनएम व स्टाफ नर्सेससाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा दोन टप्प्यांत पार पडली. ही कार्यशाळा २५ व २७ मार्च तसेच १६ व १७ एप्रिल २०२६ रोजी सिडको समाज केंद्र, कामोठे येथे आयोजित करण्यात आली होती.

# गॅस तुटवड्याबाबत उपोषणाचा इशारा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

आखाती देशातील युद्धामुळे घरगुती गॅस सिलेंडर यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. हा तुटवडा दूर करण्यासाठी केंद्र सरकारकडून घरगुती गॅस सिलेंडर यांचे वितरण बाबत आराखडा तयार केला आहे. भारत गॅसकडून संपूर्ण कर्जत तालुका ग्रामीण म्हणून नोंदणीकृत असल्याने किमान २५ ते ४५ दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. दरम्यान हा कालावधी कमी करावा या मागणीसाठी कर्जत येथे पोलीस मित्र संघटना उपोषण करणार असल्याचे जाहीर केले आहे.

आखाती देशातील युद्धाचे पार्श्वभूमीवर देशभरात घरगुती वापराचे सिलेंडर यांच्याबाबत निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार कर्जत तालुक्यातील गॅस सिलेंडर नोंदणीसाठी तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहे. कर्जत तालुक्याला भारत गॅस प्राधिकरणाकडून ग्रामीण अशी नोंद आहे. त्यामुळे ज्यांच्याकडे एक गॅस सिलेंडर आहेत असे ग्राहक हे आपला घरगुती गॅस सिलेंडर दर २५ दिवसांनी बुक करू शकतात.त्यानंतर ज्या ग्राहकांकडे दोन गॅस टाक्या आहेत, अशा ग्राहकांना दर ३५ दिवसांनी आपल्या नवीन गॅस सिलेंडरसाठी नोंदणी करता येऊ शकते.तर उज्वला गॅस सिलेंडर नोंदणी असलेल्या ग्राहकांना ४५ दिवसांनी नवीन सिलेंडरची नोंदणी करू शकतात. त्यामुळे कर्जत तालुक्यात कर्जत येथील दोन आणि नेरळ येथील एक अशा तिन्ही गॅस एजन्सीकडून नियमाचे काटेकोरपणे पालन केले जात आहे.

मात्र, नगरपरिषद दर्जा असलेल्या कर्जत शहर भागासाठी गॅस बुकींगसाठी २५ दिवसाचा करण्यात यावा. भारत पॅट्रोलीयम कार्पोरेशन लिमिटेड गॅस कंपनी कर्जत शहरी भागासाठी ४५ दिवस वेळ देऊन अन्यायकारक आहे. कर्जत तालुक्यातील भारत पॅट्रोलीयम कार्पोरेशन लिमिटेड, गॅस कंपनी कर्जत शहरी भागात राहणाऱ्या महिला ग्राहकांना ग्रामीण भागाचा नियम लादुन ४५ दिवसानंतर गॅस बुकींग करत आहे. त्यामुळे त्यांना २५ दिवस गॅस पुरेसा होत नाही व त्यांच्यावर कंपनी अन्याय करत आहे. या संदर्भात आपण आणि आपल्या पुरवठा विभागाच्या अधिकारी यांनी किशन जावळे जिल्हाधिकारी तथा रायगड जिल्हा पुरवठा शाखा अधिकारी यांना व भारत पॅट्रोलीयम कार्पोरेशन लिमिटेड, गॅस कंपनीला पत्रव्यावहार करण्यात आला आहे.

भारत पेट्रोलियम आणि सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात कर्जत येथे पोलीस मित्र संघटना उपोषण करणार आहे. कर्जत येथील लोकमान्य टिळक चौकात उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला असून पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम हे उपोषण करणार आहेत.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २६ एप्रिल ते २ मे २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग

मोबा.९४०४७९१७९८

## ज्येष्ठांचे मार्गदर्शन घ्या

**मेष :** राशीधारकांनी या सप्ताहात आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे जोडीदाराकडून प्रेमाचा वर्षाव होईल. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. नोकरदारांनी कामावर व्यवस्थित लक्ष देणे गरजेचे आहे. लहानशी चूक ही त्रासदायक ठरू शकते. मित्रवर्गांकडून दिलासा मिळेल. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. प्रलोभनापासून दूर राहा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आर्थिकबाजू ठीक राहील. आपणास येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी ज्येष्ठांचे मार्गदर्शन मोलाचे ठरू शकते. दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आपण आपले आत्मपरीक्षण करणे योग्य. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाहीत, याची दक्षता घ्या. सकारात्मक विचार करून मानसिकता चांगली ठेवण्याचा प्रयत्न करा. **महिलांना** : मनातील साचलेले विचार दूर सारले तर कामातील प्रगती वेगात होईल मुलांची प्रगती सुखावह ठरणारी असेल. **शुभ दिनांक** : २७,२८

## वादाचे प्रसंग टाळा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहात आपण मुलांशी सामजंस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. त्यामुळे घरातील वातावरण आनंदी राहील, नसीबाची साथ नसली तरीही चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. नाहीतर विसरभोळेपणा अभ्यासास मारक ठरू शकतो. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपण आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. नोकरदारांना दिलासा मिळेल. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. कितीही राग आला तरी शांततेच धोरण ठेवणे आपल्याला हितकारक आहे. **महिलांना** : आपण तीर्थयात्रेचा बेत केला असेल, तर त्याला पूर्ण रूप देण्यास हरकत नाही बऱ्याच दिवसांनी पर्स गरम राहील, सोने खरेदी करू शकाल. **शुभ दिनांक** : २९,३०

## हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहात कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. सर्व बाबतीत आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उपयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. दुसऱ्याच्या मताने कोणतेही काम करू नका सल्ला फक्त आपल्याच माणसाचा घ्या. थोडे काम थोडा आराम हे धोरण लांब ठेवणे हिताचे आहे. **महिलांना** : वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा कळवधी अत्यंत शुभ आहे. घर, गाडी, बंगला या बाबत केलेली हालचाल सत्कारणी लागेल. आपले खिसा पाकीट भरलेले राहील फक्त ते सांभाळून ठेवणे गरजेचे आहे. **शुभ दिनांक** : ०१,०२

## प्रलोभनात अडकू नका

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चाताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्न करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, मोसमी आजारापासून सावध राहा. नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू पडण्याचा प्रसंग आला तरी सावध राहून वागा कला क्रीडा यात आपले मन रमणार आहे, खेळाडून सुवर्ण संधी मिळण्याचे योग आहेत अडकलेली कामे यावेळी पूर्ण करू शकणार आहात. विशेषता पासपोर्ट बाबतचे काम पूर्ण होऊ शकेल. **महिलांना** : उधारी घेऊ नका देऊ नका डोक्यावर ताण यणारे काम करू नका हवी तर योग्य विश्रांती घ्या त्या मुळे कामाला हुरूप येईल. **शुभ दिनांक** :२६,२७

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**सिंह** : राशीसाठी या सप्ताहात आपणास मिळणारा फुरसतीचा वेळ आपण नि:स्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपली अडकलेली कामे पूर्ण होतील. नवीन नोकरीसाठी प्रयत्न केल्यास यश मिळेल. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावे. त्यामुळे होणारी भानगड टाळता येईल. **महिलांना** : वड्याचे तेल वांग्यावर काढू नका, आपला राग आपल्या ताब्यात ठेवलात तर आपल्याला कोणीच जिंकू शकणार नाही. आपली वेळ आली की आपल्या परड्यात भरभरून दान पडणार आहे त्यासाठी संयम आवश्यक आहे. **शुभ दिनांक** : २८,०१

## अनावश्यक खर्च टाळा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात आपले आर्थिक बजेट वाढणार असल्याने आपण प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावेत. त्याचप्रमाणे सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करावे. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. व्यापार-उद्योगात प्रगती करण्याची संधी मिळेल. प्रकृतीबाबत अधिक खबरदारी घ्यावी. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाही याची दक्षता घ्या. प्रवासात सावधानता बाळगा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. आपल्या कामात वेळीच स्वतः लक्ष द्या. दुसऱ्यास ढवळाढवळ करण्यास वाव देऊ नका. आजारच्या बाबतीत विशेषतः मोसमी आजार होणार नाहीत याची काळजी घ्या. आपल्या बोलण्याने गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. चुकीचा मार्ग स्वीकारणे कटाक्षाने टाळा. लांब वर प्रवास करण्याचा बेत आखाल. आपले परगावी असलेले नातलग घरी येतील त्यांच्याकडून लाभ संभवतो आहे. **महिलांना** : एखादी चांगली बातमी कानावर पडणार आहे. मुलांची प्रगती अनुभवायला येईल, धनलाभ होईल. **शुभ दिनांक** : २९,३०

## ज्येष्ठांशी सल्लामसलत करा

**तुळ** : राशीसाठी या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता आपण कोणतीही, कसलीही चिंता न करणे आपणास हितकारक ठरू शकते. चिंता करून प्रश्न सुटत नाही, पण त्याचा परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. तेव्हा मनात येईल तसे वागण्याचा प्रयत्न करा. घरच्या समस्या सोडविता येतील. महत्त्वाचे निर्णय ज्येष्ठांशी सल्लामसलत करूनच सोडविण्याचा प्रयत्न करावा. वैवाहिक जीवनात सामंजस्याने वागणे योग्य राहील. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा त्यामुळे गैरसमज होण्याची शक्यता असते. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आपण आपले अस्तित्व शाबूत ठेवण्यास हा काळ उत्तम आहे, पर्यायाने आपण योग्य वेळी त्याचा योग्य उपयोग करून घ्या. मात्र कायदा व नियम यांचे पालन कटाक्षाने करा. सकारात्मक दृष्टिकोनातून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **महिलांना** : महिलांना आरोग्याच्या बाबत्तीत उत्तम कालावधी आहे. स्पर्धेत बाजी मारू शकाल. शत्रूना त्यांची जागा दखवून द्याल. **शुभ दिनांक** : २६,०२

## घरच्या कामांना प्राधान्य द्या

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता ते बऱ्यापैकी आहे. हातात पैसे येतील बचत करू शकाल. आपण करीत असलेल्या कार्याला प्रयत्नांची जोड दिल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. आपले कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दक्षता घ्या. कायद्या विरुद्ध असलेली कामे टाळावीत वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. विद्यार्थ्यांनी आपल्या अध्ययनात अधिक लक्ष द्यावे. हितशत्रूंच्या कारवायांवर नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दखल घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. ग्रहमान पाहता ते बऱ्यापैकी आहे. नोकरदारांना दिलासा मिळेल. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम प्रोत्साहन मिळेल. मित्रमंडळी, आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे इष्ट राहील. गैरसमज होणार नाहीत याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दखल घ्या. प्रकृती स्वास्थ्य जपा. घरगुती कामकाजांना प्राधान्य द्या व ते हातावेगळे करण्याचा प्रयत्न करा. **महिलांना** : या आठवड्यात आपल्याला भेट मिळेल, जिवलगा बरोबर बाहेर जाण्याचा बेत तडीस जाईल. **शुभ दिनांक** : २७,०१

## अनपेक्षित खर्चात वाढ होईल

**धनु :** राशीसाठी या सप्ताहाचे सुरवातीच्या दिवसात व्यावसायिक व व्यक्तीगत संबंधांच्या बाबतीत आपण अधिक उत्साह दाखवाल. आपल्यात कितीही उत्साह असला तरी तो इतरांसाठी त्रासदायी ठरणार नाही याची आपणास काळजी घ्यावी लागेल. आपण जर जीवनातील काही तथ्य समजून घेऊन ते अमलात आणलेत तर हे दिवस आनंदात घालवू शकाल. आपल्या भिन्नलिंगी संबंधातील जवळीक वाढेल. या दरम्यान वस्त्रालंकार, हौसमौज करण्याच्या वस्तू इत्यादीसाठी खर्चाची किंवा खरेदीची शक्यता आहे. आपल्या जवळ आर्थिक सुबत्ता असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवल्यास उर्वरित रक्कम गुंतवणूक करून किंवा अन्य मार्गाने खर्च करून आपल्या फायद्यात वाढ करू शकाल. शक्य असल्यास कर्ज किंवा उधारी करणे टाळावे. काही अनपेक्षित खर्च उद्‌भवल्याने आपणास कर्ज किंवा उधारी करावी लागण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी किंवा सरकारी विभागात शक्यतो अधिकारी वर्गाशी व प्रतिष्ठित व्यक्तींशी वाद टाळावेत. **महिलांना** : घरात एखादी किमती वस्तु येईल, छोटे दुखणे अंगावर काढू नये नाहीतर मोठे दुखणे होऊ शकते. **शुभ दिनांक** : २८,२९

## पुष्कळशा गोष्टी मनासारख्या होतील

**मकर :** राशीसाठी या सप्ताहात आपण स्वकर्तृत्वावर लक्ष केंद्रीत केल्यास पुष्कळशा गोष्टी मनासारख्या होऊ शकतील. घरातील प्रत्येकाला जबाबदारी सोपविण्याची कामगिरी पार पडावी लागेल, एखादा महत्वाचा कार्यक्रम विसरू नका. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. आर्थिक गुंतवणूक सध्या टाळा. प्रकृती स्वास्थ्याकडे अधिक लक्ष द्या. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, उष्णतेचे विकार सांभाळा. कष्टाशिवाय यश मिळविता येत नाही हे लक्षात ठेवा. दुसऱ्यावर कामे सोपविण्याआधी स्वयंसिद्ध व्हा व स्वकर्तृत्वावर भर द्या. आपण आपल्या कामावर अधिक लक्ष दिल्यास आपला यशाचा मार्ग अधिक सुकर होईल. आपले इतरांशी मतभेद होणार नाही याची खबरदारी घ्या. जेथे शक्य आहे तेथे तडजोडीचे धोरण स्वीकारणे योग्य होईल. कुठल्याही मोहाला बळी पडू नका. आपल्या हितशत्रूंना संधी देऊ नका. घराबाबतच्या प्रश्नांना चालना मिळेल. मुलांनी अध्ययनात अधिक लक्ष द्यावे. वादविवादापासून दूर राहा. **महिलांना** : हातात धन येणार आहे त्याचा वापर व्यवस्थित करण्याची गरज आहे. एखादी जुनी उधारी आपल्याला परत मिळेल प्रयत्न करा. **शुभ दिनांक** : ३०,०१

## धार्मिक कार्याला वेळ द्या

**कुंभ :** राशीसाठी या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता आपणास दैनंदिन कामकाजात येणारे प्रश्न वादविवाद न करता चर्चेने सोडविणे अधिक हितकारक ठरेल. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. आपल्या प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, उष्णतेचे विकार याबाबत सावध राहा. धार्मिक कार्याला वेळ द्याल. सरकारी कामात अधिक लक्ष द्या. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. प्रलंबित कामे वेग घेतील. आपली कोणत्याही कारणांनी मानसिकता बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. नातलग, मित्रमंडळी यांच्या वागण्याने व बोलण्याने आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घेतल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या हुशारीने, प्रसंगानुरूप वागण्याचा प्रयत्न केल्यास सारे काही साध्य करता येईल. काही भाग्यवंतांना विवाहबाबतचे प्रस्ताव येऊ शकतील. **महिलांना** : येणाऱ्या समस्यांवर आपण त्यांचे निराकरण करू शकाल व आपल्या ध्येयाकडे वाटचाल कराल. घराकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. बचत करू शकाल. **शुभ दिनांक** :२७,०२

## कामाचे नियोजन करा

**मीन :** राशीसाठी या सप्ताहात कामाचे नियोजन केल्यास कामाचा भार कमी होऊ शकेल. खरेदीचे बेत साध्य होतील. खरेदीच्या निमिताने फिरणे ही होईल मात्र, मित्र परिवारात शाब्दिक चकमकी मात्र कटाक्षाने टाळा. नोकरदारांना दिलासा मिळेल. मनासारखी बढती मिळू शकेल फक्त बदली लांब वर होण्याची शक्यता राहील त्या साठी ओळख लावावी लागेल, आर्थिक गुंतवणूक मात्र तज्ञांच्या सल्ल्याशिवाय करू नका. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक सावध राहा, विशेषतः उष्णतेचे विकार व अपचन विकार. आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक ठेवा. कोणालाही शब्द अथवा आश्वासने देण्याचे टाळल्यास हा आठवडा बऱ्यापैकी चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. कामकाजात घाईगडबड टाळा. विचारपूर्वक निर्णय घ्या. **महिलांना** : अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आपला प्रभाव इतरांवर पाडू शकाल. मनावर दडपण न घेता कार्य करत रहा उधारी बाबत योग्य काळजी घेणे गरजेचे आहे पैशाच्या व्यवहारात सावध राहणे महत्वाचे आहे. मुलांना मार्गदर्शन करावे लागेल. **शुभ दिनांक** : २६,२९

# उरण नगरपरिषदेतर्फे लाल मैदानावर स्वच्छता



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी आणि नागरिकांना स्वच्छ व सुसज्ज क्रीडांगण उपलब्ध करून देण्यासाठी उरण नगरपरिषदेच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान (लाल मैदान) येथे विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी स्वतः बुलडोझर चालवून या मोहिमेचे नेतृत्व केले आणि स्वच्छतेचा नवा आदर्श घालून दिला. मैदानाची दुरवस्था आणि वाढलेला कचरा लक्षात घेता, नगरपरिषदेने सकाळपासूनच ही व्यापक मोहीम हाती घेतली. सफाई कामगारांच्या खांद्याला खांदा लावून नगराध्यक्षांनी कामात सहभाग घेतला.मैदानाची व्याप्ती मोठी असल्याने नगरपरिषदेच्या नियमित कर्मचाऱ्यांसोबतच अतिरिक्त मनुष्यबळ आणि आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला. यामुळे मैदानातील कचरा आणि झाडेझुडपे काढण्याचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे. याप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा भावना घाणेकर म्हणाल्या की, सावरकर मैदान हे आपल्या शहराचे वैभव असून ते स्वच्छ ठेवणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. ही मोहीम केवळ आजपुरती मर्यादित नसून, शहर स्वच्छतेचा हा संकल्प पुढेही असाच सुरू राहील.

उरण नगरपरिषदेने या मोहिमेच्या माध्यमातून स्वच्छ उरण, सुंदर उरण असा संदेश दिला आहे. मैदानावर कचरा न टाकता त्याचे पावित्र्य राखण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले असून, आगामी काळात शहरातील इतर सार्वजनिक ठिकाणीही अशाच मोहिमा राबवल्या जाणार आहेत.

# धनगरमलाई-दांडगुरी रस्ता जीवघेणा

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळापासून धनगरमलई मार्गे बोर्लीपंचन, दिवेआगर, श्रीवर्धन जाणाऱ्या रस्त्याची अक्षरशः चाळन झाली असून रिक्षा आणि दोन चाकी वाहनांचा आणि वाहन चालकांच्या जीवावरचा खेळ झाला आहे. याच मार्गांवर वागेश्वरी हे नवसाला पावणारे देवस्थान असून दरवर्षी मार्च एप्रिल दरम्यान वागेश्वरी येथे फार मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. मुंबई-पुण्याहून मोठ्या प्रमाणात भाविक यात्रेसाठी येत असतात. त्या भाविकांचे मुख्य वाहन म्हणजे रिक्षा, परंतु स्त्याची अवस्था पाहिली तर सहजा सहजी रिक्षावाला जाण्यास तयार होतं नाही. धनगरमलई पर्यंत ५ कि. मी. रस्त्याची दुरावस्था इतकी वाईट आहे कि या रस्त्यावरून रिक्षाचं काय पण धड चालणेही अवघड झाले आहे. या मार्गांवर ८ ते१० लहान मोठी गावे व वाड्या आहेत. यांचे बाजारहाट साठी मुख्य ठिकाण म्हसळा असून एस. टी. दिवसातून एखाद दुसरी फेरी होते त्यामुळे खाजगी वाहनानशिवाय दुसरा पर्याय नाही. या रस्त्यावरून वरवटणेकोंड, साळविंडे, देवळाची वाडी, बागाची वाडी, कासारकोंड, धनगरमलई, देवखोल, आणि पुढे श्रीवर्धनला आणि दिवेआगर असा हा रस्ता जोडला गेला आहे. तसेच नागरिकांना भाड्या साठी जास्त पैसे मोजावे लागत आहे त्यामुळे नागरिकांमध्ये त्रिव नाराजी निर्माण झाली.

# ए.टी.पाटील विद्यालयात सेवापूर्ती सोहळा




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील वाशी येथील ए. टी. पाटील विद्यालयाच्या सागर शिक्षण मंडळाच्या वतीने सहायक शिक्षक प्रमोद नामदेव झाल्टे यांच्या सेवापुर्ती सोहळ्या निमित्त सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान व्ही बी पाटील यांनी भूषविले होते. यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष श्रीकांत पाटील, प्रसाद पाटील, चंद्रकांत पाटील, प्रदीप चंद्र म्हात्रे, गणेश थवई, मुख्याध्यापक रोटे, एम. एन. पाटील, ज्ञानदेव म्हात्रे, मुख्याध्यापिका डोईफोडे, व्ही. के. पाटील, कवी-लेखक एम. जी. म्हात्रे, मढवी, कावरे, अमोल गीतांजली पाटील, शाम घरत,घरत, प्रीती गुडदे, पत्रकार उत्तम म्हात्रे, गायिका ऋतुजा पार्टे तसेच शिक्षक वृंदा उपस्थित होते. सत्कारमूर्ती यांच्या अर्धांगिनी मंजुषा झाल्टे आणि परिवार यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. आपल्या सेवाकाळात प्रमोद झाल्टे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले. तसेच त्यांनी करावते गाण्यासाठी वर्ड रेकॉर्ड ऑफ इंग्लंड सहभाग नोंदवून विशेष उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्याची प्रशंसा करताना उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## जाहीर नोटीस

तमाम जनता, वित्तीय संस्था व संबंधित विभागांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग, सजा तलाठी सासवणे, गाव सासवणे येथील गट क्र. २९४ मधील क्षेत्रफळ ०.१२.३० हे. आर. चौ.मी., पोट खराब ०.००.५० हे.आर.चौ.मी. असे एकूण क्षेत्रफळ ०.१२.८० हे.आर.चौ.मी. मिळकती बाबत आमचे अशिल श्री. सचिन बाबूराव बडवे यांची आर्थिक गुंतवणुक आहे. शेतमिळकतीबाबतचे मुळ दस्तावेज आमचे अशील श्री. सचिन बाबूराव बडवे यांचे अधिकारात व कस्टडीमध्ये असून सदर शेत शेतमिळकत श्री. सचिन बाबूराव बडवे यांचे ताबे व कब्जेवहिवाटीत आहे. या शेत मिळकतीबाबत इतर कोणतीही व्यक्ती यांनी विक्री, पुनर्विक्री, खरेदी, तारण, गहाण, करार, हस्तांतरण, बोजा निर्माण करणे अथवा कोणत्याही तृतीय पक्षाचा हक्क निर्माण करण्याचा थेट किंवा अप्रत्यक्ष कोणताही व्यवहार करु नये. याउपर कोणीही असा कोणताही व्यवहार केल्यास, तो व्यवहार आमचे अशिल श्री. सचिन बाबूराव बडवे यांच्यावर अथवा सदर शेत मिळकतीवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही व असा व्यवहार कायद्याने अवैध, अमान्य व शून्य समजण्यात येईल, याची तमाम जनता, वित्तीय संस्था व संबंधित विभागाने स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २६/०१/२०२६

सही/-
**चैतन्य सुनिल खंदारे**
**ॲडव्होकेट**
ऑफीस - १३१७ दलामल टॉवर, फ्री,
प्रेस जनरल मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई

## सोन्याचे पदक चोरले

**नवीन पनवेल :** ८० वर्षीय महिलेच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे पदक चोरल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात १९ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मंगलाबाई भोईर या नितळस येथे राहत असून १८ एप्रिल रोजी त्यांचे कुटुंबीय हळदीसाठी गेले होते. रात्री नऊच्या सुमारास त्या घरामध्ये बसल्या होत्या. रात्री साडेनऊच्या सुमारास एक अनोळखी पुरुष त्यांच्याजवळ आला आणि त्यांच्या कडील सोन्याचे पदक गळ्यातून खेचून तो अंधारात पळून गेला.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतींचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खांडपोली, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार रु पैसे |
|---|---|---|---|
| (१) सुहास आबा माने रा.कामोठे पनवेल रायगड | १३७ | ७.४८.०० | १.८८ |
| २) बल्र्युन डिसोझा रा.कुर्ला वेस्ट मुंबई | १३८ | ००.९१.०० | ०.२५ |
| ३) अबा दत्तू माने रा.कामोठे पनवेल रायगड | १३९ | ००.९३.०० | ०.२५ |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींच्या मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतींचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकवीस) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतींमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २५/०४/२०२६

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## REVOCATION OF PUBLIC NOTICE

Notice is given to Public at large that undersigned had issued a Public Notice issued in daily newspaper "Krushival" dated 24.04.2026 in respect of all that piece and parcel of land bearing Gat No. 141 admeasuring 01.96.00 H.R. Sq. Mtrs., Assessed to Rs. 3.56 Ps., and situated at Village Mhatroli, Taluka Alibag, District Raigad. In the said Public Notice, the term 'my Client' is mentioned at Paragraph No. 1 of the said Public Notice. Said term 'my Client' is mentioned out of mistake. Therefore, I hereby on instructions revoke the said Public Notice issued in daily newspaper "Krushival" dated 24.04.2026 in its entirety. In view of the same, this Revocation of Public Notice is issued.

Date : 24.04.2026

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office at B/202, Kuberakshe CHS,
Near Maruti Naka, Alibag, Taluka
Alibag, Dsitrict Raigad, 402 201.


## PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY

**Teaching Staff Required**

Prabhakar Patil Education Society is one of the leading Education society, working since 2001. We run various English-medium schools (affiliated with CBSE and the State Board) located at Veshvi (Alibag), Nagaon, Sambari (Kurdus), and Khalapur.

**Requirement :** Teachers for Pre-Primary, Primary and Secondary Sections.

**Subjects:** English, Mathematics, Science, Social Studies, Sanskrit, French, Art & Craft, Physical Education (P.T.), Karate, Marathi, Hindi.

**Qualification for Teachers :** Post Graduates or Graduates with M.Ed., B.Ed., D.Ed., ECCED, M.P.Ed., or B.P.Ed.

**Note:** Fluency in English is mandatory.

**Salary Scale:**

Teachers: Upto 30,000 per month,

(Salary will be commensurate with experience and qualifications.)

**For More Details Please Contact & Apply On:**

Rajashree Patil – 9892150116

Email: pnp.rajashree@gmail.com

Ankit Bhanushali – 9823897088

Email: ankitbhanushali02@gmail.com

**Interview Date :-** 27th April 2026

Timing :- 12 p.m. to 4 p.m

Venue :- PNP Education Society's Central office, Opposite Durg Suruchi Vada, Veshvi, Alibag, 402201


## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मौजे वाडगांव, ता.अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती.संध्या रामदास घरत, (पुर्वाश्रमीची नाव शांताबाई मरबा भगत) यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वाडगांव ता.अलिबाग | १२६ पै | ००-३१-७०<br>पो. ख. ००-०२-७०<br>एकुण क्षेत्र ००-३४-४० | ७.३७ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ८(आठ) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी कळावे,

अलिबाग,
दिनांक- २५/०४/२०२६

सही /
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय अलिबाग
जि. रायगड ४०२२०१
मो. नं. ९७६४२१४०१०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकती सदरील मिळकतींचे विद्यमान मालक १) श्रीमती सुजाता नारायण राऊत, रा. तळवली, २) श्रीमती सिमा संजय करोडेकर, रा. पेण, ३) श्रीमती आशा सुनील मयेकर, रा. थळ, ४) श्रीमती सविता लक्ष्मण जाधव, रा. उसर, ५) श्रीमती निलम नामदेव रांजणकर, रा. थळ, आणि ६) श्री. कुंजन नारायण राऊत, रा. तळवली यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्याबाबत उभयपक्षी प्राथमिक चर्चा सुरू आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे तळवली तर्फे खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| अ. क्र. | गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ६० | ०-४५-००<br>०-०३-०० | १४.१० | १) श्रीमती सुजाता नारायण राऊत,<br>२) श्रीमती सिमा संजय करोडेकर,<br>३) श्रीमती आशा सुनील मयेकर,<br>४) श्रीमती सविता लक्ष्मण जाधव,<br>५) श्रीमती निलम नामदेव रांजणकर. |
| २ | वर नमुद मिळकतीस लागुन असलेले वर नमुद क्र. ६) श्री. कुंजन नारायण राऊत यांचे नावे असलेले ग्रामपंचायत, खंडाळे घर क्र.१९ व त्या सभोवतालची मोकळी जागा. | | | |

वर नमुद मिळकती व सदरील मिळकतींपर्यंत पोहोचण्याकरता उपलब्ध असलेला कायमचा वहिवाटीचा रस्ता अशा सर्व मिळकतींसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारणगहाण, लिज, लिन, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे मार्ग अथवा इतर कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकवीस) दिवसांचे सादर करावी. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल सदरील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : २५/०४/२०२६

**ॲड. जयेश अ. जोशी**
९३२, टिळक रोड, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या बागायती मिळकती त्यात स्थित असलेल्या घर मिळकतीसह विद्यमान मालक श्रीमती कस्तुर उर्फ कस्तुरबेन दामजी वेलाणी व श्री.राहुल दामजी वेलाणी, रा. घाटकोपर, मुंबई यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्याबाबत उभयपक्षी सामंजस्य करारनामा सुद्धा स्वाक्षरीत करण्यात आलेला आहे. आमच्या अशीलांनी वर नमुद मालकांचे खाली वर्णन केलेल्या मिळकतींमधील मालकी हक्कांचा शोध घेऊन टायटल सर्च रिपोर्ट देण्याची विनंतीही केलेली आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे इंद्रपै, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती**

| अ. क्र. | गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ७४ | ०-०६-५० | १.५५ | श्रीमती कस्तुर उर्फ कस्तुरबेन दामजी वेलाणी श्री. राहुल दामजी वेलाणी |
| २ | ८० | ०-०५-२० | १.२३ | श्रीमती कस्तुर उर्फ कस्तुरबेन दामजी वेलाणी |
| ३ | ८२ | ०-०५-०० | १.१५ | श्री. राहुल दामजी वेलाणी |

व अ.क्र. १ कडील मिळकतीमध्ये स्थित असलेले ग्रामपंचायत आवास घर क्र. १३८ ही घर मिळकतसुद्धा.

तरी वर नमुद बागायती मिळकती व त्यातील घर मिळकत या संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारणगहाण, लिज, लिन, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे मार्ग अथवा इतर कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत सादर करावी. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल सदरील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : २५/०४/२०२६

**ॲड. जयेश अ. जोशी**
९३२, टिळक रोड, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मौजे मान तर्फे झिराड, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) गजानन विठ्ठल पाटील, २) श्रीनाथ विठ्ठल पाटील ३) रविंद्र विठ्ठल पाटील, ४) विदया विश्वनाथ पाटील ५) सनिल विश्वनाथ पाटील, ६) सुलोचना चंद्रकांत पाटील, ७) स्वप्नील विश्वनाथ पाटील, ८) संगीता कृष्णा म्हात्रे, ९) स्नेहल सप्रेम म्हात्रे यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मान तर्फे झिराड ता.अलिबाग | ६६/४/ क | ००-१२-६०<br>पो. ख. ००-००-५०<br>एकुण क्षेत्र ००-१३-१० | २.२५ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील ८(आठ) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी
कळावे.

अलिबाग,
दिनांक- २६/०४/२०२६

सही /
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय, अलिबाग
जि. रायगड ४०२२०१
मो. नं. ९७६४२१४०१०

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक रामचंद्र नथु शिंदे मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे आमणोरी, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ३७/१/ब | ०-२६-२० | ८-०० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि. २६/०४/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
कार्यालय-कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा, तालुका सुधागड, जिल्हा रायगड पिन-४१०२०५
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

## PUBLIC NOTICE

This is to inform the public that Mr. Meet Gopalbhai Shaha ("Owner") has informed that he is the sole and absolute owner of property set out in the Schedule hereto ("Scheduled Property") and that he is in lawful and peaceful possession thereof, and that his title is clear, marketable, and free from all encumbrances. I am instructed to issue this Public Notice for the sole purpose of verifying the said Owner's right, title and interest to the Scheduled Property.

All person(s) claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Scheduled Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/decree/judgment of any court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known writing to the undersigned at the within mentioned address, within ten (10) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Scheduled Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned for all intents and purposes.

This Public Notice issued on this 25 day of April, 2026.

**Schedule above referred to**

All that piece and parcel of freehold land bearing Gat No. 68 admeasuring 01-12-00 H-R-sqm, assessed to Rs. 1.94 Ps and situated at village Dattapada, Taluka Alibaug, District Raigad.

**Adv. S.Y.Bartake**
**Adv. S.S. Bartake**
Office at B/202, Kuberakshe CHS, Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad 402201.

## PUBLIC NOTICE

This is to inform the public that Mrs. Sejal Gopalbhai Shaha ("Owner") has informed that she is the sole and absolute owner of the property set out in the Schedule ("Scheduled Property") and that she is in lawful and peaceful possession thereof, and that her title is clear, marketable, and free from all encumbrances. I am instructed to issue this Public Notice for the sole purpose of verifying the said Owner's right, title and interest to the Scheduled Property.

All person(s) claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Scheduled Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/decree/judgment of any court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known writing to the undersigned at the within mentioned address, within ten (10) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Scheduled Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned for all intents and purposes.

This Public Notice issued on this 25 day of April, 2026.

**Schedule above referred to**

All that piece and parcel of freehold land bearing Gat No. 141 admeasuring 01-96-00 H-R-sqm, assessed to Rs. 3.56 Ps and situated at village Mhatroli, Taluka Alibaug, District Raigad.

**Adv. S.Y.Bartake**
**Adv. S.S. Bartake**
Office at B/202, Kuberakshe CHS, Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad 402201.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे** भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे. ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **बिल्डींग मटेरियल शॉप मध्ये** अनुभवी सुपरवायजर हवा आहे. पेमेंट : २१०००-२५०००, संपर्क - ८००७८९३२३२
- **नागाव येथे राहून कामासाठी कपलची आवश्यकता** कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम करणे, तसेच गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल करणे. सुविधा : राहण्यासाठी स्वतंत्र केअरटेकर रूम उपलब्ध. पगार : रू. २५,०००/- प्रति महिना संपर्क : ७५५९१८४६१२
- **३५ गुंठे शेतजमीन विकणे आहे.** मौजे कावीर- गरूडपाडा, बोअरवेल आणि इलेक्ट्रिक मीटर आहे. आतील रस्त्याला लागून. संपर्क : ९८६७५३०७२७
- **अलिबाग येथील होलसेल किराणा दुकानात** ऑफिस कामाकरीता योग्य कर्मचारी हवे आहेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. शिक्षण : १०, १२ आवश्यक. ९४२२६९११४७
- **अलिबागमधील नाश्ता बनविण्यासाठी** बाई पाहिजे. ७०६६१३८३६८
- **इलेक्ट्रिशिअन कामासाठी पाहिजे.** ७३७८४८०१५१
- **Job vacancies available**. For office staff. Graduates can call for interview. Please call 9923750549

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या भेटीने दिलासा मिळेल. व्यवसायात सुधारणा होईल. स्थावर प्रश्नातून मार्ग निघेल.
- **वृषभ** : हाती घेतलेली कामं विनासायास होतील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. मुलांची प्रगती होईल.
- **मिथुन** : प्रवासाचा उद्देश सफल होईल. नोकरीचे प्रयत्न सुरू ठेवावे. उपजत कलागुणांचा विकास होईल,
- **कर्क** : कोणताही निर्णय घाईने घेऊ नका. कार्यात एकाग्रता महत्त्वाची ठरेल. प्रवासात काळजी घ्यावी.
- **सिंह** : मोठी खरेदी उत्साहात होईल. विजेच्या उपकरणांपासून सावध रहावं. आर्थिक समस्या संभवतात.
- **कन्या** : स्वकर्तृत्त्वावर पूर्ण विश्वास ठेवा. नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. प्रियजनांचा सहवास लाभेल.
- **तूळ** : विचारांची दिशा निश्चित ठेवा. विचलित करणाऱ्या घटना संभवतात. पुरेसा संयम बाळगायला हवा.
- **वृश्चिक** : नोकरीत आनंदवाता समजेल. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **धनु** : अपेक्षित फलप्राप्ती होईल. पित्ताचे विकार संभवतात. व्यवसायात नवे करार मार्गी लागतील.
- **मकर** : खऱ्या हितचिंतकांची पारख करा. दुसऱ्यावर विसंबणं हानीकारक ठरेल. विचारपूर्वक पावलं टाका.
- **कुंभ** : छोटा-मोठा प्रवस घडेल. चैनीवर अधिक खर्च होईल. विवाहाच्या प्रश्नात तडजोड करावी लागेल.
- **मीन** : व्यापारवृध्दीस अनुकूलता राहील. घरगुती वाद वेळीच दूर करावे. मानसिक अस्वास्थ्य राहील.

## ब्युटी टॉक — हेअर स्ट्रेटनिंगची नैसर्गिक पद्धत

केस सरळ करून घेण्यावर म्हणजे हेअर स्ट्रेटनिंगवर महिलांचा भर असतो. हेअर स्ट्रेटनिंग ब्रशसह केस सरळ करण्यासाठी इतरही उपकरणं वापरली जातात. हेअर स्ट्रेटनिंग प्रोडक्ट्सही असतात. त्यात भरपूर रसायनं असल्याने केस खराब होण्याची शक्यता असते. त्यातच स्ट्रेटनिंग केल्यानंतर केसांची जास्त काळजी घ्यावी लागते. पातळ आणि कोरड्या केसांवर कोणताही प्रयोग करण्याआधी दहावेळा विचार करावा लागतो. अशावेळी केस सरळ करण्याची नैसर्गिक पद्धत तुम्ही अवलंबू शकता.

* मिल्क हेअर मास्क तयार करण्यासाठी तुम्हाला पाऊण कप दूध लागेल. नारळाच्या दुधामुळे अधिक चांगला परिणाम साधला जाईल. दूध उपलब्ध नसेल तर मिल्क पावडर पाण्यात मिसळून लावता येईल.

* दुधात स्ट्रॉबेरी किंवा केळं कुस्करून घालता येईल. फक्त दुधाचा मास्कही चालू शकेल.

* एका स्प्रे बॉटलमध्ये दूध भरून घ्या. **(क्रमश:)**

## दिनविशेष — २६ एप्रिल

- **१९२०** : भारतीय गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा मृत्यू.
- **२०१५** : भूकंपाच्या तीव्र हादऱ्यांमुळे नेपाळ उद्ध्वस्त.
- **२०१७** : राजस्थान विधानसभेत गोंधळ घालणाऱ्या काँग्रेसच्या बारा आमदारांना वर्षभरासाठी निलंबित करण्यात आलं.
- **२०१८** : उत्तर प्रदेशातील कुशीनगर इथे मानवरहित रेल्वेक्रॉसिंगवर पॅसेंजरने स्कूल व्हॅनला उडवलं. १३ विद्यार्थी ठार, आठ जखमी.

## स्मार्ट टेक — असं एनेबल करा 'डार्क मोड' फीचर

गुगल क्रोमचं डार्क मोड फीचर नेमकं काय आहे आणि त्याचा वापर कसा करायचा याबाबत जाणून घेऊ या.

* डार्क मोड फीचरमुळे तुमच्या फोन स्क्रीनच्या बॅकग्राउंडचा रंग बदलतो. या मोडमुळे टेक्स्ट वाचताना अडचण येत नाही. स्क्रीनचा योग्य कॉन्ट्रास्ट साधला गेल्याने डोळ्यांवर फार ताणही येत नाही. अंधारात फोन वापरणाऱ्यांना डार्क मोडचा उपयोग होऊ शकतो. यू ट्यूब, ट्विटर आणि फेसबुक मेसेंजरवरही डार्क मोड फीचर उपलब्ध आहे. * हे फीचर एनेबल करण्यासाठी क्रोम ब्राउजरच्या अॅड्रेस बारमध्ये क्रोम/फ्लॅग्ज/ एनेबल अँड्रॉइड नाइट मोड टाईप करा. * यानंतर अँड्रॉइड क्रोम यूआय डार्क मोड सर्च करा. मग एनेबल ऑप्शन निवडा. * ही कृती केल्यानंतरही सेटिंग्जमध्ये डार्क मोड दिसत नसेल तर आधीचे टप्पे पुन्हा एकदा करा. * डार्क मोड फीचर टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिलं जात असल्याने ते तुमच्या फोनवर एनेबल व्हायला थोडा वेळ लागू शकतो. त्यामुळे थोडा धीर धरा. लवकरच हे फीचर सर्व अँड्रॉइड स्मार्टफोनमध्ये उपलब्ध होईल.

## अर्थवार्ता — वाढत्या रोजगारसंधी

देशातील वाढती परकीय गुंतवणूक आशादायी चित्र निर्माण करत आहे. तैवानची चिप आणि स्मार्टफोन निर्माता कंपनी फॉक्सकॉन कर्नाटक आणि तेलंगणामध्ये मोठी गुंतवणूक करणार आहे. कंपनीचा कर्नाटकमधील नवीन प्रकल्प बंगळुरुमधील विमानतळाजवळ ३०० एकरवर उभारला जाणार आहे. यासाठी कंपनी ७०० दशलक्ष डॉलर इतकी मोठी गुंतवणूक करू शकते. कंपनी तेलंगणामध्ये इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन सेटअप उभारणार आहे. ऐतिहासिक कराराद्वारे कर्नाटकमधील दहा वर्षांच्या कालावधीत एक लाखांहून अधिक लोकांना नोकऱ्या दिल्या जाणार आहेत. तैवानची ही



कंपनी राज्यात मोठी गुंतवणूक करणार असून कर्नाटकमध्ये ३०० एकरच्या नवीन कारखान्यात अॅपलचे फोन बनवले जाणार आहेत. फॉक्सकॉन तेलंगणातही मोठी गुंतवणूक करणार आहे. कंपनीने तेलंगणा सरकारसोबत इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग सेटअप उभारण्यासाठी करार केला आहे. यासोबतच या कंपनीने एक लाखांहून अधिक लोकांना रोजगार देण्याचे आश्वासनही दिले आहे. फॉक्सकॉनच्या गुंतवणुकीमुळे तेलंगणामध्ये एक लाखाहून अधिक नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमता आहे. गुजरातमधील वेदांत-फॉक्सकॉन प्लांटमध्ये राज्यात दोन अब्ज डॉलरची प्रत्यक्ष गुंतवणूक आणि पाच ते आठ अब्ज डॉलरची अप्रत्यक्ष गुंतवणूक करण्यात येणार आहे. याशिवाय गुजरात सरकारला जीएसटीच्या रूपाने थेट २६ हजार दोनशे कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे. त्याचबरोबर राज्यातील दोन लाख लोकांना रोजगाराच्या संधी मिळणार आहेत.

## पंचांग

**रविवार, २६ एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, वैशाख शु. १०, चंद्रराशी : सिंह, नक्षत्र : मघा, योग : वृद्धि, सूर्योदय ६.१६, सूर्यास्त ६.५७

## फॉरवर्ड्स

**क़भी मिलता नहीं क़ोई महज़ वादें बदलनेसे...**

**यहाँ लहज़े बदलतें हैं महज़ ओहदे बदलनेसे...!**

## करीअर ग्रोथ

नोकरीच्या संकल्पना बदलल्या आहेत. आता एकाच विषयातलं ज्ञान तुम्हाला उपयोगी पडणार नाही. विविध कौशल्यं विकसित करून पुढे जायला हवं. यासाठी 'लिबरल आर्टस'चा पर्याय तुमच्याकडे आहे. भारतातही 'लिबरल आर्टस'ला आता महत्त्व येऊ लागलं आहे. या क्षेत्रातली पदवी तुम्हाला भविष्यात चांगली संधी मिळवून देऊ शकते. 'लिबरल आर्टस' म्हणजे नेमकं काय आणि त्याचे कसे लाभ होतील याबाबत जाणून घेऊ या.

'लिबरल आर्टस'मध्ये ह्युमॅनिटिजपासून विज्ञान, वाणिज्य आणि तंत्रज्ञानाशी संबंधित वेगवेगळ्या विषयांचा समावेश होतो. **(क्रमश:)**

## करिअरवाटा — समाजोपयोगी क्षेत्र

फार्मसी हे कारकिर्दीच्या दृष्टीने उत्तम क्षेत्र असून इथे युवावर्गाला आकाशाएवढी उंची गाठता येते. विशेषत: या विषयात पीएच.डी. मिळवली तर नवं संशोधनाच्या रुपानं फार्मासिस्ट समाजाची आणि मानवतेची सेवा करु शकतो. पर्यावरणात बदल होत गेल्यानंतर औषधं निरुपयोगी ठरु लागतात. काही रोगांचे जंतू स्वत:वर औषधांचा परिणाम होणार नाही असा बदल घडवतात. त्यामुळेही औषधांचं पुनर्निमाण करावं लागतं. एखादं औषध शोधल्यानंतर त्याच्या खूप चाचण्या घ्याव्या लागतात. आधी त्या प्राण्यांवर घेतल्या जातात आणि



धोकादायक नसल्याची खात्री पटल्यानंतर माणसांवर चाचण्या घेतल्या जातात. ते औषध माणसाला गुणकारी आहे हे सिद्ध झाल्यानंतर त्याचं फॉर्म्युलेशन करावं लागतं. ते द्रवरुपात द्यावं, इंजेक्शन म्हणून द्यावं की गोळीच्या स्वरुपात द्यावं यावर बरंच काम करावं लागतं आणि नंतरचं ते बाजारात येतं. इंजेक्शन, गोळी किंवा पातळ औषध तयार करताना त्यात विशिष्ट औषधी घटकाशिवाय कोणती द्रव्यं वापरावी, किती प्रमाणात वापरावी याचाही विचार करावा लागतो. ही सारी कामं फार्मासिस्ट करतात. त्यामुळे संशोधन करू शकणाऱ्या फार्मासिस्टांची मोठी गरज आहे हे लक्षात घ्यायला हवं.

## खेचाखेची — भविष्य !

**शिक्षिका** : मुलांनो, एखाद्या कागदाकडे बघून कोणी भविष्य सांगू शकतं का?
**बाळू** : हो.
**शिक्षिका** : कोण?
**बाळू** : माझी आई.
**शिक्षिका** : ते कसं काय ?
**बाळू** : माझ्या गुणपत्रिकेकडे बघून आई सांगू शकते, की बाबा घरी आल्यावर काय होणार!

## वेगळं काही

ब्राझीलमध्ये पोलिसांनी एकदा एका पोपटाला ताब्यात घेतलं. हा पोपट अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांना सावध करायचा. पोलीस आल्यावर 'पोलीस, पोलीस' असं ओरडून तस्करांना पळून जायला मदत करत असे. पकडल्यावर या पोपटाने पोलिसांना फारसं सहकार्य केलं नाही. ब्राझीलमधल्या पियाऊ नावाच्या राज्यातल्या अमली पदार्थांच्या अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकली. यावेळीही आपल्या मालकांना सावध करण्याच्या प्रयत्नात असलेल्या पोपटाला दोन तस्करांसह अटक करण्यात आली. पोलिसांना बघताच या पोपटाने ओरडायचा प्रयत्न केला. मात्र यावेळी त्याला यश न आल्याने दोन तस्करांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. हा पोपट आज्ञाधारक असल्याचं म्हटलं जातं.

## फॅशन पॅशन — कुर्ता इन स्टाईल

कधीकाळी पुरुषांची मक्तेदारी असणारा कुर्ता स्त्रियांच्या पेहराव श्रेणीत कधी सामावला हे समजलंही नाही. आता बाजारात स्टायलिश कुर्त्यांची मोठी रेंज बघायला मिळते. जाणून घेऊ या या ट्रेंडविषयी...

* असिमिट्रिक कुर्ता - सगळ्यांमध्ये उठून दिसायचं तर हा कुर्ता मस्ट आहे. बेल्टच्या सहाय्याने या कुर्त्याला खास लूक देता येतो. जीन्स, लेगिंग्ज किंवा जेगिंग्ज यापैकी कशासोबतही हा कुर्ता मॅच होतो. * अंगरखा स्टाईल कुर्ता - सध्या जुन्या काळातले अंगरखे कुर्त्याच्या स्वरुपात समोर येत आहेत. डेली वेअर, फॉर्मल वेअर किंवा पार्टी वेअर अशा कोणत्याही प्रकारात हा पॅटर्न उपलब्ध आहे. गरजेनुसार उंची कमी-जास्त करता येते. * शर्ट कुर्ता - ऑफिससाठी हा कुर्ता सर्वोत्तम पर्याय आहे. * जॅकेट कुर्ता - आजकाल जॅकेटची क्रेझ आहे. रॉयल लूकसाठी भरजरी जॅकेटचा उपयोग करता येतो. कुर्त्यावर जॅकेटचा उपयोग केल्यास युनिक लूक मिळण्यास मदत होते. कॉटन, क्रेप, जॉर्जेट, लायक्रा आदी फॅब्रिकमध्ये जॅकेट्स उपलब्ध आहेत. * मँडेरिन कॉलर - एलिगंट लूक मिळवायचा असेल तर हा कुर्ता सर्वोत्तम पर्याय आहे.



## सुडोकू ९७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | | ९ | | | | ४ | |
| ८ | ३ | | | | ४ | | | |
| | ६ | | | | ५ | २ | १ | |
| | | ४ | | | १ | ८ | | |
| २ | | | ६ | ४ | ७ | | | ५ |
| | | ५ | ८ | | | ७ | | |
| | १ | ६ | ३ | | | | ८ | |
| | | | ४ | | | | ३ | १ |
| | ४ | | | | ८ | | ७ | |


**टीप** -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ९६चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | २ | ५ | ७ | ३ | ९ | ४ | १ | ६ |
| ४ | ७ | ६ | २ | ८ | १ | ९ | ३ | ५ |
| ९ | १ | ३ | ६ | ५ | ४ | ८ | ७ | २ |
| ६ | ८ | १ | ९ | ४ | ५ | ३ | २ | ७ |
| ७ | ९ | ४ | १ | २ | ३ | ६ | ५ | ८ |
| ५ | ३ | २ | ८ | ७ | ६ | १ | ४ | ९ |
| २ | ५ | ९ | ४ | १ | ८ | ७ | ६ | ३ |
| १ | ६ | ७ | ३ | ९ | २ | ५ | ८ | ४ |
| ३ | ४ | ८ | ५ | ६ | ७ | २ | ९ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ९७



**आडवे शब्द :-**
१) लांबत जाणारे काम
५) काळे ज्वालाग्रही खनिज
७) आईची बहीण
९) अरण्यातील वास्तव्य
१२) धरणी
१४) सोने
१५) प्रफुल्लित
१७) मोकळा सुटलेला,खोडकर ,निरुद्योगी
१८) आजच्या आधीचा दिवस भडीमार
१९) वर्षाव,भडीमार
२१) वरण घुसळण्याचे साधन
२२) सर्वनाश
२४) एका डोळ्याचा काळा पक्षी
२६) लोकांचे विचार
२७) हाकलून देणे
२८) मान्यतेचा शब्द
२९) चौथा भाग
३०) त्वरित
३१) सूर्याचे एक नाव
३३) दावानल
३६) कातरलेले तुकडे
३७) गाईचे पिल्लू
३९) रायगडावरील एक कडा
४१) अनुत्तीर्ण
४२) वडिलांचे एक संबोधन
४३) रमविणारा, श्रीविष्णू
४४) प्रामाणिक
४५) बारीक झणझण
४८) नरश्रेष्ठ किंवा गजानन
५०) अखेर, शेवट
५१) संताप
५३) दगडाचा एक प्रकार
५७) घर फिरले की फिरणारा
५९) मोजणारा
६०) नमस्कार
६२) अवाढव्य
६३) यमनगरी
६५) मेंढा
६६) एक नदी
६७) भारवाहक
६८) चा मुलगा किंवा मुलगी
७०) दारु, मद्य
७२) भारतीय सैनिक
७४) बांगड्यांचा व्यवसाय करणारा
७५) अफवा
७६) पोळ्या भाजण्याचे पात्र
७८) चंद्राची कड
७९) मृत्यू नसलेला
८०) सदन
८१) जैन साधू
८२) शेतकरी (हिं.)
८३)गोमाता

**उभे शब्द :-**
१) मारझोड
२) चापबाण
३) अंत, अखेर
४) प्रफुल्लता
५) दोन मैलाचे अंतर
६) तपस्या
७) मृत्तिका
८) गार,थंड
१०) जुनीच्या विरुद्ध
११) वातरोग
१३) पिरपिऱ्या, रडणारा
१६) उत्पन्नाचा आळीपाळीने उपभोग घेणे
१७) शांती, नाश
१८) मृत्यू, जमाना
२०) श्रीरामाची चरित्रगाथा
२३) चंद्राकृती लोखंडी पट्टी
२५) वयाने जास्त असलेला
२६) एक बारीक धान्य
२७) विनाकारण
२९) मर्यादा, सीमा
३१) शिजविलेले तांदूळ
३२) युद्धास उतावीळ झालेला
३३) समुद्राची देवता
३४) वितरण
३५) पशू,श्वापद
३६) व्यायाम,अवघड प्रयत्न
३८) युद्धक्षेत्र
४०) गोड
४४) एक कोल्हापुरी दागिना
४६) समुद्रातील अग्नी
४७) बाण
४८) मऊ
४९) पांडवांची आई
५२) किल्ला, डोंगर
५३) संयुक्त विचार, सर्वांच्या मताने केलेला विचार
५४) थडगे,कबर
५५) सिंह
५६) वेळ घालविणे
५८) तात्पर्य
६१) डोळे
६२) उगाच,नाहक
६४) प्रेत
६९) कोयंड्यात अडकणारी
७१) दीपोत्सव
७३) पाण्याचे हवेत रुपांतर
७५) बुटका,बटु
७७) भूक
७८) राग,त्वेष
७९) अशा प्रकारचा

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# माध्यमांवर अंकुश ठेवण्यासाठी...

**'सोशल मीडिया'वरील स्वतंत्र 'न्यूज क्रिएटर्स'ना कायद्याच्या चौकटीत आणण्याचा सरकारी प्रस्ताव अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि डिजिटल लोकशाहीमधील नाजूक समतोलाला धक्का देणारा आहे. माहिती तंत्रज्ञान कायदा, २०२१ मध्ये सुचवलेल्या सुधारणा व्यावसायिक माध्यम संस्थांपुरते मर्यादित असलेले नियम यूट्यूब, इन्स्टाग्रामसारख्या प्लॅटफॉर्मवरील स्वतंत्र कंटेंट निर्मात्यांनाही लागू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे..**



**शिवाजी कराळे**

आंतरराष्ट्रीय पातळीवर एखाद्या कंटेंटवर बंदी घालण्याचे आदेश थेट क्रिएटरला देण्याऐवजी ते संबंधित प्लॅटफॉर्ममार्फत दिले जातात. त्यामुळे भारतात आता सुचवलेली कंटेट बंदीची पद्धत काहीशी वेगळी आणि अधिक केंद्रीकृत नियंत्रण दर्शवणारी ठरते. यामुळे सरकारकडे ऑनलाइन अभिव्यक्तीवर अधिक थेट हस्तक्षेप करण्याची क्षमता येईल. त्यामुळे अभिव्यक्तीस्वातंत्र्याबाबत चिंता वाढण्याची शक्यता आहे. या सुधारणांमध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'अॅडव्हायजरी'चे स्वरूप बदलणे. आतापर्यंत सरकारकडून 'सोशल मीडिया' कंपन्यांना दिल्या जाणाऱ्या सूचना बंधनकारक नव्हत्या; आता मात्र त्या कायदेशीर जबाबदारीचा भाग बनू शकतात. कंपन्यांनी या सूचनांचे पालन न केल्यास त्यांना मिळणारे 'सेफ हार्बर' संरक्षण धोक्यात येऊ शकते. याचा अर्थ, प्लॅटफॉर्मना वापरकर्त्यांनी तयार केलेल्या कंटेंटसाठी कायदेशीर जबाबदारी घ्यावी लागू शकते. सरकारच्या दृष्टीने हा बदल आवश्यक असल्याचे दिसते. कारण अनेक वेळा 'सोशल मीडिया' कंपन्यांनी सरकारने दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याच्या तक्रारी आहेत.

महिलांविषयी अवमानास्पद कंटेटसह अन्य संवेदनशील विषयांवरील मजकुराविरोधात कायदेशीर बळ देण्याचा प्रयत्न केला जात आहे; परंतु दुसरीकडे सरकारच्या हस्तक्षेपाची मर्यादा कुठपर्यंत असावी, हा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. हा प्रस्ताव डिजिटल क्षेत्रात अधिक शिस्त आणि जबाबदारी आणण्याचा प्रयत्न असला, तरी त्याच वेळी तो अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वैयक्तिक मतप्रदर्शन आणि स्वतंत्र पत्रकारितेवर मर्यादा आणू शकतो. त्यामुळे या सुधारणांकडे केवळ कायदेशीर बदल म्हणून न पाहता, लोकशाही मूल्यांच्या कसोटीवर तपासण्याची गरज आहे.

सरकार, प्लॅटफॉर्म्स आणि कंटेंट क्रिएटर्स यांच्यातील संतुलन राखणे हेच आज खरे आव्हान ठरत आहे. नियंत्रण आणि स्वातंत्र्य यांच्यामध्ये योग्य तो मध्यबिंदू साधला गेला, तरच डिजिटल भारत खऱ्या अर्थाने मुक्त आणि जबाबदार राहू शकेल. असे असले तरी ताज्या प्रस्तावित बदलांमुळे माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला अधिक अधिकार मिळणार असून ते थेट कंटेंट ब्लॉक करण्याचे आदेश देऊ शकतील तसेच संबंधित निर्मात्यांकडून माफी मागण्यास किंवा मजकुरात बदल करण्यास भाग पाडू शकतील. विशेष म्हणजे हे निर्णय आंतर-विभागीय समितीकडे आलेल्या तक्रारींवर आधारित असतील. यामुळे निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता कितपत राहील, हा प्रश्नच आहे. आजच्या डिजिटल युगात ध्रुव राठीसारखे स्वतंत्र विश्लेषक आणि न्यूज क्रिएटर्स हे पारंपरिक माध्यमांना पर्याय म्हणून उभे राहिले आहेत. कोणत्याही मोठ्या मीडिया संस्थेशी संलग्न नसल्याने त्यांच्यावर आधीपासून असलेली नियामक बंधने तुलनेने कमी होती; मात्र नव्या प्रस्तावांनुसार, 'पब्लिशर' म्हणून परिभाषित नसलेल्या अशा व्यक्तींनाही थेट सरकारी नियंत्रणाखाली आणले जाऊ शकते. यामुळे केवळ वृत्त विश्लेषकच नव्हे, तर कधी कधी चालू घडामोडींवर भाष्य करणारे विनोदी कलाकार किंवा इतर क्रिएटर्सही या चौकटीत येऊ शकतात. सरकारने टीका हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे, हे स्वीकारण्याची गरज आहे. नियंत्रण आणि जबाबदारी यांचा समतोल राखताना, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होणार नाही, याची खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, इतिहासाची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही.

सरकारच्या ताज्या पावलामुळे सेन्सॉरशिपचे स्वरूप बदललेले असेल; पण परिणाम तेच असतील. लोकशाही व्यवस्थेत माध्यम स्वातंत्र्य हा केवळ एक हक्क नसून सत्तेवर नियंत्रण ठेवणारे प्रभावी साधन मानले जाते. अशा परिस्थितीत, समाजमाध्यमांवरील मजकूर काढून टाकण्याचे अधिकार सरकारी यंत्रणेला देण्याचा प्रयत्न हा केवळ प्रशासकीय बदल म्हणून पाहता येत नाही, तर तो अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या मूलभूत चौकटीपुढेच प्रश्नचिन्ह उभे करणारा आहे. विशेषतः 'प्रेस इन्फर्मेशन ब्यूरो' (पीआयबी) ला 'फॅक्ट-चेक'च्या नावाखाली मजकूर हटवण्याचे अधिकार देणारी दुरुस्ती न्यायालयाने रद्द करूनही सरकारने त्याच आशयाचे कायदे करण्याचा मार्ग स्वीकारला, तेव्हा या प्रक्रियेच्या उद्देशांवर अधिकच संशय निर्माण होतो. केंद्र सरकारने 'इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी' (इंटरमिडियरी गाईडलाईन्स अँड डिजिटिल मीडिया इथिक्स) नियम, २०२१ अंतर्गत सुचवण्यात आलेल्या दुरुस्तींमध्ये 'पीआयबी'ला किंवा सरकारने नियुक्त केलेल्या 'फॅक्ट-चेक युनिट'ला एखादा मजकूर 'खोटा' किंवा 'भ्रामक' ठरवण्याचा अधिकार दिला आहे. याचा थेट परिणाम असा होऊ शकतो, की संबंधित मजकूर समाजमाध्यमांवरून हटवला जाईल. या तरतुदीविरोधात न्यायालयात आव्हान देण्यात आले आणि उच्च न्यायालयाने त्यावर स्थगिती देत नंतर तो भाग रद्द केला; मात्र त्यानंतरही सरकारने वेगळ्या मार्गाने त्याच स्वरूपाचा नियंत्रणाचा अधिकार मिळवण्याचा प्रयत्न केला, ही बाब लोकशाहीच्या दृष्टिकोनातून चिंताजनक ठरते.

जगातील प्रस्थापित लोकशाही व्यवस्थांमध्ये 'प्रसिद्धीपूर्व सेन्सॉरशिप' (प्री-सेन्सॉरशिप) ही संकल्पनाच अत्यंत मर्यादित आणि अपवादात्मक आहे. सरकारला एखादा मजकूर प्रकाशित होण्याआधीच रोखण्याचा अधिकार देणे हे अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या विरोधात मानले जाते. भारतातही संविधानाच्या कलम १९(१)(अ) अंतर्गत अभिव्यक्तीस्वातंत्र्याची हमी दिली असली, तरी अशा प्रकारच्या तरतुदींमुळे त्या हक्काची व्याप्ती कमी होत असल्याची भीती व्यक्त केली जाते. सरकारच्या मते खोटी माहिती, अफवा आणि दिशाभूल करणारा प्रचार यांना आळा घालण्यासाठी कठोर उपायांची गरज आहे. डिजिटल युगात चुकीची माहिती वेगाने पसरते आणि त्याचे सामाजिक, राजकीय परिणाम गंभीर असू शकतात, हे नाकारता येत नाही; परंतु या समस्येवर उपाय म्हणून सरकारलाच अंतिम सत्य ठरवण्याचा अधिकार देणे, हा उपाय अधिक धोकादायक ठरू शकतो. कारण 'सत्य' आणि 'असत्य' याचे मोजमाप सत्ताधाऱ्यांच्या हाती दिल्याचा गैरवापर होण्याची शक्यता कायम राहते. यामुळे एक नवीन प्रकारची भीती निर्माण होते, ती म्हणजे थेट बंदीपेक्षा अधिक प्रभावी असलेली 'स्व-सेन्सॉरशिप'. पत्रकार, लेखक, किंवा सामान्य नागरिकही सरकारविरोधी मत मांडताना दोनदा विचार करू लागतात. कारण त्यांना माहीत असते, की त्यांच्या मजकुरावर 'फेक' किंवा 'भ्रामक' असा शिक्का मारला जाऊ शकतो आणि तो काढून टाकला जाऊ शकतो. अशा वातावरणात मुक्त आणि निर्भीड संवाद शक्य राहतो का, हा मूलभूत प्रश्न आहे.

माध्यम स्वातंत्र्य हे केवळ पत्रकारांचे संरक्षण करण्यासाठी नसते, तर नागरिकांच्या माहिती मिळवण्याच्या हक्काशी थेट संबंधित असते. माहितीच नियंत्रित केली गेली, तर नागरिकांची मतनिर्मिती अपूर्ण किंवा पक्षपाती माहितीवर आधारित होईल. यामुळे लोकशाही प्रक्रियेची गुणवत्ता खालावण्याचा धोका निर्माण होतो. जगातील कोणत्याही लोकशाही देशात सध्या प्रसारणापूर्वीची बंधने नाहीत. लोकशाही व्यवस्थेत अभिव्यक्तीस्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार आहे. असे असताना 'फॅक्ट चेक'च्या नावाखाली उचललेले समाजमाध्यमांच्या गळचेपीचे हे पाऊल जागतिक लोकशाही मूल्यांशी विसंगत ठरते का, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. चुकीच्या माहितीविरोधात लढा देणे आवश्यक आहेच; पण तो लढा पारदर्शक, स्वतंत्र आणि न्याय्य पद्धतीने दिला गेला पाहिजे. अन्यथा, 'फॅक्ट-चेक'च्या नावाखाली अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर गदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अखेरीस प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर लोकशाहीच्या आत्म्याचा आहे. सरकारने टीका सहन करण्याची क्षमता दाखवली आणि नियंत्रणाऐवजी विश्वासाचा मार्ग निवडला, तरच माध्यम स्वातंत्र्य आणि लोकशाहीतील नाते सुदृढ राहू शकते. अन्यथा, नियंत्रणाच्या या वाढत्या प्रवृत्तीमुळे लोकशाहीची पायाभरणीच कमकुवत होण्याचा धोका आहे.

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात आणीबाणीचा काळ केवळ राजकीय दडपशाहीचा नव्हता, तर अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या गळचेपीचा काळा अध्याय म्हणून कायम स्मरणात राहिला आहे. त्या वेळी वृत्तपत्रांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली होती. सरकारविरोधी बातम्या छापण्यापूर्वी परवानगी घ्यावी लागत होती आणि सत्तेला अस्वस्थ करणारा प्रत्येक आवाज दडपण्याचा उघड प्रयत्न झाला. त्या वेळी अनेक वृत्तपत्रांनी दबावाखाली मान झुकवली, तर काहींनी संघर्षाचा मार्ग निवडत लोकशाहीचे भान जिवंत ठेवले. याच आणीबाणीविरोधातील लढ्यातून पुढे आलेल्या राजकीय शक्तींनी, स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या मूल्यांचे रक्षण करण्याची शपथ घेतली होती; मात्र आजची परिस्थिती पाहता, एक विसंगती ठळकपणे जाणवते. सत्तेत असलेले तेच घटक, जे कधी सेन्सॉरशिपविरोधात रस्त्यावर उतरले होते, आज अप्रत्यक्ष आणि काही वेळा थेट मार्गाने माध्यमांवर नियंत्रण ठेवत आहेत. सध्या समाजमाध्यमे जात्यात असली, तरी सुपातील स्वतंत्र बाण्याची माध्यमे कधीही जात्यात येऊ शकतात. **

# 'लगीन सराय...!!'

**धनंजय शेटये**

नव्वदीच्या दशकातील कोकणी लग्नसोहळ्यांचा सुवर्णकाळ.

मे महिन्याची सुट्टी लागली की कोकणात वेगळ्याच उत्साहाचा बहर यायचा. बहुतेक लग्नसोहळे घरासमोरील अंगणात म्हणजे खळ्यातच असायचे. बेडल्या माडाच्या जावळांनी मंडप सजवला जायचा. नव्वदीच्या दशकातील 'लगीन सराय' म्हणजे नुसता सोहळा नव्हता, तर तो एक जिवंत, सळसळता आणि माणुसकीने ओतप्रोत भरलेला महोत्सव असायचा. आजच्या इव्हेंट मॅनेजमेंटच्या चकचकीत दुनियेत, तो अस्सल कोकणी रांगडा आणि जिव्हाळ्याचा लग्नसोहळा आठवला की आजही काळजात एक गोड हुरहुर दाटून येते.

**जिव्हाळ्याचा उत्सव**

लग्न एका घरात असायचे, पण अंगण आणि उंबरठे संपूर्ण वाडीचे सजायचे. आठ-दहा दिवस आधीपासूनच वाडीतल्या प्रत्येक घरात एकच लगबग असायची. परकेपणाचा लवलेशही तिथे नसायचा; प्रत्येक जण 'आपल्या घरचं कार्य' या भावनेने राबायचा. या दिवसांत गावातल्या 'घेवपी' (मद्यप्रेमी) कलाकारांचीही वेगळीच मज्जा असायची! सत्यनारायणाच्या महापूजेचा एक पवित्र दिवस कटाक्षाने वगळला, तर एरवी त्यांची 'अगरबत्ती' लपूनछपून पेटायची आणि त्यानंतर त्यांच्या अंगात जो कामाचा उत्साह संचारायचा, तो वाखाणण्याजोगा असायचा. चुलीवरच्या भाकऱ्यांपासून ते मांडवातल्या पंगतीपर्यंत सगळीकडे फक्त आणि फक्त आपुलकीचा सुवास दरवळायचा.

**एक अविस्मरणीय थरार**

लग्नाच्या दिवशी वऱ्हाडाचा प्रवास म्हणजे एक महाकाव्यच! दारात सजलेला ट्रक उभा राहिला की त्यात जागा पकडण्यासाठी, विशेषतः कडेला उभं राहण्यासाठी, एकच झुंबड उडायची. दाटीवाटीने, एकमेकांच्या अंगावर रेलत उभे असलेले वऱ्हाडी आणि ट्रकच्या कॅबिनवर बसून बेधुंदपणे बँजो वाजवणारे वाजंत्री, हे दृश्य एखाद्या सिनेमालाही लाजवणारे असायचे.

ट्रकमध्ये उभं राहिल्यावर ड्रायव्हरला मध्येच हुक्की यायची आणि तो अचानक जोरदार ब्रेक मारायचा. मग मागची माणसे पुढच्यांवर कोसळायची आणि एकच हास्यकल्लोळ उडायचा.



स्वस्तातली 'खाकी पावडर' लावून नटूनथटून आलेल्या बायाबापड्यांचा मेकअप घामाने विरघळून जायचा, पण त्यांच्या चेहऱ्यावरचा निखळ आनंद मात्र तसुभरही कमी व्हायचा नाही. वाटेत जाणाऱ्या-येणाऱ्यांची मस्करी करणं, रस्त्यात अचानक ट्रकच्या अंगावर येणाऱ्या करवंदीच्या काटेरी जाळ्या चुकवण्यासाठी कडेच्या माणसांनी जीवाच्या आकांताने आतल्या बाजूला झुकणं, हा एक वेगळाच थरार असायचा.

ठरल्याप्रमाणे गाडीला पंक्चर किंवा ब्रेकडाऊन होणारच, हे गृहीत धरलेले असायचे. तिथेही चिडचिड न होता गप्पांचा फड रंगायचा.

**फणसाचा डिंक आणि आहेराचे पाकीट**

मंडपात पोहोचल्यावर 'उतऱ्या'वर चहापाणी झाले की, सगळ्यात महत्त्वाची मोहीम सुरू व्हायची ती म्हणजे 'आहेर पाकीट' बंद करण्याची! त्या नव्वदीच्या काळात तळकोकणात डिंक किंवा फेविकॉल शोधण्यापेक्षा आजूबाजूला फणसाचे झाड शोधण्यावर अधिक भर असायचा. फणसाचे पान तोडून त्याच्या नैसर्गिक डिंकाने पाकीट चिकटवण्याची ती अस्सल कोकणी स्टाईल! जवळपास ९०% आहेर याच फणसाच्या डिंकाने सील व्हायचे. त्यात जो एक नैसर्गिक गोडवा आणि साधेपणा होता, तो आजच्या चकचकीत लिफाफ्यांमध्ये कुठेही सापडणार नाही.

मंगलाष्टकांची वेळ आली की भटजींसोबत सूर मिसळण्यासाठी गावातल्या जाणकारांची चढाओढ लागायची. 'शुभमंगल सावधान' झाले रे झाले की, नवरा-नवरी आणि मोजके नातेवाईक मंडपात उरायचे आणि बाकीचा मोर्चा थेट पंगतीच्या मंडपाकडे वळायचा. पंगतीतली रंगत तर विचारायलाच नको! जेवता जेवता श्लोक गायनाची जुगलबंदी रंगत यायची. काळ्या वाटाण्याच्या सांबारावर यथेच्छ ताव मारला जायचा.पण या सगळ्या उत्साहात कोकणी माणसाचं सर्वात मोठं सौंदर्य दडलेलं होतं, ते त्यांच्या 'सामाजिक भान आणि सहिष्णुतेत'. एखाद्या लग्नघराची आर्थिक परिस्थिती बेताची असेल, तर गावकरी स्वतःहून समजूतदारपणा दाखवायचे. पंगतीत जास्त अन्न न मागता, "हरिच्या घरी शेवया तुपपोळ्या..." हा समारोपाचा अंतिम श्लोक लवकर म्हटला जायचा, जेणेकरून यजमानाची शोभा राखली जाईल आणि अन्नाची बचत होईल. एवढेच नाही, तर त्या सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाचा आर्थिक डोलारा कोसळू नये म्हणून, वाडीतील माणसे घरची सगळी कामे विनामोबदला करायची आणि प्रसंगी न जेवताच 'पोट भरलंय' असे सांगून हसतमुखाने घरी परतायचे.

ही केवळ परिस्थितीशी केलेली तडजोड नव्हती, तर ती रक्ताच्या नात्यापलिकडली श्रीमंत माणुसकी होती. एकमेकांच्या सुखदुःखात सावलीसारखं उभं राहण्याची, एकमेकांना जपण्याची ती कोकणी रीत होती. आजच्या बुफे सिस्टीमच्या गर्दीत तो फणसाच्या डिंकासारखा घट्ट चिकटलेला जिव्हाळा आणि काळ्या वाटाण्याच्या सांबारासारखी मायेची चव कुठेतरी हरवली आहे. पण आजही जेव्हा मे महिन्याची चाहूल लागते, तेव्हा त्या नव्वदीच्या 'लगीन सराई'च्या आठवणी काळजात माणुसकीचा एक ओला, सुगंधी झरा प्रवाहित करतात. **

# कौशल्य विकास हेच व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन

**सुनील गवळी**

आजचे जीवन वेगवान, स्पर्धात्मक आणि अनेक आव्हानांनी भरलेले आहे. प्रत्येकजण यशाच्या शिखराकडे धावत आहे; परंतु या धावपळीत एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आपण विसरतो स्वतःचे मन. मन अस्थिर असेल, तर ज्ञान, कौशल्य आणि परिश्रम असूनही यश टिकत नाही. म्हणूनच व्यक्तिमत्त्व विकासाची खरी सुरुवात मनाच्या व्यवस्थापनातून होते. याच विचारांची गोड, गहिरी आणि जीवनाला दिशा देणारी शिकवण थोरांनी तसेच साधू संतांनी दिली आहे.

मन हे माणसाचे सर्वात मोठे मित्रही असते आणि सर्वात मोठे शत्रूही. ज्या क्षणी मनावर नियंत्रण सुटते, त्या क्षणी निर्णय चुकतात, नातेसंबंध तुटतात आणि आत्मविश्वास डळमळतो. विशेषतः विद्यार्थ्यांच्या जीवनात हे प्रकर्षाने दिसून येते. अभ्यास करताना भटकणारे मन, अपयशाने खचणारे मन किंवा यशाने अहंकाराने भरलेले मन यालाच योग्य दिशा देणे ही शिक्षणाची खरी गरज आहे.





विचार हे व्यक्तिमत्त्वाचे मूळ असतात. जसे विचार, तसे आचरण आणि तसेच परिणाम. नकारात्मक विचार माणसाला कमकुवत करतात, तर सकारात्मक विचार त्याला उंच भरारी घेण्याची ताकद देतात. म्हणूनच पालकांनी मुलांना केवळ "चांगले वाग" असे सांगण्यापेक्षा "चांगले विचार कर" ही सवय लावणे आवश्यक आहे. कारण विचारांमध्येच भविष्य दडलेले असते.

भावनांचे व्यवस्थापन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे आणखी एक महत्त्वाचे अंग आहे. राग, भीती, मत्सर या भावना प्रत्येकाच्या मनात येतात; पण त्या भावनांवर नियंत्रण ठेवणे हेच खरे सामर्थ्य आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान देऊ नये, तर जीवनातील प्रसंगांना सामोरे जाण्याची मानसिक तयारी करून द्यावी. कारण जीवनात गुणपत्रिका नाही, तर निर्णयांची गुणवत्ता महत्त्वाची ठरते.

आजच्या गोंगाटमय जीवनात माणूस स्वतःशी बोलायलाही विसरला आहे. मौन आणि ध्यान ही केवळ अध्यात्मिक साधना नसून ती मनाला स्थिर करण्याची प्रक्रिया आहे. दररोज काही क्षण स्वतःसाठी दिले, तर मनातील गोंधळ कमी होतो आणि विचारांना स्पष्ट दिशा मिळते. विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी आणि शिक्षकांसाठी ही सवय अत्यंत उपयुक्त ठरते.

यशाच्या मागे धावताना आपण अनेकदा परिणामाची अति चिंता करतो. पण खरे यश हे प्रक्रियेत असते, परिणामात नाही.

मनापासून केलेले प्रयत्न कधीही वाया जात नाहीत. म्हणूनच "कर्म करा, फळाची चिंता करू नका" हा दृष्टिकोन स्वीकारल्यास तणाव कमी होतो आणि कार्यक्षमता वाढते. विद्यार्थी अभ्यासात, पालक संगोपनात आणि शिक्षक अध्यापनात अधिक एकाग्र होतात.

व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख ही ज्ञानात नसून मूल्यांमध्ये असते. प्रामाणिकपणा, सहानुभूती, संयम आणि कृतज्ञता ही जीवनाला उंची देणारी तत्त्वे आहेत. पालकांचे आचरण हेच मुलांचे पहिले शिक्षण असते. त्यामुळे संस्कार हे शब्दांनी नव्हे, तर कृतीतून दिले गेले पाहिजेत.

शांत मन हे योग्य निर्णय घेण्याची गुरुकिल्ली आहे. अस्थिर मन नेहमी गोंधळ निर्माण करते, तर स्थिर मन योग्य मार्ग दाखवते. म्हणूनच कोणताही निर्णय घेताना मन शांत ठेवणे आवश्यक आहे. यामुळे जीवनातील अनेक चुका टाळता येतात आणि योग्य दिशा मिळते.

अशा प्रकारे, मनावर नियंत्रण मिळवणे हीच व्यक्तिमत्त्व विकासाची खरी किल्ली आहे. विद्यार्थी जर मन जिंकायला शिकला, तर तो केवळ यशस्वीच नाही, तर समंजस आणि संवेदनशील व्यक्ती बनेल. पालक जर या विचारांचा स्वीकार करतील, तर ते केवळ संगोपन करणारे नाही, तर खरे मार्गदर्शक ठरतील. आणि शिक्षक जर या तत्त्वांचा अंगीकार करतील, तर ते केवळ ज्ञान देणारे नाही, तर जीवन घडवणारे प्रेरणास्थान बनतील.

शेवटी एवढेच
जग जिंकणे मोठे नाही,
पण स्वतःचे मन जिंकणे हेच खरे महान यश आहे. **

# चौदाव्या शतकातील राजा हंबीरराव

**अनिकेत पाटील**

रायगड जिल्ह्यातील, मुरुड तालुक्यात असणाऱ्या नांदगाव या ऐतिहासिक गावात सुमारे चौदाव्या शतकात कोकण प्रांतात राज्य करणाऱ्या राजा हंबीरराव याचा शिलालेख सापडला आहे. या ऐतिहासिक शिलालेखाचे वाचन करण्याचा प्रामाणिकपणे केलेला प्रयत्न.


नांदगाव मधील भवानी पाखाडी येथे राहणाऱ्या श्री. जनार्दन चोरघे यांच्या नारळी सुपारीच्या वाडीत (खाजगी जागेत) विहिरी शेजारी हा शिलालेख आहे. श्री. चोरघे कुटुंबीय यांच्या गेल्या कित्येक पिढ्या नांदगाव याच ठिकाणी वास्तव्यास आहेत. स्वतःच्या खाजगी जागेत नारळ सुपारीचे उत्पादन घेत आहेत. वाडीला जलसिंचन करण्यासाठी वाडीमध्ये विहीर उपलब्ध आहे. इ.स. २००० च्या सुमारास विहिरीतील गाळ काढून विहीर स्वच्छ करीत असताना एक मोठी शिळा स्वच्छता करणाऱ्यांना सापडली. ही शिळा विहिरीतून बाहेर काढुन विहिरी लगतच ठेवण्यात आली. कित्येक वर्ष दुर्लक्षित असलेली ही शिळा नंतर काही काळ दैवी आकृती म्हणून पुजली देखील जात होती.

१. शिलालेखाचे स्थान - ऐतिहासिक दंडाराजपुरी म्हणजेच आताच्या मुरुड जंजिरा, जिल्हा रायगड पासून उत्तर दिशेला ८ कि.मी. अंतरावर असणाऱ्या नांदगाव या गावातील भवानी पाखाडी येथे वास्तव्यास असणाऱ्या श्री. जनार्दन चोरघे यांच्या नारळी सुपारीच्या खाजगी वाडीत शिलालेख आहे. मालमत्ता आता श्री. राकेश जनार्दन चोरघे सांभाळतात.

२. भौतिक वर्णन - नांदगाव येथील शिलालेख हा बेसाल्ट दगडावर कोरलेला आहे. उपलब्ध शिलालेख हा गेली काही वर्ष ऊन वारा पाऊस यांच्या संपर्कात आल्याने शिलालेख काही प्रमाणात अस्पष्ट झाला आहे. सदर शिळा ही गधेगळ प्रकारातील आहे. (गधेगळ - जर एखाद्याने राजाची आज्ञा मान्य केली नाही, तर त्याच्या कुटुंबातल्या महिलांचा गाढवाशी संभोग होईल असे दर्शविण्यासाठी शिळेवर गाढव व स्त्री यांचे संभोग शिल्प कोरलेले असते.) सदर शिळेचे तीन भागात विभाजन केले असता शिळेच्या वरच्या भागात चंद्र - सूर्य व मध्यभागी मंगल कलश अशा आकृत्या काढलेल्या आहेत. शिळेच्या मध्य भागात २३ ओळींचा लेख लिहिला असून अंत्य (खालील) भागात गाढव व स्त्री संकरशिल्प कोरण्यात आले आहे. अशी एकूणच गधेगळची रचना आहे. गधेगळचा खालील दगड मोकळा सोडून देण्यात आला आहे.

आजमितीस राजा हंबीररावाचे किमान ४ शिलालेख (देवनार- मुंबई, रानवड- उरण, भिमेश्वर मंदिर नागाव, वाघ्रण ता. अलिबाग इ. ) उपलब्ध असुन नांदगावचा हा शिलालेख हा हंबीररावाच्या संदर्भातील पाचवा शिलालेख आहे. सदर शिळेचे अक्षांश व रेखांशनुसार स्थान १८.३९३७४७, ७२.९२५५७१ आहे. शिळेची लांबी व रुंदी अनुक्रमे ५६ इंच व २३ इंच असुन सदर शिळा सुस्थितीत आहे. सदर लेख हा देवनागरी लिपीमध्ये लिहिण्यात आला आहे. लेखाच्या पहिल्या ओळीत हिजरी सन ७६९ नमूद केले असुन त्यापुढे शके १२८९, पळवंग संवत्सर नमूद केले आहे. म्हणजेच हा शिलालेख इसवी सन १३६७ - ६८ मध्ये कोरण्यात आला आहे. एकंदरीत चौदाव्या शतकात वापरल्या जाणाऱ्या मराठी भाषेवर मुसलमानी भाषेचा प्रभाव होता असे जाणवते.

प्रस्तुत शिलालेख हा हिजरी सन ७६९ म्हणजेच शक १२८९ (इ.स. १३६७-६८) चा असुन या शिलालेखात ठाणेकोंकण येथे राज्य करीत असणाऱ्या हंबीरराव या राजाचा उल्लेख "प्रौढप्रताप चक्रवर्ती महाराजाधिराज श्री हंबिरराव ठाणेकोंकण" असा आढळतो. सन १३४० च्या सुमारास इब्न बतूता या अरब प्रवाशाने "कोकण ताना" असा उल्लेख आपल्या 'रहेला' या पुस्तकात केला आहे. राजा हंबीरराव याला लावण्यात आलेले 'प्रौढिप्रतापचक्रवर्ती' हे बिरुद प्रामुख्याने देवगिरीचे यादव वंशातील राजे तर 'महाराजाधिराज' हे बिरुद प्रामुख्याने उत्तरेचे शिलाहार राजे लावीत असल्याचे दिसून येते.



शिलालेखातील महत्त्वाची बाब म्हणजे लेखात नांदिगौ म्हणजे नांदगाव, मरुड म्हणजे मुरुड व चेउळ म्हणजे चौल या गावांचा उल्लेख आलेला आहे. तसेच राजा हंबीररावाचा प्रमुख प्रधान 'सिहीप्रो' याचा उल्लेख सर्वव्यापारी म्हणून करण्यात आला आहे. सिहीप्रो याने समंध नांद म्हणजेच नांदगाव आगरपैकी एक वाडी फळ भोगासहित घेऊन दान केली किंवा वाटून टाकली. त्यावाडीची किंमत ४०० द्राम एवढी होती. ही किंमत अदा करून हे दान राम जोशी, कृष्ण जोशी, कुम जोशी या तिघांमध्ये समान वाटून दिले व त्यांच्याबालगोपाळांनी म्हणजेच मुलाबाळांची ते वाटून घेतले. अशा आशयाचा शिलालेख कोरण्यात आला आहे. सदर शिलालेख हे दानपत्र आहे. शिलालेखात उल्लेखित काळानुसार हा १४ व्या शतकातील शिलालेख असून कोकणात राज्य करणाऱ्या राजा हंबीररावांच्या राज्याच्या सीमेची नोंद सांगणारा पुरावा आहे. आतापर्यंत माहीम पासून नागाव पर्यंत मर्यादित असणारी हंबीररावांच्या राज्याची सीमा नांदगाव पर्यंत होती हे निश्चित होते. हा शिलालेख राजा हंबीररा वांच्या उपलब्ध, अत्यल्प पुराव्यांमध्ये भर घालणारा तसेच उपलब्ध चार शिलालेखांत वाढीव असा पाचवा शिलालेख आहे. रायगड जिल्ह्यातील तालुका मुरुड मधील नांदगावच्या समुद्रकिनारी सापडलेल्या या शिलालेखाने नांदगावचे १४ व्या शतकातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व अधोरेखित होते.

सदर शिलालेखाचे वाचन श्री. अनिकेत पाटील यांनी केले असून २०२६ या संशोधनपर मासिकात प्रकाशित केले आहे. **

# पाकिस्तान: सिंध गुन्हेगारी



कराची, सिंधची गजबजलेली राजधानी, सध्या दोन प्रकारच्या सुरक्षा आव्हानांना सामोरे जात आहे. जरी अलिकडच्या महिन्यांत दहशतवादी क्रियाकलाप वाढले आहेत, तरी शहरातील सतत चालू असलेली रस्त्यावरील गुन्हेगारी लाटा जीवघेण्या ठरून सार्वजनिक विश्वास कमी करत आहे.

**दहशतवादी हिंसेत वाढ**

१७ एप्रिल२०२६ रोजी मंगहोपिर, ओरंगी टाउनमध्ये शस्त्रधारी हल्लेखोरांनी गोळीबार केला, ज्यामुळे कॉन्स्टेबल खदीम अली शाह यांची हत्या झाली आणि कॉन्स्टेबल मोहमद तुफैल खान यांना जखमा झाल्या. या हल्ल्याची जबाबदारी तेहीक ए तालिबान पाकिस्तानने स्वीकारली. त्याच दिवशी सुरक्षा दलांनी लायरीमध्ये तीन दहशतवाद्यांना अटक केली, ३० बोर पिस्तूल व १८ गोळ्या जप्त केल्या. चौकशीदरम्यान उघड झाले की ते कराचीवर मोठा हल्ला करण्याची योजना आखत होते. ज्यामुळे शहरावर त्यांचे लक्ष स्पष्ट होते.

१० एप्रिल २०२६ रोजी सेक्टर ५१ मधील फरूक ए अझाम मशिदीच्या बाहेर अनोळखी मोटरसायकल चालकांनी उपासक रेहान यांना गोळी मारली. त्याच दिवशी फेडरल इंटेलिजन्स एजन्सी सोबतच्या संयुक्त कारवाईत काउंटर टेररिझम विभागाने मुहम्मद फरहान खान यांना अटक केली, जे प्रतिबंधित शिया गट झैनाबियून ब्रिगेडशी संबंधित टार्गेट किलर होते. पोलीसने ९ पिस्तूल व आठ गोळ्यांची लोडेड मॅगझीन जप्त केली, जी २०२३ च्या एका लक्ष्यित हत्येशी जोडलेली होती.

तुषार राजन मोहंती

ही घटना व्यापक वाढीचा भाग आहेत. साउथ एशिया टेररिझम पोर्टल नुसार, १९ एप्रिल २०२६ पर्यंत सिंधमध्ये एकूण १० दहशतवादी मृत्यू (ज्यात ८ दहशतवादी) नोंदवले गेले आहेत. २०२५ मध्ये प्रांताने ४९ दहशतवादी मृत्यू नोंदवले २६ नागरी, १६ सुरक्षा दलाचे सदस्य आणि ७ दहशतवादी जे २०२४ च्या ३८ (२८.९% वाढ) पेक्षा जास्त आहे. नागरी मृत्यू १५ वरून २६ पर्यंत ७३% वाढले, तर सुरक्षा दलाची हानी १४ वरून १६ झाली; दहशतवादी मृत्यू थोडे घटून ९ वरून ७ राहिले.

मुख्य हल्ल्यांची संख्या देखील वाढली : २०२५ मध्ये ५ मोठे हल्ले (तीन किंवा अधिक मृत्यू) झाले, तर २०२४ मध्ये ही संख्या ४ होती, ज्यामुळे मृत्यू १३ वरून १९ झाले. २०२५ चा सर्वात घातक हल्ला २६ ऑगस्ट रोजी फाकिरा गॉथजवळ सुपर हायवेवर झाला, जिथे च्या गनमनने ४ लोकांची हत्या केली आणि १ जखमी केला.

| अपराध | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च |
| --- | --- | --- | --- |
| मोटरसायकल चोरी | ३,५०९ | ३,१७८ | ३,४६७ |
| मोबाइल फोन | १,४४१ | १,२३७ | १,२६५ |
| कार चोरी/जॅकिंग | १५६ | १६५ | १५७ |
| डकैती संबंधित मृत्यू | ५० | ४० | ४४ |
| एकूण मृत्यू | | | १३४ |

कराची हा प्रांतातील दहशतवादी परिस्थितीचा केंद्रबिंदू राहिला आहे. २०२५ मध्ये झालेल्या ४९ मृत्यूंपैकी ३१ कराचीत घडले; उरलेले १८ मृत्यू काश्मीर, घोटकी, नौशहरो फेरोज, लार्काना आणि बडिन जिल्ह्यांमध्ये पसरले. २०२४ मध्येही कराचिने ३८ पैकी २७ मृत्यूंचा भाग बनवला होता.

**सिंधी विभक्तीवादी क्रियाकलापांची जटिलता**

इस्लामी गटांव्यतिरिक्त, सिंधी राष्ट्रवादी संघटनांनीही आपली कारवाई तीव्र केली आहे, अनेकदा बलुच बंडखोरांसोबत समन्वयात. सिंधुदेश रिव्होल्यूशनरी आर्मीने २०२५ च्या सुरुवातीला बलुच राजी आजोई संगर गठबंधनात सामील झाले, या गठबंधनाची पहिली संयुक्त कारवाई ४ मार्च २०२५ रोजी सुजावळमध्ये नॅशनल लॉजिस्टिक्स सेल ट्रकांवर घात लावणे होती, ज्यामुळे दोन ड्रायव्हर जखमी झाले. या हल्ल्यांना ''पंजाबी हेजेमनी'' व सिंधच्या जल भू संसाधनांच्या शोषणाविरुद्ध प्रतिकार म्हणून मांडले.

यानंतर नेक लक्ष्यांवर हल्ले केले:

१५ फेब्रुवारी २०२५ रोजी घोटकीतील टँकर्सवर हल्ला.

२२ एप्रिल२०२५ रोजी हैदराबादजवळ एका प्रवासी ट्रेनवर हल्ला, ज्याचा उद्देश ''पंजाबी वसाहती''ला लक्ष्य करणे होता.

४ जून२०२५ रोजी हैदराबादच्या नसीम नगर पोलीस स्टेशनवर हँड ग्रेनेड हल्ला, ज्यात पोलीसला ''सिंधी जनसंहार''चा भाग म्हटले.

या हल्ल्यांमुळे जखमींची संख्या मर्यादित राहिली, परंतु हे दर्शविते की विभक्तीवादी गट बलुच बंडखोरांसारखी गुरिल्ला रणनीती अवलंबण्यास तयार आहेत.

**रस्त्यावरील गुन्हेगारी: सततची समस्या**

जिथे दहशतवादी धोका वाढत आहे, तिथे कराचीत रस्त्यावरील गुन्हेगारीची समस्याही कमी होत नाही. सिटिझन्स पोलिस लायझन कमिटीने २०२६ च्या पहिल्या तीन महिन्यांत १४,००० पेक्षा जास्त घटना नोंदवल्या ज्या २०२५ च्या समान कालावधीत १६,९७७ होत्या, तरीही संख्या अत्यंत मोठी आहे. २०२६ चे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

२०२५ मध्ये एकूण ६४,३२३ रस्त्यावरील गुन्हे नोंदवले, जे २०२४ च्या ७१,१०५ पासून घटले. २०२५ मध्ये ७० मृत्यू व २९० जखमा झाल्या, तर २०२४ मध्ये ९९ मृत्यू व ४०० जखमा नोंदवलेल्या. अधिकाऱ्यांनी सांगितले की अनेक पीडित नोंदवित नाहीत, त्यामुळे वास्तविक संख्या अधिक असू शकते.

इन्स्पेक्टर जनरल जावेद आलम ओधो यांनी ११ एप्रिल २०२६ रोजी सांगितले की, मागील तीन महिन्यांत सिंधमध्ये गुन्हेगारीत १८% घट झाली आहे. तथापि, वारविक विद्यापीठातील क्रिमिनोलॉजिस्ट झोहा वसीम यांनी इशारा दिला की दोन वर्षांच्या आकडेवारीवरून सुरक्षा सुधारणा निश्चितपणे ठरवता येत नाही; सार्वजनिक सुरक्षा भावना मोजण्यासाठी विस्तृत सर्वेक्षणांची गरज आहे.

पुढचा मार्ग

कराच्याची सुरक्षा आता द्वि मार्गी रणनीतीची मागणी करते.

१. काउंटर टेररिझमच्या पेशींचे नाश, सिंधी बलुच गठबंधनाचा प्रतिबंध व मोठ्या हल्ल्यांचे प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

२. रस्त्यावरील गुन्हेगारी नियंत्रण समुदाय पोलीसिंग बळकट करणे, तक्रार नोंदणी यंत्रणा सुधारणा करणे व डेटा आधारित उपायांद्वारे गुन्हे कमी करणे, फक्त अल्पकालीन आकडेवारीवर अवलंबून न राहता.


उच्च प्रोफाइल दहशतवादी धोका व दैनंदिन गुन्हे दोन्ही एकत्र हाताळल्यासच कराची पुन्हा नागरिकांचा विश्वास जिंकू शकेल व पाकिस्तानच्या आर्थिक धडधडीतली भूमिका सुरक्षित ठेवू शकेल.

**





# हळवी प्रेमकहाणी व्हाइट नाइट्स




पुस्तक परीक्षण

प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

व्हाइट नाइट्स - एका स्वप्नाळू माणसाच्या आठवणी, या फ्योदर दस्तयेवस्की यांच्या कादंबरीचे भाषांतर इर्शाद वडगांवकर यांनी केले आहे. वॉल्डन पब्लिकेशनने हे पुस्तक देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. ''श्वेत रात्रींच्या चांदण्यात चांदण्यात भिजण्यापूर्वी'', मध्ये इर्शाद यांनी सविस्तरपणे या कादंबरीविषयी लिहिले आहे. १८४५ साली सेंट पीटर्सबर्गमध्ये बेलिन्स्कीकडे एका नवख्या लेखकाचे हस्तलिखित सोपविले गेले. पत्रांच्या स्वरूपात रशियन भाषेत लिहिलेल्या कादंबरीचे शीर्षक होते 'बेदनीये ल्युदी', (गरीब माणसं). ही कादंबरी वाचल्यानंतर बेलिन्स्की यांनी जाहीर केले की, 'रशियातील साहित्यात नव्या ताऱ्याचा जन्म झाला आहे.' नंतर दस्तयेवस्की यांच्या विविध कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. १८४५ सालच्या या पहिल्या कादंबरी सारखीच, २०२४ मध्ये या पुस्तकाने विशेषत: समाजमाध्यमांवर धुमाकूळ घातला. वयाच्या २६व्या वर्षी दस्तयेवस्कीने 'व्हाइट नाइट्स' लिहिली.

लेखक या साहित्यकृतीला 'एक भावनाप्रधान प्रेमकथा' म्हणतो. या कादंबरीत प्रमुख पात्रे दोनच आहेत. एका तरुण स्वप्नाळू माणसाच्या जुन्या आठवणींतून ही कादंबरी वाचकांसमोर प्रथमपुरुषी निवेदनातून उलगडते. सव्वीस वर्षीय, निनावी नायक सेंट पीटर्सबर्गच्या एका चाळीत भाड्याच्या खोलीत राहतो. त्याच्या एकटेपणाची आणि त्यामुळे आलेल्या विषण्णतेच्या काळात, उन्हाळ्यातला श्वेत रात्रीच्या मोसमात, त्याच्या आयुष्यात, अल्पकाळासाठी आलेल्या एका तरुणीमुळे, त्याचे एकटेपण उजळून निघते. साहित्यिकांच्या मते, सर्वच महान कलाकृतींच्या मुळाशी विषण्णता असते. आजच्या एकविसाव्या शतकातही हे जाणवते आहे. कादंबरी भाषांतरित करताना आलेले अनुभव इर्शाद यांनी नोंदविले आहेत. एकूण पाच प्रकरणांत ही कादंबरी विभागली गेली आहे. चंद्रमोहन कुलकर्णी यांचे रंगीत, अप्रतिम मुखपृष्ठ आहे. आतील चित्रे इल्या ग्लाजुनव यांची आहेत.

पहिल्या प्रकरणातील तरुण नायकाला, शुभ्रधवल चांदण्यांनी भरलेल्या आकाशाकडे पाहून प्रश्न पडतो की, 'या सुंदर आकाशाखाली इतकी चिडखोर आणि सणकी माणसं कशी राहू शकतात?' आपली वागणूक कमालीची सभ्य असल्याचे नायक सांगतो. सेंट पीटर्सबर्गमध्ये आठ वर्षे राहूनही, एकाही व्यक्तीशी त्याची साधी ओळखही झाली नाही. मात्र साऱ्या शहराला नायक ओळखतो. परिणामी त्याचे एकटेपण आणि उदासवृत्ती वाढते. त्या काळात तीन दिवस शहरभर तो भटकत राहतो, लोकांचे निरीक्षण करतो. त्याला आपले गाव आठवते. तेथे सर्व आनंदी होते. निसर्गाचे अप्रतिम रूप पाहून उशिरा तो शहरातील खोलीवर परतत असताना, कालव्याच्या कठड्यावर रेलून उभी असलेली एक मुलगी त्याला दिसते, ती रडत असल्याचे त्याला जाणवते. संकोची वृत्तीमुळे तो त्या मुलीला हाक मारत नाही. नंतर ती मुलगी रस्ता ओलांडून जात असताना, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूच्या पदपथावरील, एक सभ्य न दिसणारा वृद्ध दिसतो. तो तिच्या जवळ जातो. नायक तिच्या जवळ आल्याचे पाहून वृद्ध दूर जातो. तो तिला म्हणतो, ''माझा हात धर, म्हणजे तो पुन्हा त्रास देणार नाही.'' त्या देखण्या मुलीकडे त्याचे लक्ष जाते. तिच्या बोलण्यावरून ती हुशार असल्याचे त्याला जाणवते. तो आपल्याविषयी सविस्तरपणे तिला सांगतो. मात्र त्याच्या साहित्यिक भाषेमुळे, तो काय बोलतो ते तिला फारसे कळत नाही. दुसऱ्या दिवशी पुन्हा भेटण्याचे दोघे ठरवतात आणि एकमेकांचा निरोप घेतात. दुसऱ्या रात्री दोघांची भेट होते. दोघे स्वत:विषयी सांगतात. सतरा वर्षांच्या त्या मुलीचे नाव नास्तिन्का असते. नास्तिंकाचे आईवडील, तिच्या लहानपणीच गेलेले असल्याने, ती तिच्या आजीकडे राहून मोठी होते. तिला फारसे शिक्षणही मिळत नाही. वयात येणाऱ्या नातीविषयी, दिसत नसलेल्या आजीला काळजी वाटत असल्याने, आजी तिच्या गाऊनला नातीचा फ्रॉक पिनने टाचून टाकते. त्यामुळे तिला दिवसभर आजीजवळ बसून राहावे लागे. एके दिवशी घरकाम करणाऱ्या बाईच्या मदतीने, तिला आपल्या जागी बसवून, नात आजीला फसवते.

पण ते आजीला कळते. आजीच्या घरातील, वरच्या मजल्यावर नव्याने राहायला आलेल्या, भाडेकरू तरुण माणसाविषयी आजीला खात्री वाटत नसते. कालांतराने त्याचा परिचय वाढल्याने, त्या तरुणाबरोबर सर्व, एका रात्री ऑपेरा पाहायला जातात. नास्तिंकाचा तो पहिलाच अनुभव असतो. तारुण्यात पदार्पण करणारी नास्तिंका त्याच्या प्रेमात पडते. एके रात्री ती, त्याच्या खोलीत त्याला भेटून, आपले त्याच्यावरील प्रेम व्यक्त करते. आपण येथून पळून जाऊन लग्न करू, असे सांगते. परंतु तो तरुण एका वर्षानंतर पुन्हा भेटायला येईन, असे सांगून तिचा निरोप घेतो. दुसऱ्या दिवशी तो मॉस्कोला रवाना होतो. ती त्याची वाट पाहत राहते वर्षभरानंतरही त्याचे काही पत्र येत नाही. त्यामुळे ती दु:खी असते. अनामिक तरुण तिला दिलासा देतो आणि तिच्यावतीने पूर्वपरिचित कुटुंबाकडे, त्याच्यासाठी नास्तिंका पत्र लिहून देते. मधल्या काळात, ती अनामिक तरुणाला विवाहाचे वचन देते. परंतु नंतर एक वर्षापूर्वी मॉस्कोला गेलेला तरुण तिला भेटायला येतो आणि दोघे परस्परांचे हात हातात घेऊन आजीच्या घराकडे निघून जातात.

नंतरच्या सकाळी अनामिक तरुणाला नास्तिन्काचे पत्र येते आणि ती माफी मागते. आपण कायमचे मित्र राहू असे ती, त्याला आश्वस्त करते. सुखाचा हा एक क्षण त्याच्या आयुष्यासाठी पुरेसा असतो. ही छोटीशी कादंबरी त्या काळातील तरुणांचे जीवन वाचकासमोर उलगडते आणि तरल, परंतु विफल प्रेम गाथा वाचकाला गुंतवून ठेवते.जीवनातील आशानिराशेचे हिंदोळे प्रत्येकाच्याच जीवनात येत असतात. त्याचाच जणु वाचकाला प्रत्यय येतो.

**

**पुस्तकाचे नाव : व्हाइट नाइट्स**
**मूळ लेखक : फ्योदर दस्तयेवस्की**
**भाषांतर : इर्शाद वडगांवकर**
**प्रकाशक : वॉल्डन पब्लिकेशन, ९७६६९७५१६५**
**पहिली आवृत्ती : ९.२.२०२६**
**पृष्ठे : ११२, किंमत : .३५०/-**

# भाजपच्या नेत्यांना उद्रेकाचा फटका ?

राजकारणात लोकांचा आवाज ऐकला जातो, असे नेहमी सांगितले जाते; पण काही वेळा तो आवाज ऐकूनही न ऐकल्यासारखे केले जाते. मात्र, कधी कधी तोच आवाज इतका तीव्र होतो की तो केवळ एका घटनेपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवर आरसा धरतो. मुंबईतील जांबोरी मैदान परिसरात महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेल्या भाजपच्या जनआक्रोश मोर्चादरम्यान घडलेली घटना याचेच ठळक उदाहरण म्हणावे. एका सामान्य महिलेचा संताप, तिचा स्पष्ट आणि निर्भीड सूर आणि त्यातून उमटलेला संदेश याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. या घटनेत मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर त्या महिलेचा व्यक्त झालेला संताप हा व्यक्तीविरोधातील नव्हे, तर तो सर्वपक्षीय राजकीय प्रवृत्तीविरोधातील होता. मोर्चा, आंदोलन, सभा ही लोकशाहीची साधने आहेत, याबद्दल दुमत नाही. पण या साधनांचा वापर करताना सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा विचार केला जातो का, हा मुलभूत प्रश्न या प्रसंगातून पुढे आला.

रस्ते अडवून, वाहतूक खोळंबा करून, लाखो लोकांच्या रोजच्या आयुष्यात अडथळे निर्माण करून जर राजकीय शक्तिप्रदर्शन केले जात असेल, तर त्यातून निर्माण होणारा रोष अपरिहार्य आहे. आजच्या काळात सोशल मीडियाची ताकद अशी आहे की, एका क्षणात एखादी घटना संपूर्ण देशभरच नव्हे तर जगभर पोहोचते. या महिलेचा व्हिडिओही तसाच वाऱ्यासारखा पसरला. पण या व्हिडिओचे वैशिष्ट्य हे होते की, तो केवळ व्हायरल झाला नाही, तर त्याला लोकांचा प्रचंड प्रतिसादही मिळाला. लोकांनी त्या महिलेच्या भावना समजून घेतल्या, तिच्या संतापाशी स्वत:ला जोडले. मात्र, या प्रतिक्रियेचा अर्थ काही जणांनी आपल्या सोयीप्रमाणे लावण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षांनी या घटनेचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला, ही बाब लपून राहिलेली नाही. भाजपविरोधात लोकांमध्ये असलेला रोष म्हणून या घटनेला रंगवण्याचा प्रयत्न झाला. पण ही मांडणी जितकी सोयीस्कर, तितकीच अपुरी आहे. या संतापामागे कोणत्याही विशिष्ट पक्षाविरोधातील भावना नव्हती, तर ती होती व्यवस्थेच्या त्या वृत्तीविरोधातील प्रतिक्रिया, जिथे जनतेच्या सोयीपेक्षा राजकीय कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाते.



ही बाब केवळ सत्ताधाऱ्यांपुरती मर्यादित नाही. काँग्रेस असो, शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस असो, उबाठा पक्ष असो किंवा इतर कोणतेही राजकीय गट असोत. सर्वांनी वेळोवेळी असे मोर्चे, आंदोलने आणि रस्ते अडवण्याचे प्रकार केले आहेत. त्यामुळे या घटनेचा वापर करून केवळ एका पक्षावर टीका करणे म्हणजे मूळ मुद्द्याकडे दुर्लक्ष करणे होय. प्रश्न कोणाचा मोर्चा आहे, हा नाही. तर तो कसा काढला जातो आणि त्याचा परिणाम कोणावर होतो, असा आहे. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आहे, पण त्याचवेळी नागरिकांच्या हक्कांचाही आदर राखणे आवश्यक आहे. रस्त्यावर अडकलेल्या रुग्णवाहिका, प्रसव वेदनेत तळमळणारी महिला, वेळेवर पोहोचू न शकलेले कामगार, परीक्षेला उशीर झालेली मुले या सगळ्यांचा विचार कोण करणार? राजकीय पक्षांनी आपल्या शक्तिप्रदर्शनाच्या नादात या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे.

शिवाजी चौगुले

यामुळेच हा उद्रेक त्या महिलेच्या संतापातून व्यक्त झाला. कधी तरी हे होणारच होते. सत्ताधारी म्हणून भाजपकडून अधिक जबाबदारपणाची अपेक्षा आहे. सत्ता ही केवळ अधिकार देत नाही, तर ती उत्तरदायित्वही वाढवते. अशा वेळी जर त्यांच्या कार्यक्रमांमुळेच नागरिकांना त्रास होत असेल, तर त्याचे गांभीर्य अधिकच वाढते. प्रशासनावर प्रभाव असताना, पर्यायी मार्गाची व्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि नागरिकांच्या सोयींचे नियोजन करणे शक्य असते.

पण ते न करता जर केवळ गर्दी जमवणे आणि शक्ती दाखवणे यालाच प्राधान्य दिले गेले, तर तो लोकशाहीचा अपमान ठरतो. त्याचवेळी, विरोधी पक्षांची भूमिकादेखील तितकीच महत्त्वाची आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले आणि उबाठाचे नेते संजय राऊत या प्रकरणात भाजपवर टीका करण्यात धन्यता मानत आहेत. सत्ताधाऱ्यांवर टीका करणे हे त्यांचे कर्तव्य असले तरी राजकीय नेते म्हणून आपण सगळे एकाच पाण्यातील मासे आहोत याचा त्यांना विसर पडत आहे.

केवळ एखाद्या घटनेचा राजकीय फायदा उचलण्याच्या नादात जर मूळ मुद्दाच बाजूला पडला, तर ती टीका प्रभावहीन ठरते. या प्रकरणातही तेच झालेले दिसते. त्या महिलेचा राग समजून घेण्याऐवजी, तो आपल्या राजकीय फायद्यासाठी वापरण्याची घाई दिसून आली.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात लाजिरवाणी आणि संतापजनक बाब म्हणजे, मंत्र्यांना जाब विचारणाऱ्या त्या महिलेच्या आवाजाला उत्तर देण्याऐवजी काही महाभागांनी तिच्याच चारित्र्यावर घाव घालण्याचा उद्योग सुरू केला आहे. सार्वजनिक जीवनात प्रश्न विचारणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असताना, त्या अधिकाराचा वापर करणाऱ्या महिलेची बदनामी करून तिचा आवाज दाबण्याचा हा प्रकार अत्यंत घातक आणि निषेधार्ह आहे. सोशल मीडियाच्या अराजक जगात एका तोंडाळ महिलेचे अश्लील भाषेतील व्हिडिओ पुढे करून जणू तीच 'संतप्त महिला' असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

ही केवळ दिशाभूल नाही, तर जाणीवपूर्वक रचलेली बदनामीची मोहीम आहे. विशेष म्हणजे, ज्या महिलेने संताप व्यक्त केला तिची खरी ओळखही अधिकृतपणे समोर आलेली नसताना, तिच्यावर अशा प्रकारे चिखलफेक केली जाणे हे तिच्या वैयक्तिक सन्मानावर केलेले थेट आघात आहेत. हा प्रकार समाजातील त्या विकृत मानसिकतेचे द्योतक आहे. जिथे स्त्रीने आवाज उठवला की तिच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उभे करून तिला गप्प बसवले जाते.

अशा प्रवृत्ती लोकशाहीच्या मुळांनाच पोखरत असतात. त्या मुद्द्यांवर चर्चा करण्याऐवजी व्यक्तीला लक्ष्य केले जाते. भाजपच्या नेत्यांना उद्रेकाचा फटका बसला म्हणून विरोधी पक्षातील नेते खुशीत गाजरे खात आहेत, पण त्यांना हे कळत नाही की, सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने त्या महिलेने ती सर्वपक्षीयांच्या निर्वावलेपणाला दिलेली सणसणीत चपराक आहे. **

विनायक दळवी

## निर्णायक षटकातील गोलंदाजी आरसीबीच्या यशाचे रहस्य

काळ किती बदललाय पहा. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू म्हणजे आरसीबी हा संघ फलंदाजी राजासारखा करायचा. आणि गोलंदाजीत या संघाची अवस्था अक्षरशः भिकाऱ्यासारखी व्हायची. शेवटच्या पाच शतकात म्हणजे डेथ ओवर मध्ये तर हा संघ अगदीच कफल्लक वाटायचा. म्हणजे या संघाने २०० पेक्षा अधिक धावा केल्यानंतरही, त्या धावसंख्येच्या बळावर हा संघ जिंकेल असं कधीच वाटायचं नाही. ही परिस्थिती जवळजवळ गेल्या चार-पाच वर्षापर्यंत होती. २०२५ ला आरसीबीने विजेतेपद पटकावलं आणि या संघाचा एकदम कायापालट झाला. विराट कोहलीचा मैदानावरील अस्तित्व खेळाडूंना विशेषतः गोलंदाजाला प्रेरक ठरत आहे. या संघाला डेथ ओव्हरमध्ये गोलंदाजी करण्यासाठी ऑस्ट्रेलियाचा हेजलवूड, भारताचा भुवनेश्वर कुमार ही एक वेगवान गोलंदाजी जोडी मिळाली आहे. तसेच ऑफ स्पिनर गोलंदाज कुणाल पंड्या, मनगटी फिरकी गोलंदाज सुयश शर्मा या चौघांनी खूपच फरक घडवला.

याआधी शेवटच्या पाच षटकात आरसीबी संघ सरासरी १२ पेक्षा अधिक धावा द्यायचा. म्हणजे शेवटच्या चार ते पाच षटकात या फटकावलेल्या बेसुमार धावांमुळे आरसीबीचा पराभव व्हायचा. आता मात्र तसं होत नाही. भावा देण्याची ही सरासरी १० पेक्षा कमी झाली. म्हणजे अगदी कालच उदाहरण घेतलं तर गुजरात टायटन्स विरुद्ध या संघाने डेथ षटकांमध्ये, उत्तम गोलंदाजी करून गुजरात टायटन्सला रोखले. १७२ दोन गाडी बाद १७२ अशा सुस्थितीत असलेल्या गुजरात संघाला चार षटकांमध्ये मोठी धावसंख्या गाठता आली नाही. म्हणजे याच मैदानावर या आधीच्या सामन्यात आरसीबीने बरोबर १६ व्या षटकात १७२ धावा केल्या होत्या. तेथून त्यांनी अंतिम धावसंख्या २५० वर नेली. गुजरात संघ इथे अपयशी ठरला.आरसीबी चे डावपेच, विशेषता गोलंदाजीतील डावपेत येथे यशस्वी ठरले. सुरेश शर्मा ने १७ व्या शतकात टिच्चून गोलंदाजी केली आणि अवघ्या चारच धावा दिल्या. भुवनेश्वर कुमारने दोन यॉर्कर टाकून १८ व्या शतकाची सुरुवात केली. त्यानंतर सरळ चेंडूवर एकेरी धावा गुजरातला मिळाली. खेळपट्टीवर जोश बटलर याच्यासारखा फटकेबाज फलंदाज देखील यामुळे अस्वस्थ झाला होता. त्यांन रिव्हर्स स्वीट मारण्याची चूक केली आणि थर्ड मॅन ला तो झेलबाद झाला. १९ वे षटक हेझलवूडने आपला पूर्ण अनुभव पणाला लावून टाकल आणि अवघ्या आठ धावा दिल्या. त्यामध्ये दोन धावा मिस्सफील्डमुळे गेल्या होत्या. गुजरात संघाला त्यामुळे महत्त्वाच्या निर्णयात षटकांमध्ये वेगात धावा काढताच आल्या नाहीत. आरसीबी पुढे धावांचे लक्ष अगदीच तुटपुंज ठरले.

शेवटच्या पाच किंवा तीन षटकांमध्ये आरसीबीचा संघ हा सर्व सर्वात कमी चौकार आणि कमी धावा देणारा ठरत आहे. त्यामुळेच त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना निर्णयक षटकांमध्ये धावसंख्या वेगात काढता येत नाही. हेझलवुड आणि भुवनेश्वर या दोघांची या अंतिम षटकांमध्ये धावा देण्याची सरासरी आठ ते नऊ यामध्ये आहे. यावरूनच आरसीबीचा यश कशात लपला आहे हे स्पष्ट होत आहे. फलंदाजी हा आरसीबीचा सुरुवातीपासून बालेकिल्ला होता आणि अजूनही आहे. मात्र, गोलंदाजीत लागलेली शिस्त आणि कोहली आणि कंपनी तसेच प्रशिक्षकाने घेतलेली मेहनत आत्ता कामे येत आहे. आरसीबी संघ हा परिपक्व आणि समतोल संघ वाटत आहे. गत स्पर्धेचे विजेतेपद हे फ्लूक नव्हतं हे यामुळे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.

# चिन्नास्वामीत किंग कोहलीचं तुफान

## गुजरात टायटन्सचा ५ विकेट्सने पराभव, आरसीबीचा हंगामातील पाचवा विजय

| बेंगळुरु | वृत्तसंस्था |

चिन्नास्वामीच्या मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि गुजरात टायटन्समध्ये रंगला. या सामन्याचे नाणेफेक आरसीबीने जिंकली आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २०५ धावा केल्या. तर २०६ धावांचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी मैदानात उतरलेल्या आरसीबीने २०६ धावा केल्या आणि सामना ५ विकेट्सने जिंकला.



प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सने २०५ धावा केल्या, परंतु विराट कोहली आणि देवदत्त पडिक्कल यांच्या शानदार अर्धशतकांच्या जोरावर आरसीबीने हे लक्ष्य गाठले. बेंगळूरुसाठी विराट कोहलीने सर्वाधिक ८१ धावा केल्या. त्याच्यासोबत देवदत्त पडिक्कलने ५५ धावा केल्या. या विजयामुळे आरसीबीने राजस्थान रॉयल्सला मागे टाकत १० गुणांसह गुणतालिकेत दुसरे स्थान पटकावले आहे.

२०६ धावांचे लक्ष्य गाठताना बेंगळूरुची सुरुवात खराब झाली. या मोसमातील आपला पहिला सामना खेळणारा जेकब बेथेल १४ धावांवर सिराजच्या गोलंदाजीवर बाद झाला. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे पहिल्याच चेंडूवर विराट कोहलीला जीवनदान मिळाले. सुंदरने सिराजच्या गोलंदाजीवर एक सोपा झेल सोडला. विराटला जीवदान मिळताच गुजरात अडचणीत आले. विराट कोहलीने पडिक्कलसोबत मिळून गुजरातवर हल्ला चढवला. या दोघांनी अवघ्या २६ चेंडूंमध्ये अर्धशतकी भागीदारी करून आरसीबीला नऊ षटकांत १०० धावांचा टप्पा ओलांडून दिला.

पडिक्कलने २० चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले आणि ५५ धावा करुन बाद झाला. तर विराट कोहलीने आपले अर्धशतक पूर्ण करण्यासाठी ३० चेंडू घेतले. मात्र, जेसन होल्डरने ८१ धावांवर बाद केल्यामुळे विराट कोहलीचे शतक हुकले. गुजरातकडून फक्त साई सुदर्शनला मोठी खेळी खेळता आली त्याने शतकी खेळी खेळली.

### विराटची दमदार खेळी

लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात चांगली झाली नाही, कारण २४ धावांवर जेकब बेथेलच्या रुपानं त्यांनी पहिली विकेट गमावली. यानंतर फलंदाजीला आलेल्या देवदत्त पडिक्कलने विराट कोहलीला उत्कृष्ट साथ दिली आणि धावसंख्या वेगाने पुढे नेली. या सामन्यात कोहली आणि पडिक्कलने दुसऱ्या विकेटसाठी ५९ चेंडूंमध्ये १५५ धावांची भागीदारी केली, ज्यामुळं सामना पूर्णपणे एकतर्फी झाला. या सामन्यात देवदत्त पडिक्कल ५५ धावा करुन बाद झाला, तर विराट कोहलीनं ८१ धावांची खेळी केली.

श्री धापया महाराज कुस्ती आखाड्यात

## पुण्याचा आदित्य कांबळे अजिंक्य

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांचा उत्सव अक्षय तृतियेपासून सुरू झाला. त्या निमित्ताने दुसऱ्या दिवशी शंभर वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा असलेला कुस्तीच्या आखाड्यात शेवटची कुस्ती पुण्याचा आदित्य कांबळे आणि कल्याणचा प्रतिक भंडारी यांच्यात झाली. प्रतिकला काही सेकंदातच आदित्यने चितपट केल्याने तो अजिंक्य ठरला. पहिल्या सत्रातही आदित्य कांबळे प्रक्षकांच्या गळ्यातील ताईत ठरला. मात्र पहिल्या सत्रा-तील आखाडा विजेता म्हणून मानाची गदा कर्जत तालुक्यातील हेदवली गावातील सूरज जोशी या



पहेलवानाने मिळवली. मध्यरात्री पर्यंत हा कुस्ती आखाडा रंगला.

धापया देवस्थान समितीचे अध्यक्ष गणेश शिंदे यांच्या हस्ते कुस्त्यांचा शुभारंभ करण्यात आला. रायगड जिल्हा व कर्जत तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भगवान धुळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी दीपक भुसारी, प्रकाश आणेकर, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, सचिन दगडे, गौरव भानुसघरे, वसंत पवार, व्यंकटेश ठाकरे, मलेश भोईर, हेमंत पवार आदी उपस्थित होते.

महिलांच्या पाच कुस्त्या झाल्या. त्या सुद्धा लक्ष वेधक ठरल्या. दोन्ही सत्रात पंच म्हणून दीपक भुसारी, दत्तात्रय म्हसे, रमेश लोभी यांनी काम पाहिले.

कुस्ती पंच दत्तात्रेय पालांडे, हरिश्चंद्र कांबेरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सचिन दगडे, दिलीप ठाकरे आणि समीर सोमणे यांनी संपूर्ण दिवस सर्वच कुस्त्यांचे समालोचन केले. या आखाड्यात रोख पारितोषिके देण्यासाठी महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, योगेश गायकवाड, मंगेश देशमुख, साईनाथ दराडे, राजेंद्र दगडे, अमित गुप्ता, पंकज बडेकर, प्रसाद चंदन, गणेश शिंदे, सौरभ निगुडसे, राहुल देशमुख, नितीन गुप्ता, राहुल शिंदे, अरुण गुप्ता, सौरभ म्हसे, सोनू जोशी आदींनी सहकार्य केले.

## साई सुदर्शनने मोडला ख्रिस गेलचा विक्रम

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

प्रथम फलंदाजी करताना, गुजरात टायटन्सचा सलामीवीर साई सुदर्शनने उत्कृष्ट कामगिरी केली आणि आपल्या २ हजार आयपीएल धावा पूर्ण केल्या. यासोबतच, त्याने ख्रिस गेलचा विक्रम मोडत, आयपीएलमध्ये डावांच्या बाबतीत सर्वात जलद २ हजार धावा पूर्ण करणारा पहिला खेळाडू बनण्याचा मान मिळवला. इतकंच नाही तर, या सामन्यात त्याने ५७ चेंडूंमध्ये आपलं शतक पूर्ण केले, जे त्याचे तिसरे आयपीएल शतक ठरले.



साई सुदर्शनने ४७ डावांमध्ये २ हजार आयपीएल धावा पूर्ण केल्या. यापूर्वी हा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर होता, ज्याने ४८ डावांमध्ये हा पराक्रम केला होता. ५२ डावांमध्ये हा टप्पा गाठून शॉन मार्श या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. सीएसकेचा ऋतुराज गायकवाड ५७ डावांमध्ये २ हजार आयपीएल धावा करून चौथ्या क्रमांकावर आहे. केएल राहुलने ६० डावांमध्ये हा टप्पा गाठला असून तो या यादीत पाचव्या क्रमांकावर आहे.



## डग ब्रेसवेलवर दोन वर्षांची बंदी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

न्यूझीलंडचा माजी वेगवान गोलंदाज डग ब्रेसवेल याच्यावर दोन वर्षांची मोठी बंदी घालण्यात आली असून तो २०२७ पर्यंत क्रिकेटच्या मैदानापासून दूर राहणार आहे. ब्रेसवेलने २०२३ च्या अखेरीस आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती, मात्र तो सक्रियपणे काउंटी क्रिकेट खेळत असल्याने त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली. या बंदीचे मुख्य कारण म्हणजे २०२५ मध्ये एसेक्स आणि समाप्सेट यांच्यातील सामन्यादरम्यान झालेली त्याची उत्तेजक चाचणी होय. लंडनमधील मथ-ऊ-फ मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ब्रेसवेलच्या नमुन्यांमध्ये कोकेन आणि बेंझॉयलेकगोनाइन हे प्रतिबंधित घटक आढळले. ब्रेसवेलने स्वतः २४ सप्टेंबरच्या रात्री कोकेन घेतल्याची कबुली दिली आहे. जागतिक उत्तेजक प्रतिबंधक संस्थेच्या नियमांनुसार या पदार्थांचे सेवन करणे प्रतिबंधित असून, ब्रेसवेलकडे या पदार्थाच्या वापरासाठी कोणतीही वैद्यकीय सवलत नसल्याने त्याच्यावर ही कारवाई निश्चित करण्यात आली.

## भारताची डेन्मार्क संघावर मात

| हॉर्सेन्स | वृत्तसंस्था |

थायलंड, बँकॉक येथे २०२२ मध्ये झालेल्या थॉमस बॅडमिंटन करंडकात पहिल्यांदाच विजेता होण्याचा मान संपादन केलेल्या भारताच्या पुरुष संघाने यंदाच्या मोसमात 'अ' गटामध्ये पहिल्याच लढतीत कॅनडावर ४-१ असा दणदणीत विजय मिळवला. भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाने साखळी फेरीतील 'अ' गटातील सुरुवात दणक्यात केली. भारताच्या महिला संघाला मात्र उबेर करंडकात डेन्मार्क संघाकडून ३-२ अशी हार पत्करावी लागली. 'अ' गटातील पहिल्याच लढतीत महिला संघाकडून निराशा झाली. भारत-कॅनडा यांच्यामधील लढतीतील पहिल्या फेरीचा सामना लक्ष्य सेन-व्हिक्टर लेई यांच्यामध्ये रंगला होता.



या फेरीमध्ये व्हिक्टर लेई याने लक्ष्य सेनवर १८-२१, २१-१९, २१-१० अशी तीन गेममध्ये मात केली. ही लढत एक तास व ११ मिनिटे रंगली. यानंतर सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या दुहेरीतील जोडीसमोर कॅनडाच्या जॉनाथन लेई-केव्हीन ली या जोडीचे आव्हान उभे ठाकले. या लढतीत भारतीय जोडीने २१-१०, २१-११ असा सरळ दोन गेममध्ये विजय साकारला व १-१ अशी बरोबरी साधली. आशियाई अजिंक्यपद स्पर्धेमध्ये उपविजेता ठरलेल्या भारताच्या युवा आयुष शेट्टी याने एकेरीच्या लढतीत ब्रायन यंग याला अवघ्या ३९ मिनिटांमध्ये पराभूत केले. आयुष शेट्टी याने २१-१३, २१-१७ असा सहज विजय नोंदवला. या विजयामुळे भारताला २-१ अशी आघाडीही घेता आली. हरीहरन अम्साकरुनन-एम. आर. अर्जुन या भारताच्या दुहेरीतील जोडीने निर्णायक विजय मिळवून दिला. हरीहरन अम्साकरुनन-एम. आर. अर्जुन या जोडीने टी. लेक्झँडर लिंडमन- एन. याकुरा या जोडीवर २१-७, १-१५ अशी मात करताना उल्लेखनीय खेळ केला व भारताला ३-१ अशी विजयी आघाडी मिळवून दिली. अखेरच्या लढतीत किदांबी श्रीकांत याने जोशुआ एनगुयेन याला २१-१७, २१-१२ असे नमवले. या विजयासह भारताने ४-१ असा शानदार विजय साकारला.

## तायक्वांदो स्पर्धेच्या पंचासाठी तुषार सिनलकरांची निवड

| रसायनी | प्रतिनिधी |

३६ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा दि.२० ते २७ एप्रिल २०२६ दरम्यान मुंबईतील कलिना येथील पोलीस मुख्यालय व मुंबई विद्यापीठाच्या प्रांगणात पार पडत असून या स्पर्धांमध्ये विविध क्रीडा प्रकारांचा समावेश असून तायक्वांदो स्पर्धा दि. २१ ते २३ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेसाठी ५ डॅन ब्लॅक बेल्ट, आंतरराष्ट्रीय पंच तुषार तानाजी सिनलकर यांना पंच प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आले होते. महाराष्ट्र पोलीस क्रीडा दलाकडून




आयोजन व समन्वय समितीमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक व राष्ट्रीय तायक्वांदो खेळाडू युवराज पोठरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक व राष्ट्रीय जुडो खेळाडू मनिषा तुले तसेच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त हवलदार धनवती गाडगीळ यांचे मोलाचे योगदान लाभले.

या स्पर्धेसाठी इंडिया तायक्वांडोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या अधिकृत राज्य संघटनेमार्फत अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफार पठाण व कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी यांनी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पदक विजेते तसेच ठाणे जिल्हा संघटनेचे सचिव रोहित जाधव यांना स्पर्धेचे डायरेक्टर म्हणून तर ४ आंतरराष्ट्रीय पंच (तुषार सिनलकर - रायगड, इम्रान खान - मुंबई उपनगर, सेजल ओझा - नागपूर, पवन झोल - अकोला) व ८ राष्ट्रीय पंच (माधेश्वरन, अमोल माळी, ओमकार गिरे, अमित धाडवे, आदित्य सोनवणे, निहाल भोईर, रमणी गजमल, दिक्षा वाडकर) नियुक्त केले होते.

सदर स्पर्धा शिस्तबद्ध वातावरणात पारदर्शक व निः पक्षपातीने पार पडल्या असून संपूर्ण राज्यभरातील १३ पोलीस परिक्षेत्र व घटकातील पोलीस खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या स्पर्धेतून राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धे साठी महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

## भारत हॉकी संघ जिंकण्यासाठी सज्ज

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय पुरुष हॉकी संघ आगामी आंतरराष्ट्रीय मोसमासाठी सज्ज होत आहे. एफआयएच प्रो लीग, विश्वकरंडक व आशियाई क्रीडा स्पर्धा या तीन महत्त्वाच्या स्पर्धा डोळ्यांसमोर ठेवून भारतीय हॉकी संघाने सोमवारपासून बंगळूरमध्ये सरावाला प्राधान्य दिले आहे.

बंगळूरमधील स्पोर्ट्स ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या (साई) केंद्रामध्ये २० एप्रिलपासून सुरुवात झालेल्या राष्ट्रीय शिबिराचा शेवट ९ मे रोजी होणार आहे. या शिबिरासाठी ३६



हॉकीपटूंची निवडही करण्यात आली आहे. भारतीय पुरुष हॉकी संघाच्या शिबिरामध्ये विशिष्ट बाबींवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. व्यस्त आंतरराष्ट्रीय हंगामाच्या पार्श्वभूमीवर संघाची तयारी अधिक अचूक करण्यासाठी या प्रशिक्षण शिबिरात डावपेचांमधील सुसंवाद, शारीरिक क्षमता वाढवणे आणि सामन्याच्या सराव सत्रांवर विशेष ध्यान देण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त , संघ सर्व विभागांमध्ये लय साधणे, खेळाडूंचे संयोजन सुधारणे आणि खेळाडूंची संख्या वाढवणे यावरही कटाक्ष टाकण्यात येणार आहे.

युवा खेळाडूंना संधीभारतीय संघाच्या शिबिरामध्ये यंदा युवा खेळाडूंनाही संधी देण्यात आली आहे. मोहीत शशीकुमार, प्रिन्सदीप सिंग या युवा खेळाडूंना गोलरक्षक म्हणून संधी देण्यात आली आहे.

५५ वर्षांनंतर आयोजनाचा प्रयत्न स्पर्धेसाठी अहमदाबाद शहराला प्राधान्य

## भारताचे ऑलिंपिकसाठी एक पाऊल पुढे

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे (२०३०) यजमानपद मिळवल्यानंतर ऑलिंपिक (२०३६) आयोजनपद मिळवण्याची प्रतीक्षा करीत असलेल्या भारताकडून आता २०३८ मध्ये होणार असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. भारतीय ऑलिंपिक संघटनेकडून ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशिया संघटनेला पत्राद्वारे आशियाई क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशिया संघटनेच्या कार्यकारी मंडळाची बैठक २१ एप्रिलला चीनमधील एका शहरात पार पडली. या बैठकीत भारतीय ऑलिंपिक संघटनेकडून आलेल्या



प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशिया संघटनेकडून एक समिती भारत दौऱ्यावर पाठवण्यात येणार आहे. ही समिती भारतातील तयारीवर कटाक्ष टाकणार आहे. दरम्यान, चीनमध्ये २२ एप्रिलपासून आशियाई बीच क्रीडा स्पर्धांना सुरुवात झाली.

भारताने २०३८ मधील आशियाई क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी पुढाकार घेतला असला तरी दक्षिण कोरिया व मंगोलिया हे देशही ही स्पर्धा स्वत:कडे खेळवण्यासाठी उत्सुक आहेत. सौदी अरेबियाची राजधानी रियाध २०३०च्या आशियाई स्पर्धेचे आयोजन करेल. कतारमधील दोहा येथे २०३४मध्ये या क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाईल.

आशियाई स्पर्धा २०३० आणि २०३४ या दोन्ही आवृत्यांचे यजमानपद २०२०मध्ये ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशिया संघटनेच्या बैठकीदरम्यान देण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२६मधील आशियाई स्पर्धा जपानमधील आयची-नागोया येथे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरदरम्यान आयोजित केली जाईल. २०३८च्या आशियाई स्पर्धा आवृत्तीचे यजमानपद भूषवण्यासाठी दक्षिण कोरियाने २०२१ मध्येच आपली इच्छा व्यक्त केली होती, ज्यासाठी ग्वांगजू आणि डेगू ही प्रस्तावित शहरे आहेत.

मंगोलियानेही २०३८ च्या आवृत्तीसाठी बोली लावण्यात रस दाखवल्याचे वृत्त आहे; परंतु त्यांनी अधिकृत प्रस्ताव सादर केला आहे की नाही, हे अद्याप कळलेले नाही. २०३८ मधील आशियाई क्रीडा स्पर्धा कोणत्या ठिकाणी होणार, याबाबतचा निर्णय २०२८ मध्ये घेतला जाणार आहे. याप्रसंगी ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशिया संघटनेमधील एका अधिकाऱ्याने सांगितले, की २०३८च्या आशियाई स्पर्धा यजमान शहराचा निर्णय २०२८ मध्ये होण्याची शक्यता आहे. १९८२नंतर संधीभारताला आशियाई क्रीडा स्पर्धेचे यजमान मिळाल्यास तब्बल ५५ वर्षांनंतर आशियाई स्पर्धेच्या आयोजनाचा मान आपल्याला मिळणार आहे. याआधी १९८२ मध्ये नवी दिल्ली येथे ही स्पर्धा भारताकडून आयोजित करण्यात आली होती. त्याआधी १९५१ मध्ये नवी दिल्ली येथेच ही स्पर्धा पार पडली होती. २०३६ मधील ऑलिंपिक आयोजनासाठीही अहमदाबादलाच प्राधान्य देण्यात आले आहे. आता २०३८ मधील आशियाई क्रीडा स्पर्धे साठीही अहमदाबाद शहराचीच निवड करण्यात आली आहे.

> **आम्ही आशियाई स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर केला आहे. ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशिया संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत त्यावर चर्चा केली. सध्या ही केवळ एक स्वारस्य अभिव्यक्ती आहे. त्यांनी प्राथमिक चर्चा केली आहे.**
> **– रघुराम अय्यर, भारतीय ऑलिंपिक संघटनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)